CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २५७ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## नव्या पिढीतील नवे नेतृत्व निर्माण करण्याची गरज

- शरद पवार : यंत्रमाग ते पॉवरलुमपर्यंत प्रगतीचा प्रवास
- कामगार, सहकार चळवळीला सोलापुरातूनच सुरुवात
- सोलापूरने जपली राष्ट्रीय व सामाजिक एकता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ नोव्हेंबर**


स्व.शंकरराव मोहिते-पाटील यांनी सहकारातून साखर कारखाना उभा केला, तेव्हापासून सोलापूर शहर-जिल्ह्याचे नाव देशाच्या पटलावर आहे. सोलापूरचे सुपुत्र सुशीलकुमार शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री पदासह देशपातळीवर विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. तसेच समाजाचे हित सांभाळून जिल्ह्यातील अन्य नेतेमंडळींनीही सोलापूरचे नावलौकिक केले. आता सोलापूरला नव्या पिढीतील नवे नेतृत्व निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषीमंत्री खा.शरद पवार यांनी सोलापुरात बोलताना केले.

एका खासगी कार्यक्रमाच्या निमित्ताने ते रविवार, दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी सोलापुरात आले होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर जिल्ह्यासाठी आयुष्य वेचले. अनेक नेत्यांना उभारी दिली. महानगरपालिकेत स्व.प्रा.पुरणचंद्र पुंजाल, स्व.बंडप्पा मुनाळे, माजी आमदार नरसय्या आडम यांच्यासह अनेकांनेक नेत्यांनी सोलापूर शहराची सामाजिक बांधिलकी सांभाळली. त्यांनी सांभाळलेली जबाबदारी वाखण्याजोगी होती.

भारत देशामध्ये सोलापूर हे एकमेव असे शहर आहे. जे पारतंत्र्यातही तीन दिवस स्वातंत्र्य उपभोगले आहे. सहकार आणि वस्त्रोद्योग क्षेत्रात क्रांती करत सोलापूरचे नाव देशाच्या आणि जगाच्या पाठीवर कोरले गेले. यंत्रमागपासून ते पॉवरलूम असा क्रांतिकारी प्रवास केला. सोलापूर हे कामगारांचे, कष्टकऱ्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. कामगार चळवळच नव्हे तर सहकार चळवळही सोलापूर जिल्ह्याने पहिल्यांदा सुरु केले. सोलापूरने राष्ट्रीय व सामाजिक एकता जपली. याची प्रेरणा सर्वांनी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## शरद पवार यांचे नाव ऐकताच मला धडकी भरते

- सुशिलकुमार शिंदे : आमच्या कामाचे क्रेडिट आम्ही घेणार
- दुर्दैवाने पक्ष तुटले गेले परंतु पवार आजही आमचे नेते
- दिग्गज नेत्यांच्या सहवासाने आमचे राजकारण सुरु



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ नोव्हेंबर -**

देशाचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खा.शरद पवार हे आमचे नेते आहेत, त्यांच्यामुळेच मी राजकारणात आलो. राजकारणात आलो नसतो तर, आम्हाला कोण विचारले नसते. त्यामुळे शरद पवार यांचे नाव ऐकताच मला जणू धडकी भरते, असे स्पष्ट मत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले.

सोलापुरात आयोजित एका खासगी कार्यक्रमाप्रसंगी माजी केंद्रीय कृषीमंत्री खा.शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे हे दोघे एकाच व्यासपीठावर आले होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, खा.शरद पवार हे राजकारणातील चाणक्य आहेत. एकाच पक्षात राजकारण सुरु केल्यानंतर दुर्दैवाने, कालांतराने आमचे पक्ष तुटले गेले. आम्ही वेगळे झालो. परंतु आजही ते आमचे नेते आहेत. इतके वय झाले, तरीही खा.शरद पवार हे अजून मनाने तरुण आहेत. मी त्यांच्यापेक्षा साडेआठ महिन्याने लहान आहे. ते अजूनही कष्ट घेतात. हे पाहून एक ऊर्जा मिळते. त्यांच्यामुळे राजकारणात येऊन अनेक कामे करता आली. कार्यकर्ते घडवता आले. त्यामुळे आमच्या कामाचे क्रेडिट आम्ही घेणारच, असे सांगायलाही शिंदे विसरले नाहीत.

सोलापूर जिल्ह्यात वि.गु. शिवदारे, शंकरराव मोहिते-पाटील, बाबूराव चाकोते, नामदेवराव जगताप, मनियार यांच्या सारखे दिग्गज नेते होऊन गेले. त्यांच्या विचाराने सोलापूरची जडणघडण झाली. अशा नेत्यांच्या विचारसरणीने सोलापूरचा विकास आणि नावलौकिक झाला. अशा दिग्गज नेत्यांच्या सहवासाने आमचे राजकारण सुरू झाले, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी खा. धैर्यशील मोहिते-पाटील, खा.प्रणिती शिंदे, आ.अभिजित पाटील, आ.राजू खरे, आ.नारायण पाटील आदी उपस्थित होते.


### विचारपुष्प



हिंदुत्व हे सत्याच्या अखंड शोधाचे दुसरे नाव आहे. याचा प्रवाह आज मंदावला असेल आणि परिवर्तनाप्रति असंवेदनशील झाला असेल तर याचा अर्थ हा आहे की, आपण शिथिल झालो आहोत. ज्या दिवशी ही शिथिलता दूर होईल, त्या दिवशी हिंदुत्व आपल्या संपूर्ण शक्तिनिशी विश्वात प्रचंड स्फोट करेल, जो भूतकाळात कधीही झालेला नसेल. बंधूंनो, स्फोटाचा क्षण जवळ आला आहे. त्याच्या स्वागतासाठी आपण सर्वांनी कंबर कसली पाहिजे.

**कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

### विनम्र अभिवादन



पंजाब केसरी लाला लजपत राय यांची आज पुण्यतिथी

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी
## राजकीय हालचालींना वेग
### युतीचा निर्णय मंगळवारपर्यंत | कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला

मनपा निवडणूक रणधुमाळी

◆ **मुंबई, १६ नोव्हेंबर**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची घोषणा झाल्यापासून नेते, आमदार, मंत्री आपापल्या मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक जिंकण्यासाठी ताकद पणाला लावत आहे. जिल्हापातळीवर राजकीय हालचालींना आता वेग आला. राज्यात सत्ताधारी आणि विरोधक स्थानिक पातळीवर काही ठिकाणी एकत्र निवडणुका लढवत असताना मंगळवारी चित्र स्पष्ट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महाविकास आघाडीतील घटकपक्ष काँग्रेसने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला, तर शरद पवार गटात अद्यापही गोंधळाची परिस्थिती आहे. निवडणुका एकत्र लढण्यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी पुणे येथे सांगितले की, स्थानिक पातळीवर आमची चर्चा सुरू आहे. काही ठिकाणी महायुती झालेली आहे, तर काही जिल्ह्यांत ती झालेली नाही. स्थानिक स्तरावर हे सगळे निर्णय होत आहेत. त्यामुळे मंगळवारपर्यंत चित्र स्पष्ट होईल. नगरपरिषद, नगरपंचायतीसाठी जिल्हास्तरावर सोयीनुसार निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले असले, तरी निवडून येणारा उमेदवार हा महायुतीचाच असेल. जागावाटप जिल्हा पातळीवर होते. त्यामुळे जिल्हा स्तरावर त्या-त्या पक्षांनी एकत्र येऊन कोणत्या पक्षासोबत निवडणूक लढवायची हे ठरवलेले आहे. जिथे शक्य आहे, तिथे महायुतीतील पक्ष एकत्र लढत आहे. जिथे महायुती झाली नाही, तरी आपल्यासमोर लढणारे पक्ष हे आपले मित्रपक्ष आहे. (वृत्तसंस्था)

#### स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय

ही जिल्हा स्तरावरची निवडणूक आहे, राज्याची नाही. त्यामुळे स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेतले जात आहे. निवडणूक लढण्यासाठी महापालिकेतील निकष वेगळे असतात. ही मोठी शहरे असतात. इतर ठिकाणी शक्य असेल तिथे युती राहील आणि स्थानिक निवडणुकीत भाजपाच राज्यात एक नंबरचा पक्ष असेल असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

#### युतीचे गणित जुळवून आणणार : प्रफुल्ल पटेल

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल म्हणाले, नऊ वर्षानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होत असल्याने तिन्ही घटकपक्षांचे कार्यकर्ते उत्सुक आहेत. स्थानिक स्तरावर काही वेगळी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे तिथला निर्णय तिथेच घ्यावा लागेल. स्थानिक पातळीवर युतीचे गणित जुळून आणण्याचे प्रयत्न सुरू आहे. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील निवडणुका आम्ही स्वबळावरच लढत आहोत.

#### त्यांचा आणि माझा पक्ष निर्णय घ्यायला स्वतंत्र
##### उद्धव ठाकरेंची सावध प्रतिक्रिया



मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा काँग्रेसच्या निर्णयावर बोलताना उद्धव ठाकरेंनी त्यांचा पक्ष आणि माझा पक्ष निर्णय घ्यायला स्वतंत्र आहे, अशी सावध प्रतिक्रिया दिली. उबाठा आमदार हारून शेख यांनी आयोजित केलेल्या आमदार चषकासंबंधीची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेसने मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचे जाहीर केल्याबाबत ठाकरेंना प्रश्न विचारण्यात आला, त्यावर बोलताना उद्धव ठाकरेंनी फार जोर न देता, काँग्रेसवर पलटवार करण्याचा प्रयत्न केला नाही. महाविकास आघाडीत फूट पडली असे दिसत असल्याच्या प्रश्नालाही ठाकरेंनी बगल दिली. नेहमी आक्रमक असणारे ठाकरे काँग्रेसच्या प्रश्नावर यावेळी बॅकफूटवर दिसले.

## ‘एमवाय’ समीकरणाने लालूंच्या घरात ‘यादवी’

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, १६ नोव्हेंबर**

लालुप्रसाद यादव यांनी बिहारमध्ये संपूर्ण राजकारण मुस्लिम-यादव (एमवाय) या दोन जाती आणि धर्मसमूहाच्या आधारावर केले, यात त्यांना यशही आले. पण आता याच एमवाय समीकरणानी त्यांच्या घरात यादवी निर्माण झाली.

लालुप्रसादांची कन्या सिंगापूरनिवासी रोहिणी आचार्य यांनी राजदच्या बिहारमधील दारुण पराभवानंतर आपल्या कुटुंबाशी संबंध तोडण्याची तसेच राजकारण संन्यासाची घोषणा केली आहे. यासाठी त्यांनी तेजस्वी यादव यांचे निकटवर्ती संजय यादव आणि रमीजखान यांना जबाबदार धरले आहे. संजय यादव हे यादव तर, रमीजखान हे मुस्लिम आहेत. म्हणजे ज्या एमवाय समीकरणाने लालुप्रसादांनी बिहारवर अनेक वर्षे राज्य केले, त्या एमवाय समीकरणाने लालुप्रसादांचे घर फोडले आहे.

वडील लालू प्रसाद यादव यांना मूत्रपिंड देऊन मोठे पाप केले, असा पश्चाताप रोहिणी आचार्य यांनी सोशल मीडियावर व्यक्त केला. कोट्यवधी रुपये आणि तिकिटाच्या बदल्यात वडील लालू प्रसाद यादव यांना त्यांची घाणेरडी किडनी दिली, असा टोमणाही मारण्यात आल्याचा दावा रोहिणी यांनी केला. बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधीच राजदमध्ये फूट पडली होती. लालुप्रसादांचे ज्येष्ठ पुत्र तेजप्रताप यादव यांची पक्षातून तसेच कुटुंबातूनही हकालपट्टी करण्यात आली. आपल्या हकालपट्टीचे खापर तेजप्रताप यादव यांनी संजय यादव यांच्यावर फोडले होते. संजय यादव यांनी आपल्या भावाभावात फूट पाडली. लहान भाऊ तेजस्वीला ते भेटू देत नाही, असा आरोप तेजप्रताप यादव यांनी केला होता. एवढेच नाही तर संजय यादव यांचा उल्लेख जयचंद असाही केला होता.

लालुप्रसाद यादवांना आपली किडनी देऊन जीवदान देणाऱ्या रोहिणी आचार्य यांनी निवडणुकीच्या प्रचारादरम्यानच संजय यादव यांच्यावर आरोप केला होता. तेजस्वी यादव यांच्या बिहार अधिकार यात्रेदरम्यान त्यांच्या बसमध्ये पहिल्या आसनावर



संजय यादव विराजमान असल्याचे छायाचित्र प्रसिद्ध झाले होते. यावरून रोहिणी आचार्य यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला होता.

बिहार विधानसभा निवडणुकीत १४३ जागा लढवणारी राजद फक्त २५ जागा जिंकू शकली. महाआघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांचा निवडणुकीत कसाबसा विजय झाला. सुरुवातीला अनेक फेऱ्यांत तेजस्वी यादव मागे पडले होते. त्यामुळे ते पराभूत होतील, असे वाटत होते. पण, अखेर ते विजयी झाले.

## सुकमात तीन जहाल माओवाद्यांचा खात्मा

◆ **सुकमा, १६ नोव्हेंबर**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात रविवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाने तीन माओवाद्यांचा खात्मा केला. त्यांच्या शिरावर एकूण १५ लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

जिल्हा राखीव रक्षक दलाचे जवान नक्षलविरोधी मोहीम राबवत असताना चिंतागुफा पोलिस ठाणे हद्द आणि भेज्जीच्या सीमेवरील तुमलापाड गावाजवळील टेकड्यांमध्ये ही चकमक झडली. या परिसरात माओवाद्यांची उपस्थिती असल्याची गुप्तचर माहिती मिळाली होती, अशी माहिती सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांनी दिली. सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये बराच वेळ थांबून-थांबून गोळीबार झाला. त्यानंतर घटनास्थळावर दोन महिलांसह एकूण तीन माओवाद्यांचे मृतदेह आढळले. घटनास्थळावरून .३०३ रायफल, बॅरल ग्रेनेड लाँचर, इतर शस्त्रे आणि स्फोटकांचा साठा जप्त करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी संभाजीनगर येथे भाजपाच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले

## बिहारमध्ये सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग

◆ **पाटणा, १६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक विजयानंतर रालोआने सत्ता स्थापनेसाठी दिल्लीपासून पाटण्यापर्यंत बैठका सुरू आहेत. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांसह इतर मंत्र्यांची नावे निश्चित करण्यासाठी पाटणा येथे भाजपा, जदयूच्या नेत्यांची बैठक पार पडली. चर्चेची पुढील फेरी राजधानी दिल्लीत सुरू आहे. जदयूने सोमवारी विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे.

सरकार स्थापनेसाठी भाजपा आणि जदयू यांच्यातील चर्चेचा पहिला टप्पा रविवारी सकाळी आटोपला. बैठकीत मंत्रिमंडळ वाटपाचा फॉर्म्युला जवळजवळ अंतिम झाला आहे आणि चर्चा पुढील टप्प्यात गेली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी मंत्र्यांची नावे निश्चित करण्यासाठी रविवारी सांयकाळी बैठक झाली. यावेळी जयूचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय कुमार झा, एचएएमचे नेते व केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, राष्ट्रीय लोकदलाचे प्रमुख उपेंद्र कुशवाहा, एलजेपीचे (रामविलास) प्रमुख चिराग पासवान यांची उपस्थिती होती. बैठकीत झालेल्या चर्चेत झालेल्या निर्णयाची माहिती समोर आलेली नाही. सहा आमदारांसाठी एका मंत्रिपदाचा फॉर्म्युला लागू करण्यावर एकमत झाले असून, नवीन सरकारची रचना पुढील ४८-७२ तासांत स्पष्ट होईल. (वृत्तसंस्था)



श्रध्देय श्रीमान
भाऊसाहेब गांधी
जन्मशताब्दी महोत्सव २०२५

१००
१९२५-२०२५

अपरिग्रह-मूल्यांची तेजस्वी ओळख !

अपरिग्रहाच्या निवांत छायेत,तुमचे जीवन फुलले
सेवेतील नि:स्वार्थता आणि शिक्षणातील धर्मभाव,
यातून उमटली अद्वितीय साधना
गुरुकुलातील प्रत्येक दालनात घुमतो
आजही आपल्या, वचनांचा नाद
विनय, श्रद्धा, समाधान - या त्रयीने,
तुमच्या व्यक्तित्वाचा प्रकाश
या जन्मशताब्दीच्या दिव्य क्षणी,
आपल्याला सादर कृतज्ञ अभिवादन !

वालचंद शिक्षण समूह, सोलापूर

Soham Ads

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### हिरो कंपनीचे संचालक मुंजालविरुद्ध एफआयआर

**लुधियाना :** हीरो रियाल्टी प्रा. लि.चे संचालक सुनील कांत मुंजाल आणि विक्री प्रमुख निखिल जैन यांच्याविरुद्ध लुधियाना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा खटला फ्लॅटच्या नावाखाली झालेल्या फसवणुकीशी संबंधित आहे. साराभानगर पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या एफआयआरमध्ये, तक्रारदाराने आरोप केला आहे की, कंपनीने चार फ्लॅटसाठी २.४० कोटी घेतले. परंतु, वेळेवर काम पूर्ण केले नाही. जेव्हा त्याने तक्रार केली तेव्हा त्याची तक्रार ऐकली गेली नाही. यामुळे मानसिक आणि आर्थिक नुकसान झाले. तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी कंपनीचे संचालक आणि विक्री प्रमुख यांच्याविरुद्ध फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

### आंध्रप्रदेशात गुंतवणूक करणार अदानी

**नवी दिल्ली :** अदानी समूहाने पुढील १० वर्षांत आंध्रप्रदेशात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. ही गुंतवणूक बंदरे, सिमेंट, डेटा सेंटर, ऊर्जा आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात असेल. या समूहाने राज्यात आधीच ४०,००० कोटींची गुंतवणूक केली आहे. आंध्रप्रदेश गुंतवणूकदार परिषदेत, करण अदानी यांनी १५ अब्ज डॉलर्सच्या विझाग टेक पार्कसाठी त्यांचे स्वप्न सादर केले. गुगलच्या भागीदारीत हे एक हरित ऊर्जा-चालित हायपरस्केल डेटा सेंटर इकोसिस्टिम असेल. अदानी पॉवर आणि अदानी ग्रीन आसाममध्ये ६३ हजार कोटींची गुंतवणूकही करेल.


### असीम मुनीरने उघडले आणखी एक सर्वोच्च न्यायालय

**इस्लामाबाद :** पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी आता न्यायव्यवस्थेवर आपली पकड घट्ट केली. त्यांनी राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांना सर्वोच्च न्यायालयाच्या समांतर संघीय संविधान न्यायालय (एफसीसी) स्थापन करणारे २७ वे संविधान दुरुस्ती विधेयक मंजुरीस भाग पाडले. विधेयक मंजूर झाल्यानंतर २४ तासांच्या आत मुनीर यांनी अमिनुद्दीन खान यांना एफसीसीचे सरन्यायाधीश म्हणून शपथ दिली. पाकच्या इतिहासात पहिल्यांदा एखादा लष्करप्रमुख सरन्यायाधीशांच्या शपथविधीला उपस्थित राहिला. एफसीसीची स्थापना व हायकोर्टाचे अधिकार कमी करण्याच्या विरोधातही निदर्शने सुरू आहेत.

### क्षुल्लक कारणावरून लग्नाआधी नवरीची हत्या

**भावनगर :** गुजरातमधील भावनगरमध्ये एका तरुणीची लग्नाच्या एक तास आधी तिच्या होणाऱ्या नवऱ्याने हत्या केली. ही घटना प्रभुदास तलावाजवळील टेकरी चौकातील एका घरात घडली. घटनेनंतर आरोपींनी घराची तोडफोड केली आणि पळून गेले. पोलिसांनी सांगितले की, आरोपी साजन बरैया आणि पीडित सोनी हिम्मत राठोड हे सुमारे दीड वर्ष एकत्र राहत होते. सुरुवातीला दोन्ही कुटुंबांनी लग्नाला विरोध केला होता, परंतु तरीही त्यांनी साखरपुडा केला आणि बहुतेक विधी पूर्ण केले. डीएसपी आरआर सिंघल यांनी सांगितले की, शनिवारी रात्री लग्नाआधी दोघांमध्ये साडी आणि पैशांवरून वाद झाला होता. वाद वाढत असताना साजनने सोनीवर लोखंडी पाईपने हल्ला केला आणि तिचे डोके भिंतीवर आपटले.

# सनातन विचार हेच एकात्म मानव दर्शन : सरसंघचालक



**जयपूर, १६ नोव्हेंबर**

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी देश, काल, परिस्थितिनुरूप एकात्म मानव दर्शनाचे नाव देत सनातन विचार लोकांसमोर ठेवला. हा विचार नवा नाही. ६० वर्षांनंतरही वर्तमान स्थितीत हे एकात्म मानव दर्शन संपूर्ण जगासाठी प्रासंगिक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

एकात्म मानव दर्शन अनुसंधान तसेच विकास प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित दीनदयाल स्मृती व्याख्यानमालेत सरसंघचालकांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, एकात्म मानव दर्शन एका शब्दात समजायचे असेल तर, तो शब्द आहे धर्म. या धर्म शब्दाचे तात्पर्य रिलिजन, मत, पंथ, संप्रदाय नाही. याचे तात्पर्य गंतव्याशी संबंधित आहे. सारे काही धारण करणारा असा धर्म आहे. वर्तमान काळात जगात याच एकात्म मानव दर्शनाच्या धर्माद्वारे वाटचाल करावी लागेल, असे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

भारतीय जेव्हाही बाहेरच्या देशात गेले, तेव्हा कोणालाही त्यांनी लुबाडले नाही, मारले नाही. सर्वांना सुखी केले. भारतात मागील काही दशकांमध्ये राहणीमानात, खानपानात, वेशभूषेत बरेच बदल झाले असतील पण, सनातन विचार बदललेला नाही. हा सनातन विचारच एकात्म मानव दर्शन आहे आणि याचा आधार हाच आहे की, सुख बाहेर नाही आपल्या आतच आहे. आपण आतील सुख पाहतो तेव्हा लक्षात येते की, संपूर्ण विश्व एकात्म आहे. या एकात्म मानव दर्शनात अतिवाद नाही.

डॉ. मोहनजी भागवत पुढे म्हणाले की, वर्तमानात विज्ञानाच्या प्रगतीने शिखर गाठले आहे. विज्ञानाच्या आधारावर सर्वांचे जीवन भौतिक सुविधांनी संपन्न व्हावे, असे प्रयत्न सुरू आहेत. पण, यासोबत मानवी मनात शांतता आणि समाधान वाढत आहे का? विज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक नवनवीन औषधे तयार झाली. मग, त्या तुलनेत आरोग्य पूर्वीच्या तुलनेत जास्त चांगले झाले आहे का? काही आजारांचे तर कारणच मुळात औषधे आहेत. जगाला हे माहिती आहे की, शरीर, बुद्धी आणि मनाचे सुख निगडित आहे. पण, ते एकाच वेळी कसे साध्य करायचे, हे जगाला माहिती नाही. हे केवळ भारताला माहिती आहे. कारण भारतात शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या सर्वांच्या सुखाचा विचार करण्यात आला आहे.

**विविधता झाली उत्सवाचा विषय**

आपल्या देशात पूर्वीपासूनच अनेक विषयांत विविधता राहिली आहे, पण ही विविधता कधीही भांडणाचे कारण झाली नाही. उलट, आपल्याकडील विविधता उत्सवाचा विषय बनली आहे. पूर्वीपासूनच आपल्याकडे अनेक देवी-देवता होते. त्यात आणखी भर पडली तरीही आपल्याला काही समस्या जाणवली नाही. विविधतेतही एकता कशी जपायची हे भारताला ठावूक आहे, असेही सरसंघचालक म्हणाले. (वृत्तसंस्था)

# कुटुंब प्रबोधन काळाची गरज

## राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांचे प्रतिपादन

### संपर्क दिनानिमित्त गणवेश शाखेचे आयोजन



सेविकांना मार्गदर्शन करताना शांताक्का

**चंद्रपूर, १६ नोव्हेंबर**

भारतीय संस्कृतीत कुटुंब हा समाजाचा पाया आहे. कुटुंब सुदृढ असेल, तर समाज आणि राष्ट्रही सशक्त राहते. आज कुटुंबव्यवस्थेत दिसणाऱ्या कमतरतांना दूर करण्यासाठी कुटुंब प्रबोधन अत्यावश्यक आहे. ते समाज आणि राष्ट्र निर्मितीचा सर्वांत महत्त्वाचा घटक असून, काळाची गरजही आहे, असे प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांनी येथे केले. राष्ट्र सेविका समितीच्या चंद्रपूर विभागातर्फे न्यू इंडिया कॉन्व्हेंट येथे रविवारी संपर्क दिनानिमित्त गणवेश शाखेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

शांताक्का म्हणाल्या, भारताचा प्रत्येक कण पवित्र आहे, ही भावना माझ्या मनात दृढ असून, या पवित्र भूमीच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करण्याची प्रेरणा मला भारत दर्शनातून मिळाली. आपले जीवन कसे असावे, वेळ कोणासाठी द्यावा, आपण कोण आहोत आणि आपले कर्तव्य काय आहे, हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.

शांताक्कांनी हिंदू धर्म-संस्कृतीचे रक्षण, कुटुंबातील संस्कार आणि सामाजिक बांधिलकी या तत्त्वांवर भर दिला. लक्ष्मीबाई केळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, 'चित्र-पात्र-वस्त्र-क्षेत्र' या चार बिंदूंचे महत्त्व सेविकांना समजावून सांगितले.

कौटुंबिक ज्ञान आणि संस्कार जपणे आवश्यक असून, हिंदू संस्कृती जिवंत राहण्यासाठी कुटुंब प्रबोधन अत्यावश्यक आहे. भारत हा त्याच्या भारत रूपातच कायम राहिला पाहिजे, असे त्यांनी शेवटी नमूद केले. प्रास्ताविक व परिचय चंद्रपूर विभाग कार्यवाहिका वनिता मडपुवार यांनी केले. कार्यक्रमास ९० सेविका गणवेशात व एकूण १७५ सेविका उपस्थित होत्या. (तभा वृत्तसेवा)

# भारत-बहरीनमध्ये द्विपक्षीय व्यापारावर सहमती

### जयशंकर यांची अमेरिकेत चर्चा



**न्यू यॉर्क, १६ नोव्हेंबर**

भारताचे परराष्ट्र मंत्री अमेरिकेच्या दौऱ्यावर असून, त्यांनी शनिवारी बहरीनचे मंत्री अब्दुललतीफ बिन रशीद अल झयानी यांच्याशी चर्चा केली. दीड तास चाललेल्या बैठकीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय व्यापारासंदर्भातील भागीदारीवर सहमती दर्शवली.

जयशंकर यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, न्यू यॉर्क येथे बहरीनचे परराष्ट्र मंत्री झयानी यांच्यासोबत चर्चा केली. यावेळी दोन्ही देशांमधील दीर्घकालीन बहुआयामी भागीदारी आणखी मजबूत करण्याच्या मार्गांवर आमची सहमती झाली. सध्याच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही चर्चा झाली. यापूर्वी २ नोव्हेंबर रोजी राजधानी दिल्ली झयानी यांच्यासोबत व्यापक चर्चा झाली होती. द्विपक्षीय भागीदारीवर चर्चेची दुसरी फेरी नुकतीच पार पडली. दोन्ही देश गुंतवणूक कराराला अंतिम स्वरूप देण्याच्या जवळ आले आहेत. भारत आणि बहरीन महत्त्वाकांक्षी व्यापार करारासाठी लवकरच वाटाघाटी सुरू करणार आहे. दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी यावेळी आमची चर्चा झाली. यामुळे कर निश्चितता प्रदान करण्यास आणि व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देण्यास मदत होईल, असे जयशंकर म्हणाले. (वृत्तसंस्था)

### गुगल मॅप्सला आता जेमिनी एआयचा आधार

**नवी दिल्ली :** गुगलने भारतातील गुगल मॅप्स वापरकर्त्यांसाठी जेमिनी एआय एकात्मिक (इंटीग्रेट) केले आहे. यामुळे मॅप्स फक्त एक नेव्हिगेशन ॲप नाही, तर तुमचा वैयक्तिक प्रवास सहाय्यक, बोलणे, समजून घेणे आणि भारतीय वापरकर्त्यांवर आधारित निर्णय घेणे शक्य होईल. यासह, तुम्ही आता बोलून जवळचा पेट्रोल पंप किंवा रेस्टॉरंट शोधू शकता आणि तुम्हाला टाईप न करता पुनरावलोकने, फोटो आणि तपशील देखील मिळतील. अपघात सूचना, वेग मर्यादा आणि दुचाकी नेव्हिगेशन सारख्या नवीन वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे अपडेट लवकरच अँड्रॉइड आणि आयओएसवर रोल आउट होईल, ज्यामुळे प्रवास अधिक स्मार्ट होईल. भारतात दररोज २५ कोटींहून अधिक लोक गुगल मॅप्स वापरतात. म्हणूनच, ही वैशिष्ट्ये भारतासारख्या देशासाठी उपयुक्त ठरू शकतात, जिथे गर्दीची शहरे, दैनंदिन ऑफिस ट्रॅफिक आणि सुरक्षितता असते.

# 'घर' लघुपटाची ईफ्फीमध्ये निवड

**गोवा, १६ नोव्हेंबर**

इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, गोवा अर्थात् ईफ्फीमध्ये झिरो माईल स्टोन फिल्म्स, सृजन थिएटर आणि विकास प्रॉडक्शन या संस्थांतर्फे निर्मिती करण्यात आलेल्या 'घर' या कोंकणी लघुपटाची निवड गोवन सेक्शनमधून झाली आहे.

माधुरी अशिरगडे यांची कथा असलेला ईफ्फीमध्ये निवड झालेला तिसरा लघुपट आहे, म्हणजे इजा, बिजा आणि तिजा अशी हॅटट्रीक माधुरी अशिरगडे यांनी केली आहे.



माधुरी अशिरगडे

'यशोदा', 'एक कप च्या' व आता 'घर' असा हा क्रम आहे. याला माधुरी अशिरगडे यांचे संगीत आहे. अभय-अश्विनी जोशी, समृद्धी पानसे, गंधाली कुलकर्णी, सुनंदा काळुस्कर, अनय-यशश्री अशिरगडे यांनी लघुपटाचे सादरीकरण केले. किशोर अर्जुन यांनी लघुपटाचे दिग्दर्शन केले. रावी किशोर व रोहित खांडेकर हे लघुपटात मुख्य भूमिकेत आहेत. प्रतिभा शहाणे व अंबरीश जोगळेकर यांनी या लघुपटासाठी पार्श्वगायन केले आहे. या लघुपटाचे स्क्रिनिंग या महोत्सवात २४ नोव्हेंबर रोजी गोवा येथील आयनॉक्स थिएटरमध्ये दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

# खा. डॉ. अनिल बोंडे यांना धमकीचा मेल

### भाजपाची येवदा पोलिसात तक्रार

**अमरावती, १६ नोव्हेंबर**

'इस्लामिक इन्फॉर्मेशन सेंटर'चे फलक अमरावतीत लागल्याने या विरुद्ध आवाज उठवल्याप्रकरणी भाजपाचे राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांना धमकीचा खळबळजनक मेल आला आहे. यावरून आक्रमक होत भाजपाच्या अनुसूचित जातीचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी भाजपा कार्यकर्त्यांसह दर्यापूर तालुक्यातील येवदा पोलिस ठाण्यात तक्रार देत मेलवर धमकी देणाऱ्यांना तातडीने अटक करावी, अशी मागणी केली आहे.

दोन दिवसांपूर्वी अमरावतीच्या पंचवटी चौकात इस्लामचा प्रचार करणारे फलक लागले होते. अवैध पद्धतीने लागलेल्या या फलकावर भाजपाचे खासदार अनिल बोंडे यांनी आक्षेप घेत यातील आरोपींविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यांनी आक्रमक होत एक मोठे रॅकेट सक्रिय असून, हिंदू धर्मातील तरुणाईला धर्मांतराच्या दिशेने घेऊन जात असल्याचा गंभीर आरोप केला होता. शनिवारीच किन्नर समाजातील महिलांचे बळजबरीने धर्मांतरण केल्याचा प्रकारही त्यांनी उघडकीस आणला होता.



या दोन्ही घटनांच्या पृष्ठभूमीवर खासदार अनिल बोंडे यांना हैदराबाद येथून धमकीचा मेल आला आहे.

इस्लामिक इन्फॉर्मेशनच्या विरोधात आपण जे शब्द वापरले, त्यामुळे हैदराबादच्या मुसलमानांच्या मनात आग लागली आहे. त्याचा प्रचंड द्वेष आमच्या मनात आहे, हा राग वणवा बनू शकतो. आपल्या जिभेवर आणि वक्तव्यावर संयम ठेवा, अशी धमकी अनिल बोंडे यांना देण्यात आली आहे.

**अमरावतीतही गुन्हा दाखल**

दरम्यान, रविकिरण वाघमारे यांच्या तक्रारीवरून अमरावतीच्या राजापेठ पोलिस ठाण्यातही संबंधित ई-मेल पाठविणाऱ्या अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्त हाती आले आहे.

यावरून आक्रमक होत भाजपाच्या अनुसूचित जातीचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी मेल पाठवणाऱ्या आरोपींच्या विरोधात तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. सोनटक्के यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात येवदा पोलिसात तक्रार दाखल केली आहे. यावेळी पंकज कान्हेरकर, मयूर वांदे, ऋषिकेश इंगळे, कुलदीप हागे, प्रेमसागर आसरे, निखिलेश ठाकूर, ज्ञानपाल राऊत उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)



गुजरात दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या अंतर्गत उभारल्या जाणाऱ्या निर्माणाधीन सुरत रेल्वे स्टेशनला भेट देऊन तेथील अभियंत्यांसोबत संवाद साधला

# नाराज असतानाही रोहिणीने केला प्रचार

**नवी दिल्ली, १६ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीतील राजदच्या या पराभवानंतर रोहिणी आचार्य यांनी पक्षाशी तसेच कुटुंबाशी संबंधविच्छेद करण्याची घोषणा करीत खळबळ उडवली. तेजप्रताप यादव यांची पक्षातून हकालपट्टी करण्याच्या निर्णयावरही रोहिणी आचार्य नाराज होत्या, मात्र विधानसभा निवडणुकीत त्यांनी तेजस्वी यादव यांचा प्रचार केला होता.

पक्षाशी तसेच कुटुंबाशी संबंधविच्छेद करण्याचा सल्ला आपल्याला संजय यादव आणि रमीज खान यांनीच दिला होता, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. संजय यादव आणि रमीजखान यांच्यामुळे आपल्या जिवाला धोका असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. या दोघांनी आपल्याला शिविगाळ केली, तसेच चपलेने मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

लालुप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव आतातरी संजय यादव आणि रमीजखान यांच्यावर कारवाई करतात, की त्यांना नेहमीप्रमाणे पाठीशी घालतात, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. राज्यसभा सदस्य असलेले संजय यादव तेजस्वी यादव यांचे राजकीय सल्लागार आहेत, पक्षात त्यांचा शब्द अंतिम मानला जातो. यावेळी विधानसभा निवडणुकीची संपूर्ण व्यूहरचना त्यांची होती. जागावाटपातही त्यांची भूमिका निर्णायक होती. त्यामुळे पक्षातील अनेक ज्येष्ठ नेते त्यांच्यावर नाराज होते. रमीज खानही तेजस्वी यादव यांच्या कोअर टीमचा हिस्सा आहे. तेजस्वी यादव यांचा प्रचार तसेच अन्य दैनंदिन कामाची जबाबदारी रमीजखान यांच्याकडे असते. (तभा वृत्तसेवा)

# सुरक्षा परिषदेत काही देशांची मक्तेदारी

**न्यू यॉर्क, १६ नोव्हेंबर**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सदस्यांची संख्या पाच दशकांपासून १५ वरच मर्यादित आहे आणि काही देशांच्या मक्तेदारीमुळे संघटनेच्या कार्यप्रणाली प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सुरक्षा परिषदेची कार्यपद्धती विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि पारदर्शक असणे आवश्यक असून, सदस्य संख्येत कायमस्वरूपी वाढ करावी, अशी मागणी भारताकडून करण्यात आली. आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या काही व्यक्ती आणि संघटनांवर बंदी घालण्याची मागणी सातत्याने फेटाळली जात असल्याच्या पृष्ठभूमीवर भारताचे संयुक्त राष्ट्रातील कायम प्रतिनिधी राजदूत पारवथानेनी हरीश यांनी सुरक्षा परिषदेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याच्या मुद्यावर शनिवारी आयोजित खुल्या चर्चेत हरीश म्हणाले, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा कायम ठेवणे हे सुरक्षा परिषदेचे मुख्य दायित्व असताना तसे होताना दिसत नाही. (वृत्तसंस्था)

# बाळासाहेब ठाकरे स्मारकच्या अध्यक्षपदी उद्धव ठाकरेंची फेरनियुक्ती

- शिंदेचा विरोध डावलून मुख्यमंत्र्यांचा निर्णय
- आदित्य ठाकरे, देसाईचाही समावेश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ नोव्हेंबर -**

-शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक समितीच्या अध्यक्ष पदावरून उद्धव ठाकरेंची हकालपट्टी करावी, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेची शिवसेना व खा. नारायण राणेच्या सातत्याने उघडपणे होत असताना सरकारने त्यांचीच पुन्हा फेरनियुक्ती करीत त्यांना धक्का दिला आहे. इतकेच नव्हे तर सचिवपदी त्यांच्याच गटाचे सचिव सुभाष देसाई व सदस्यपदी आ. आदित्य ठाकरे यांचीही निवड करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असलेल्या सामान्य प्रशासनाने त्याबाबत अद्यादेश काढून समितीची घोषणा केली आहे.आगामी मुंबई महापलिकेची निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी जाणीवपूर्वक त्यांची नियुक्ती केली असल्याचे सांगितले जात आहे.

तीन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदेंनी बंड केल्यानंतर शिवसेनेत मोठी फूट पडली. तेव्हापासून दोन्ही गटात विस्तवही देखील जात नाही. दरम्यान, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे मुंबईतील शिवाजी पार्क येथे राष्ट्रीय स्मारक आहे. या स्मरकाच्या अध्यक्ष पदावरुन उद्धव ठाकरेंची हकालपट्टी करावी, अशी मागणी शिवसेना नेते रामदास कदम,खा. नारायण राणे यांनी केली होती. त्यामुळे त्यांना काढले जाईल, असे समजले जात होते. मात्र सरकारने त्यांनाच कायम ठेवले आहे. याबाबत सरकारने काढलेल्या अद्यादेश जारी केला आहे. त्यामध्ये स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्याकरीता मुंबई येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शिवाजी पार्क, दादर येथील महापौर बंगला'' या जागेची निवड केली आहे. या स्मारकासाठी शासकीय सार्वजनिक न्यास स्थापन करण्यात आला आहे. त्यानुसार २७ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक न्यास आणि संस्था स्थापन करण्यात आलेली होती. मुख्यमंत्री झाल्यावर २०१९ मध्ये त्यांनी राजीनामा दिला होता. न्यासाच्या विधानपत्र आणि नियम व नियमावली मधील अ.क्र. १४ येथील तरतूदीनुसार न्यासावरील अध्यक्ष आणि इतर सदस्यांचा प्रथम नियुक्तीचा ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर पदसिद्ध सदस्य वगळता अध्यक्ष आणि सदस्यांची पदे भरण्याबाबतचे १३ मार्च, २०२० रोजी आदेश काढले होते. पदसिद्ध सदस्य वगळता अध्यक्ष व इतर सदस्यांची न्यासावरील ५ वर्षांची मुदत यावर्षी ११ मार्च रोजी संपली होती. सुभाष राजाराम देसाई यांनी बाळासाहेब ठाकरें राष्ट्रीय स्मारक या नावानं सार्वजनिक न्यासाची मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्थेची सहकारी संस्था नोंदणी अधिनियम, १९६० अन्वये केलेल्या नोंदणी केली होती. त्यानुसार राज्य सरकारनं निवड केली आहे.

**निवडीमागे मुख्यमंत्र्यांची खेळी**

येत्या काही महिन्यात होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाने कसून तयारी चालवली आहे,या परिस्थितीत या समितीवर ठाकरे यांना वगळल्यास मराठी मतदारामध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली असती आणि निवडणुकीत फटका बसू शकेल, या शक्यतेने फडणवीस यांनी ही खेळी खेळल्याचे सांगितले जात आहे.

या समितीमध्ये अध्यक्षपदी -उद्धव ठाकरे सचिव - सुभाष देसाई सदस्य म्हणून आदित्य ठाकरे यांच्यासह आ. पराग आळवणी व शिंदे गटाचे शिशिर शिंदे यांचा समावेश आहे. ठाकरे पिता-पुत्र व देसाई यांची पाच वर्षाकरिता तर आळवणी व शिंदे यांची तीन वर्षाकरिता निवड करण्यात आलेली आहे.

# मंत्री विखे- पाटलांच्या शरद पवारांवरील टीकेने राजकारण तापले!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ नोव्हेंबर -**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली असतानाच आता राजकीय आरोप- प्रत्यारोपामुळे राजकारण ढवळून निघत आहे. स्थानिक संदर्भानुसार काही ठिकाणी शरद पवार व अजित पवार यांची राष्ट्रवादी एकत्र येत असल्याने राजकारणाचे संदर्भ बदलत आहे. त्याबाबत शरद पवार यांच्याकडे कार्यकर्तेच नसल्याने अजित पवारासोबत येण्याशिवाय पर्याय नाही, अशी टीका मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांनी रविवारी केल्यावर त्यांना जोरदार दिले जात आहे त्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे.

दोन डिसेंबरला राज्यात २४६ नगरपालिका व ४२ पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी २ डिसेंबरला मतदान होत आहे. त्यासाठी अर्ज भरण्याची मुदत सोमवारी (दि. १७) दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. या निवडणुकीत शरद पवार यांनी भाजपासोडून स्थानिक संदर्भानुसार कोणाबरोबरही युती करण्याची सूट दिली आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादी चंदगड मध्ये एकत्र आली असून पुणे, पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर आदी ठिकाणी भाजपा विरुद्ध एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मंत्री विखे-पाटील यांनी शरद पवारांच्या भूमिकेवर हल्ला चढविताना त्यांच्याकडे कार्यकर्ते च राहिले नाहीत, त्यामुळे ते अजित पवारांकडे जाणारच . शरद पवारांनी आतापर्यंत राजकारणात जे पेरले, त्याचे प्रायचित करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे अशी टीका विखेंनी केली. त्याला पवार गटाकडून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.त्याबाबत मंगळवारपर्यंत थांबा, तुम्हाला सगळं कळेल कोण कोणासोबत आहे,अशी सूचक प्रतिक्रिया खा. सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.

तर अनिल देशमुख म्हणाले, ' सत्तेसाठी नैतिकता, तत्व आणि निष्ठा गहाण ठेवून शाहांची चाकरी करणाऱ्या विखे-पाटलांची पवार साहेबांवर बोलण्याची पात्रता नाही, असा टोला लगावला

पुण्यात पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून करण्यात आलेल्या जमीन खरेदी प्रकरणामुळे अजित पवार चांगलेच अडचणीत आले आहेत.

त्यातच आता दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा जोरदार आहे. त्यामुळे जर दोन्ही राष्ट्रवादी एक होणार का? याबद्दल चर्चेने राजकारणात रंग भरला आहे

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर असलेले नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेशकुमार त्रिपाठी यांनी अमेरिकी नौदलाच्या आर्ले बर्क श्रेणीतील दिशादर्शक क्षेपणास्त्र विनाशिका यूएसएस डॅनियल इनौयेला भेट दिली

# मेक्सिकोत 'जनरेशन झेड'चा धुडगूस

## भ्रष्टाचार-गुन्हेगारीविरोधात उतरले रस्त्यावर ● राष्ट्रपती भवनाची नासधूस ● २५ पोलिसांसह १७२ लोक जखमी

◆ **मेक्सिको सिटी, १६ नोव्हेंबर**

वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार, सार्वजनिक सुरक्षेचा अभाव याविरोधात मेक्सिकोमध्ये नेपाळच्या धरतीवर तरुणांचे आंदोलन सुरू आहे. त्यात विरोधी पक्षासह सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. शनिवारी जनरेशन झेड आंदोलकांनी सुरक्षा घेरा तोडत राष्ट्रपती भवनात प्रवेश केला आणि तोडफोड, जाळपोळ केली. सुरक्षा दलासोबत झालेल्या संघर्षात २५ पोलिसांसह १७२ नागरिक जखमी झाले. सध्या मेक्सिकोत अराजकतेची परिस्थिती आहे.

मेक्सिकोचे सुरक्षा सचिव पाब्लो वाझक्वेझ यांनी सांगितले की, दोन दिवसांपासून देशाच्या राजधानीसह विविध शहरांत तरुणांचे आंदोलन सुरू आहे. शनिवारी आंदोलकांनी राष्ट्रपती भवनाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा दलावर हल्ला केला, त्यानंतर बळाचा वापर केल्याने आंदोलनाला हिंसक वळण लागले. आंदोलनात सहभागी शेकडोच्या संख्येतील तरुण राष्ट्रपती भवनात शिरले आणि त्यांनी तोडफोड, जाळपोळ केली. त्यानंतर राष्ट्रपती भवन परिसरातील राष्ट्राध्यक्षाच्या निवासस्थानातही प्रवेश करून त्यांनी तेथेही तोडफोड केली. हिंसक आंदोलनात आतापर्यंत २० जणांना अटक केली. निदर्शकांनी दगड, हातोडा, काठ्या आणि साखळ्यांनी पोलिसांवर हल्ला केला. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. आंदोलनाचे नेतृत्व करणारे २४ वर्षीय विद्यार्थी नेते लिओनार्डो मुन्योस म्हणाले, आम्हाला आमच्या देशात सुरक्षा हवी आहे. देश अमलीपदार्थांच्या विळख्यातून मुक्त व्हावा, भ्रष्टाचारापासून सुटका व्हावी यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो आहोत. (वृत्तसंस्था)




### 'वन पीस' पात्र तरुणाईचे प्रतीक

आंदोलनात १८ ते २९ वयोगटातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी असून, जपानी कॉमिक बुक 'वन पीस'मधील 'लफी' हे पात्र त्यांचे प्रतीक बनले आहे. निदर्शक कवटीच्या टोपीचे चिन्ह घेऊन चालताना दिसतात, जे लफीचे ट्रेडमार्क आहे. लफी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातो, लोकांना भ्रष्ट आणि हुकूमशाही शासकांपासून मुक्त करतो. मेक्सिकोतही अशीच परिस्थिती आहे.

### डॉक्टरांच्या संघटनेचा पाठिंबा

आंदोलनात सहभागी झालेल्या ४३ वर्षीय डॉ. क्लॉडिया क्रूझ म्हणाल्या, तरुणांच्या आंदोलनाला डॉक्टरांच्या संघटनेचा पाठिंबा आहे. आम्ही शासकीय आरोग्य व्यवस्थेसाठी निधी आणि सुरक्षिततेची मागणी करीत आहोत. सध्या डॉक्टरांसाठी सुरक्षित वातावरण नाही. मेक्सिकोमधील मिचोआकनचे महापौर कार्लोस मांझो यांची अलिकडेच हत्या झाली आहे. तेव्हापासून जनतेत संताप आहे.

### दोषींना सोडणार नाही : क्लॉडिया शेनबॉम


मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शेनबॉम यांनी म्हटले की, हिंसक आंदोलनासाठी उजव्या विचारसरणीचे लोक जबाबदार आहे. विरोधी पक्षाचे लोक तरुणांना भडकवत असून, त्यांनीच हिंसा घडवून आणली. अराजकता पसरून कोणतीही समस्या सोडवली जात नाही. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

# पुतिन ५ डिसेंबरला येणार भारतात

### संरक्षण, तेल विषयावर चर्चा शक्य

◆ **नवी दिल्ली, १६ नोव्हेंबर**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन ५ डिसेंबर रोजी भारतात येणार आहेत. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत २३ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेचे सह-अध्यक्षपद भूषवतील. डिसेंबर २०२१ नंतरचा हा पहिलाच भारत दौरा असेल



आणि रशिया-युक्रेन संघर्षानंतर हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर सोमवारी मॉस्कोमध्ये असतील. अधिकृतपणे, ते शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) बैठकीला उपस्थित राहण्यासाठी जात आहेत. परंतु, त्यांचा दौरा रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या भारत भेटीशी जोडलेला असल्याचे मानले जात आहे. रशियन राष्ट्राध्यक्षांच्या भारत भेटीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. पुतिन आणि मोदी यांच्यातील भेटीत द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा आढावा घेतला जाईल. परंतु, विशेषतः द्विपक्षीय व्यापार वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. मॉस्कोमधील त्यांच्या वास्तव्यादरम्यान, जयशंकर मसुदा अजेंड्यावर चर्चा करतील.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जयशंकर यांच्या भेटीत पुतिन यांच्या भेटीच्या तयारीवर लक्ष केंद्रित केले जाईल. भारत-रशिया शिखर परिषदेत ऊर्जा, संरक्षण आणि व्यापार यासारख्या क्षेत्रात अनेक करार होण्याची अपेक्षा आहे. पुतिन यांच्या भारत भेटीची तयारी जोरात सुरू आहे.

मोदी-पुतिन बैठकीत एसयू-५७ लढाऊ विमानांचा पुरवठा (७० टक्क्यांपर्यंत तंत्रज्ञान हस्तांतरणासह) आणि एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीचे पाच अतिरिक्त युनिट्स खरेदी करण्यावर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. रशिया दोघांसाठीही खुला आहे. शिवाय, एस-५०० प्रणालीचे संयुक्त उत्पादन, अणुऊर्जा सहकार्य, आर्क्टिक प्रदेशात गुंतवणूक, कृषी व्यापार आणि पूर्व सागरी कॉरिडॉर (व्लादिवोस्तोक-चेन्नई) सारखे जोडणी प्रकल्प मजबूत करणे देखील अजेंड्यावर आहेत.

रशियन परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, जयशंकर आणि त्यांचे रशियन समकक्ष सर्गेई लाव्हरोव्ह यांच्यातील बैठकीत द्विपक्षीय सहकार्य, एससीओ, ब्रिक्स, संयुक्त राष्ट्र सुधारणा आणि जी-२० सारख्या मंचांमध्ये परस्पर सहकार्य यावर चर्चा होईल.

जयशंकर रशियामध्ये दोन नवीन भारतीय वाणिज्य दूतावासांचे उद्घाटन करतील. यावरून हे दिसून येते की, भारत रशियाशी असलेल्या संबंधांबद्दल कोणत्याही दबावाखाली नाही आणि तो दीर्घकालीन करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. (वृत्तसंस्था)

### रशियन तेलाचा भारत दुसरा मोठा खरेदीदार

सूत्रांनी सांगितले की, भारत आणि रशिया द्विपक्षीय व्यापार वेगाने वाढवण्याचा प्रयत्न करतील. अलिकडच्या वर्षांत भारत आणि रशियामधील द्विपक्षीय व्यापार वाढला असला तरी, तो तेलकेंद्रित राहिला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात द्विपक्षीय व्यापार ६८.७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. हा २०२१-२२ मधील १३ अब्ज डॉलर्सपेक्षा सहा पटीने जास्त आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीत भारताने रशियाकडून दररोज १.६ दशलक्ष बॅरल कच्चे तेल आयात केले. यामुळे तो जागतिक पुरवठा साखळीत रशियन तेलाचा दुसरा सर्वांत मोठा खरेदीदार बनला.

# अमेरिका करणार गाझाचे विभाजन

### इस्रायलच्या नियंत्रणातील ग्रीन झोनचा पुनर्विकास

### पॅलेस्टिनी रेड झोन उद्ध्वस्तच राहणार

◆ **वॉशिंग्टन, १६ नोव्हेंबर**

गाझा पट्टीचे दोन भागांत विभाजन करण्याची योजना अमेरिकेने आखली आहे. यासाठी दीर्घकालीन योजना तयार करण्यात आली आहे. एका भागावर आंतरराष्ट्रीय सुरक्षा दल आणि इस्रायली सैन्याचे नियंत्रण असेल. याला ग्रीन झोन म्हटले जाणार आहे आणि या भागाचा पुनर्विकास करण्याची योजना अमेरिकेने आखली आहे, तर पॅलेस्टिनी रेड झोन भागत उद्ध्वस्तच राहणार आहे.

पॅलेस्टिनी लोकवस्ती असलेला दुसरा भाग त्याला रेड झोन म्हणून घोषित करण्यात आले असून, तो सध्या तरी उजाडच राहील. सध्याच्या परिस्थितीत सर्व पॅलेस्टिनी नागरिक रेड झोनमध्ये विस्थापित झाले आहेत. अमेरिकन लष्करी गुप्तचर कागदपत्रे आणि अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक टिप्पणीवर आधारित एका वृत्तात हा दावा करण्यात आला आहे. वृत्तानुसार, या योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. ग्रीन झोनमध्ये परदेशी सैन्यासोबत इस्रायली सैन्य तैनात केले जाईल. येथे पुनर्विकासाचे काम लवकरच सुरू करण्यात येईल. या भागात आंतरराष्ट्रीय सुरक्षा दलांच्या तैनातीसाठी अमेरिका संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडून औपचारिक



मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**सैन्याची तैनाती कायम राहणार**

गाझाच्या ग्रीन झोन भागात पाच हजार सैनिक तैनात असून, पुनर्निमाणाचे काम सुरू होण्यापूर्वी ही संख्या २०,००० पर्यंत वाढवली जाईल. सध्या कोणत्याही विदेशी सैन्याला ग्रीन झोन सोडण्याची परवानगी नाही. इस्रायलच्या नियंत्रणाखालील यलो लाईनच्या पश्चिमेकडील भागाला रेड झोन म्हटले जाईल. येथे पुनर्विकासाची परवानगी दिली जाणार नाही. दोन वर्षांच्या युद्धात या भागाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. येथे सुमारे २० लाख लोक अडकले आहेत. (वृत्तसंस्था)

# शेख हसीनांच्या विरोधातील खटल्याचा आज निकाल

◆ **ढाका, १६ नोव्हेंबर**

मागील वर्षी सरकारविरोधी निदर्शनांमध्ये मानवतेविरुद्धच्या कथित गुन्ह्यांबद्दल पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरुद्धच्या खटल्यात विशेष न्यायाधिकरण सोमवारी निकाल देणार आहे. त्यापूर्वी बांगलादेशात सुरक्षा यंत्रणांना सतर्क ठेवण्यात आले आहे.



देशभरात अप्रिय घटना टाळण्यासाठी कायदा अंमलबजावणी संस्थांनी त्यांची आवश्यक तयारी आधीच पूर्ण केली आहे, असे गृह सल्लागार जहांगीर आलम चौधी यांनी सरकारी वृत्तसंस्था बीएसएसला सांगितले. बांगलादेश आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरण उद्या हसीनांच्या विरोधात निकाल देणार आहे. मागील वर्षी मोठ्या प्रमाणात झालेल्या निदर्शनांमध्ये मानवतेच्या विरोधात गुन्ह्यांच्या सूत्रधार शेख हसीना असल्याचा आरोप करीत मुख्य अभियोक्ता मोहम्मद ताजुल मोहम्मद इस्लाम यांनी हसीनांना मृत्युदंड देण्याची मागणी केली आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### धर्मेंद्रच्या ९० व्या वाढदिवसाची कुटुंबात तयारी सुरू




**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ अभिनेता धर्मेंद्र यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे चाहते अतिशय चिंतेत होते. आता मात्र कुटुंबाने दिलेल्या माहितीनुसार, धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. एवढेच नाही तर, येत्या ८ डिसेंबरला धर्मेंद्र यांचा ९० वा वाढदिवस साजरा करण्याची जोरदार तयारी सुरू आहे. स्वत: हेमा मालिनी यांनी ही माहिती दिली. इशा देओल हिचा नोव्हेंबरमध्ये वाढदिवस होता. मात्र, धर्मेंद्र यांची प्रकृती बिघडल्याने इशाचाही वाढदिवस साजरा झाला नाही. म्हणून येत्या ८ डिसेंबरला धर्मेंद्र आणि इशा या दोघांचाही वाढदिवस जल्लोषात साजरा होणार आहे. आता येणारा प्रत्येक क्षण आम्ही धरमजींसोबत उत्तम पद्धतीने जगण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे हेमा मालिनी म्हणाल्या.

### फोनला हात न लावता आठ तास काम करतो महेश बाबू



**हैदराबाद** : एसएस राजामौली यांचा आगामी चित्रपट 'वाराणसी'मध्ये सुपरस्टार महेश बाबूच्या मेहनतीची आणि समर्पणाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. एसएस राजामौली यांनी विशेषतः सांगितले की, महेश बाबू चित्रीकरणादरम्यान सलग आठ तास काम करतो आणि काम करताना एक क्षणही त्याच्या फोनला हात लावत नाही. चित्रपट उद्योगात त्याची काम करण्याची नीती अनुकरणीय मानली जाते. महेश बाबू अत्यंत व्यावसायिक आहे आणि चित्रपटाच्या प्रत्येक दृश्यात त्याचे सर्वस्व पणाला लावतो. हैदराबादमधील रामोजी फिल्म सिटीमध्ये झालेल्या एका कार्यक्रमादरम्यान एसएस राजामौली यांनी महेश बाबूचे कौतुक केले. ते म्हणाले, महेश बाबूच्या व्यक्तिमत्त्वात काहीतरी खास आहे, ज्यातून प्रत्येकाने शिकले पाहिजे. घराबाहेर पडतानाच तो फोन पाहतो आणि नंतर काम संपल्याशिवाय फोनला हातही लावत नाही.

### राजकुमार रावच्या घरी कन्यारत्न



**मुंबई** : अभिनेता राजकुमार राव आणि त्यांची पत्नी पत्रलेखा यांना शनिवारी मुलीचा जन्म झाला. त्यांच्या लग्नाच्या चौथ्या वाढदिवसाला या जोडप्याची मुलगी आली. दोघांनीही सोशल मीडियावर ही आनंदाची बातमी शेअर केली आणि म्हटले की, त्यांची मुलगी ही देवाने त्यांना दिलेली सर्वांत मोठी देणगी आहे. या जोडप्याने ९ जुलै रोजी इंस्टाग्रामवर त्यांच्या गरोदरपणाची घोषणा केली. पोस्टमध्ये फुलांचे डिझाईन आणि एक पाळणा होता ज्यावर 'बेबी ऑन द वे' लिहिलेले होते आणि खाली त्यांची नावे लिहिली होती. राजकुमारने कॅप्शन दिले, 'खूप आनंदी'. पत्रलेखा आणि राजकुमार राव यांचे लग्न १५ नोव्हेंबर २०२१ रोजी झाले. दोघांची भेट सिटीलाईट्स चित्रपटाच्या सेटवर झाली.

### श्रीलंकेत ड्रग्ज तस्करीत हजार जणांना अटक

**कोलंबो** : श्रीलंकेच्या पोलिसांनी ड्रग्ज तस्करी प्रकरणात धडक कारवाई करीत तब्बल एक हजार जणांना अटक केली. द नेशन युनायटेड असे नाव असलेल्या या व्यापक मोहिमेअंतर्गत अमलीपदार्थांचा मोठा साठा जप्त करण्यात आला.

श्रीलंकेच्या गृहमंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांच्या आदेशानुसार देशात ३० ऑक्टोबरपासून ड्रग्ज तस्करीविरोधात व्यापक मोहीम सुरू करण्यात आली. याअंतर्गत शुक्रवारी आणि शनिवारी या दोन दिवसात देशआतील विविध भागांतून १,०५६ तस्करांना अटक करण्यात आली. हे सर्वजण अमलीपदार्थांशी संबंधित उद्योगात गुंतलेले होते. ड्रग्जविरोधी मोहिमेमुळे कारवाईची व्याप्ती वाढली आहे. अटक करण्यात आलेले ३९ आरोपी आंतरराष्ट्रीय टोळीचे सदस्य आहेत.

# 'फॉर्च्युनर'ची ट्रॅक्टरला धडक; पाच तरुण ठार

### ग्वाल्हेर-झाशी महामार्गावर भीषण अपघात

◆ **ग्वाल्हेर, १६ नोव्हेंबर**

मध्यप्रदेशच्या ग्वाल्हेर-झाशी महामार्गावर मालवा महाविद्यालयासमोर रविवारी सकाळी भरधाव फॉर्च्युनर एसयूव्हीने वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात एसयूव्हीतील पाच तरुणांचा जागीच मृत्यू झाला. धडक इतकी भीषण होती की, एसयूव्हीचा पुढचा भाग चक्काचूर झाला.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, फॉर्च्युनर मधील तरुण ग्वाल्हेर येथून झाशीला येत होते. रविवारी सकाळी भरधाव एसयूव्हीने मालवा महाविद्यालयासमोर रस्त्याच्या बाजूला उभ्या वाळूच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला जोरदार धडक दिली. स्थानिकांनी अपघाताची माहिती देताच झाशी रोड पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचविले.



डॉक्टरांनी पाच तरुणांना मृत घोषित केले, तर ट्रॅक्टर चालक आणि इतर तिघांवर उपचार सुरू करण्यात आला. चक्काचूर झाल्यामुळे एसयूव्हीत अडकलेल्या तरुणांना बाहेर काढण्यासाठी क्रेन बोलावावे लागले. मृतदेह विच्छेदनासाठी पाठवण्यात आले. मृतांची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू आहे. अपघाताचे कारण पोलिस शोधत आहेत. (वृत्तसंस्था)

# राहुल गांधीविरोधातील याचिकेवरील सुनावणी स्थगित

◆ **मुंबई, १६ नोव्हेंबर**

भाजपा कार्यकर्त्याने काँग्रेस नेते राहुल गांधींविरुद्ध दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यातील सुनावणी ठाणे जिल्हा न्यायालयाने ६ डिसेंबरपर्यंत स्थगित केली आहे. याप्रकरणावरील सुनावणीसाठी ६ डिसेंबरनंतर तारीख निश्चित केली जाणार आहे. न्यायाधीश पी. एम. कोळसे सध्या या खटल्याची सुनावणी करीत आहेत.

मानहानी खटला प्रकरणात तक्रारदार राजेश कुंटे यांचे वकील वकील प्रबोध जयवंत यांनी निजामपुरा पोलिस ठाण्याचे निरीक्षक अशोक सायकर यांची साक्षीदार म्हणून चौकशी करावी, अशी मागणी करणारा अर्ज न्यायालयात सादर केला होता. न्यायालयाने निजामपुरा पोलिसांना या प्रकरणाची चौकशी करण्याचा आणि अहवाल सादर करण्याचा निर्देश दिला होता. त्यानुसार पोलिस निरीक्षकांनी न्यायालयात चौकशी अहवाल सादर केला त्यानंतर या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ नोव्हेंबर रोजी होणार होती. तथापि, राहुल गांधींचे वकील, अधिवक्ता नारायण अय्यर यांनी त्या दिवशी सुनावणी स्थगित करण्याची विनंती करणारा अर्ज सादर केला. त्यानंतर न्यायालयाने सुनावणी ६ डिसेंबरपर्यंत तहकूब केली आहे.

दरम्यान, ६ मार्च २०१४ रोजी भिवंडीतील एका निवडणूक रॅलीत राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. याची दखल घेत कथित टिप्पणीवर कुंटे यांनी न्यायालयात राहुल यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. (वृत्तसंस्था)

# सर्वांचा डेटा आता होणार सुरक्षित

## सायबर सुरक्षेचे नियम आणखी कडक होणार

◆ **नवी दिल्ली, १६ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) कायद्याचे' नियम अधिसूचित केले असून, देशात प्रथमच डिजिटल प्रायव्हसीला औपचारिक कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. हे नियम टप्प्याटप्प्याने लागू होणार आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, इंटरनेट इंटरमीडियरी, ई-कॉमर्स कंपन्या आणि सर्व डेटा हाताळणाऱ्या संस्थांना पुढील १८ महिन्यांत सर्व नियम पाळावे लागणार आहेत. अन्यथा त्यांना अत्यंत कडक कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

दिल्लीमध्ये एक पूर्णपणे डिजिटल पद्धतीने काम करणारा डेटा प्रोटेक्शन बोर्ड स्थापन केला जाणार आहे. यात एक अध्यक्ष आणि चार सदस्य असतील. नियमांचे उल्लंघन किंवा डेटा लीक झाल्यास हा बोर्ड दंडात्मक कारवाई करेल. या कायद्यामुळे भारतात प्रथमच डिजिटल गोपनीयतेला मजबूत आणि स्पष्ट संरक्षण मिळाले आहे.



**काय आहे नवीन बदल?**

कोणतीही कंपनी वापरकर्त्यांची परवानगी घेताना त्यांचा डेटा नेमका कसा आणि कुठे वापरला जाईल, याची स्पष्ट माहिती देणे बंधनकारक राहील. वापरकर्ते कधीही दिलेली परवानगी मागे घेऊ शकतात. माहितीबाबत हक्कभंग झाला असे वाटल्यास डेटा प्रोटेक्शन बोर्डात तक्रार करता येईल. (वृत्तसंस्था)

# जगभरातील मौलानांचा बांगलादेशात डेरा

### ईशनिंदा कायदा कठोर करण्यावर भर

### ऐतिहासिक सोहरावर्दी गार्डनमध्ये शक्तिप्रदर्शन

◆ **ढाका, १६ नोव्हेंबर**

सोमवारी बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरुद्ध मोठा न्यायालयीन निर्णय अपेक्षित आहे. संघर्षाच्या शक्यतेमुळे लोक घाबरले आहेत. दरम्यान, बांगलादेश पाकिस्तानातील कट्टरवादी धर्मगुरूंसाठी प्रयोगशाळा बनत आहे. पहिल्यांदाच जगभरातील धर्मगुरू ढाक्यातील ऐतिहासिक सोहरावर्दी गार्डन येथे जमले. संयुक्त खत्मे-ए-नबुवत कौन्सिलने आयोजित केलेल्या या परिषदेत ३५ पेक्षा जास्त पाकिस्तानी धर्मगुरू सहभागी झाले.

त्यापैकी १९ जणांनी व्यासपीठावरून भाषण देत बांगलादेशी राजकारण ढवळून काढले. देशात आधीच तणाव असताना ही परिषद झाली आहे. पाकिस्तानी धर्मगुरू मौलाना फजलुर रहमान ('मौलाना डिझेल') आणि औरंगजेब फारुकी सर्वाधिक चर्चेत आहेत. त्यांनी सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी पाकिस्तानसारखा कठोर ईशनिंदा कायदा लागू करण्यासाठी बांगलादेश सरकारवर उघडपणे दबाव आणला. त्यांनी पाकिस्तानप्रमाणेच कादियानी/अहमदिया समुदायाला गैर-मुस्लिम घोषित करण्याची मागणीही केली. पाकिस्तान व्यतिरिक्त सौदी अरेबियाचे शेख रौफ मक्की, इजिप्तचे शेख मुसाब इब्राहिम, बांगलादेशातील अनेक इस्लामिक संघटनांचे नेते देखील उपस्थित होते. ढाका परिषदेत पाकिस्तानी धर्मगुरूंच्या समर्थकांनी 'काबूलपासून बांगलादेशपर्यंत एक कलिमा- आपण जिंकू' असा नारा दिला.

**गरज पडल्यास रक्त सांडू : मौलाना डिझेल**

ढाका परिषदेतील सर्वांत आक्रमक विधान पाकिस्तानातील जमियत उलेमा-ए-इस्लामचे प्रमुख मौलाना डिझेल यांचे होते. त्यांनी व्यासपीठावरून घोषणा केली की, कादियानी काफिर आहेत. आम्ही प्रेषितांचा सन्मान करण्यासाठी पाकिस्तानप्रमाणेच येथेही रक्त सांडू. मौलाना रहमान आणि औरंगजेब फारूकी यांच्यासह १९ पाकिस्तानी धर्मगुरूंनी निवडणुकीपूर्वी बांगलादेशने कठोर ईशनिंदा कायदा लागू करण्याची मागणी केली. त्यात मृत्युदंडाची शिक्षा आहे. त्यांनी पाकिस्तानप्रमाणेच अहमदिया/ कादियानी समुदायाला गैर-मुस्लिम घोषित करण्याची मागणीही केली. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# आत्मपरीक्षण करणार का?

दिवस होता ६ ऑगस्ट २००४. फोरम फॉर डेमोक्रॅटिक इनिशिएटिव्ह या सामाजिक संस्थेची बैठक सुरू होती. बैठकीत तत्कालीन काँग्रेस सरकारच्या दृष्टीने नामांकित असलेली डोकी उपस्थित होती. ही डोकी होती न्या. राजिंदर सच्चर, दीपंकर भट्टाचार्य, सेरम रोजेश आणि प्रा. एस. ए. आर गिलानी यांची. सच्चर समितीचे नाव सर्वांनाच माहीत आहे. दहशतवादी, नक्षलवादी आणि ईशान्य भारतातील बंडखोरांची बाजू घेणारे म्हणून सच्चर यांची ओळख आहे. मुस्लिमांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक अवस्थेचा अभ्यास करण्यासाठी डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने राजिंदर सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन केली. वास्तविक पाहता एखाद्या सर्वोच्च समितीचा अध्यक्ष नेमताना त्याचा भूतकाळ पाहणे आवश्यक असते. पण, बहुसंख्य हिंदूंना डावलण्यासाठी आणि त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी जे जे आवश्यक असते, ते करण्यात काँग्रेस सदैव अग्रेसर राहिली आहे. भारतीय जवानांची हत्या करणारा जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचा म्होरक्या- जो सध्या तुरुंगात खडी फोडत आहे, त्या यासिन मलिकबरोबर राजिंदर यांचे फार सख्य होते. परकीय चलन घोटाळ्यात यासिन मलिकला अटक केली असता राजिंदर सच्चर यांनी २००२ मध्ये पत्रकार परिषद घेऊन यासिनच्या सुटकेची मागणी केली होती. एवढेच नव्हे तर जम्मू-काश्मीरला १९५३ पूर्वीचा दर्जा बहाल करावा, अशी वारंवार मागणी केली होती. ही देशविरोधी व्यक्ती जर सच्चर समितीची अध्यक्ष असेल तर काय होईल, याचा विचारच न केलेला बरा. दीपंकर भट्टाचार्य हे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्स व लेनिनवादी) या संघटनेचे महासचिव. नक्षलवाद्यांना पाठिंबा देणारा हा पक्ष आहे. सेरम रोजेश हा मणिपूरमधील बंडखोरांचा नेता, तर दिल्ली विद्यापीठात काम केलेला प्राध्यापक एस. ए. आर. गिलानी याचा तर संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहभाग होता. याच हल्ल्यातील दोषी अफजल गुरूला फाशी झाल्यानंतर गिलानीला खूप दु:ख झाले होते. एवढेच नव्हे तर काश्मिरात गिलानी अफजल गुरूला श्रद्धांजली वाहण्यासाठी सभाही आयोजित करीत होता. अशाच एका प्रकरणात गिलानीला २०१६ मध्ये अटकही झाली होती.

राजिंदर सच्चर आणि फोरम फॉर डेमोक्रॅटिक इनिशिएटिव्हसारख्या अनेक संस्था आणि व्यक्ती मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, या नावाखाली देशात फुटीरतावादाला खतपाणी घालत आहेत. हे समूह आणि व्यक्ती अशा प्रकारचे वातावरण देशात तयार करीत असतात, की ज्या वातावरणात देशविघातक विचार जन्माला येतात. ज्याचे परिणाम देशाला, विशेषतः बहुसंख्य हिंदू समाजाला भोगावे लागत आहेत. आणि काँग्रेस, डावे पक्ष, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, तृणमूल काँग्रेस, डीएमके, आम आदमी पार्टीसारखे पक्ष राजकीय फायदा मिळविण्यासाठी अशा समाज आणि देशविरोधी तत्त्वांवर पांघरूण घालण्याचे काम करीत असतात. दहशतवादविरोधी कायदा म्हणजे मुस्लिमविरोधी कायदा असा समज देशात पसरविण्यात हेच राजकीय पक्ष आणि तथाकथित सामाजिक संस्था सर्वांत पुढे असतात. २००१ मध्ये भारताच्या संसदेवर भीषण दहशतवादी हल्ला झाल्यानंतर २००२ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने 'पोटा' कायदा आणला. पण, २००४ मध्ये काँग्रेसचे सरकार येताच 'पोटा' कायदा रद्द करण्यात आला. हा कायदा रद्द करण्यासाठीही राजिंदर सच्चर यांनी आंदोलन केले होते. अर्थात, काँग्रेस आणि हिंदूविरोधी भूमिका घेणारे काही प्रादेशिक पक्ष धर्माच्या आधारावर देशद्रोही आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम करीत असतात. विशेष म्हणजे या सर्वांची एक इको सिस्टिम तयार झालेली आहे. ते पद्धतशीरपणे वातावरण निर्मिती करीत असतात. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात नुकत्याच झालेल्या निवडणुकीत डाव्या विचारांच्या विद्यार्थी संघटनेचा विजय झाला. विजय झाल्यानंतर त्यांनी जी नारेबाजी केली त्यावरून भविष्यात हे तरुण-तरुणी देशासाठी डोकेदुखी ठरणार हे निश्चित आहे. असाच एक समज (नॅरेटिव्ह) देशात पसरविला जात आहे आणि तो म्हणजे गरिबी, अशिक्षितपणा आणि अन्याय, यामुळे युवक-युवती गुन्हेगारीकडे वळतात, दहशतवादी होतात. पण, अलिकडच्या दिल्ली बॉम्बस्फोटात जे आरोपी आहेत, ते सर्व उच्चशिक्षित आहेत. प्रसंगी देवापेक्षाही समाज ज्यांच्यावर अधिक विश्वास ठेवतो, असे डॉक्टर आहेत. यावरून हे सिद्ध होते की दहशतवादी होण्यासाठी गरिबी, अशिक्षित असण्याची मुळीच गरज नाही. देशात आतापर्यंत जेवढे काही दहशतवादी हल्ले झाले आहेत, त्यामागे फक्त आणि फक्त धर्मांधता कारणीभूत आहे. गरिबी आणि अशिक्षितपणा ही गुन्हेगार, दहशतवादी होण्याची कारणे असतील तर आज गल्लोगल्ली हिंसाचार माजला असता. दिल्लीत १३ निष्पाप नागरिकांचा जीव घेणारे दहशतवादी हे उच्चशिक्षित आहेत आणि त्यांनी अत्यंत नियोजितपणे, थंड डोक्याने हा हल्ला घडविला. अल-फलाह विद्यापीठाला आश्रयस्थान बनवून त्यांनी कट आखला. डॉ. मुजम्मिल शकील याला तर महिन्याला पाच लाख रुपये वेतन मिळत होते. मुजम्मिल हा विद्यापीठात प्राध्यापक होता. स्वत:ला स्फोटात उडविणारा डॉ. उमर नबीकडेही पैशाची उणीव नव्हती. विशेष म्हणजे बहुतांश दहशतवादी हे काश्मीर खोऱ्यातील आहेत. नोकरी लागल्यानंतर त्यांनी आलिशान घरे बांधली. घरच्यांना संपत्ती गोळा करून दिल्यानंतर हे दहशतवादी धर्मकार्याकडे वळले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपला मुलगा, भाऊ हे निर्दोष असल्याचा कांगावा नातेवाईक करीत असतात. कारण, त्यांना जाणीव आहे, की एक मुलगा धर्मासाठी मेला तरी काही फरक पडणार नाही. मरणाऱ्याला हुतात्मा मानून त्याला जन्नती समजतात. दिल्ली बॉम्बस्फोटात डॉ. शाहीनचा सहभाग असल्याचे उघड झाले. तिचे कनेक्शन थेट पाकिस्तानातील बहावलपूर येथे आढळून आले. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मसूद अजहर याची बहीण सादिया अजहरने जमात-उल- मुमिनत नावाची महिलांची दहशतवादी संघटना स्थापन केली. तिची आणखी एक बहीण समैरा ही दहशतवादी कसे बनावे यासाठी ऑनलाईन वर्ग घेत असते. लखनौची रहिवासी असलेली डॉ. शाहिना शाहीद ही सादियाच्या संपर्कात आली आणि तिला भारतातील महिला विंगचे प्रमुख नेमले, अशी माहिती तपासातून पुढे आली आहे. याच शाहिनाच्या कारमध्ये एके-४७ रायफल आणि स्फोटके आढळून आलीत. यावरून देश हादरविण्याचा मोठा कट या शिक्षित दहशतवाद्यांनी आखल्याचे सिद्ध होते. या कटाची माहिती तपास संस्थांना वेळेवर मिळाली म्हणून बरे झाले. अन्यथा, देशभरात प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी तब्बल ३२ बॉम्बस्फोट घडविण्याचा कट या डॉक्टरांनी आखला होता. या सर्वांचा मास्टरमाईंड हा श्रीनगरमधील नौगाव येथील मशिदीचा मौलवी- इरफान अहमद याने डॉक्टरांची माथी भडकावून त्यांना दहशतवादाकडे वळविले. वास्तविक पाहता मौलवीचे काम हे नागरिकांना योग्य मार्गदर्शन करणे हे होय. मात्र, या इरफानने डॉक्टरांची दहशतवादी फौज तयार केली. दिल्लीतील स्फोटानंतर अल-फलाह विद्यापीठातून १५ डॉक्टर्स गायब झाले आहेत. दहशतवादी तयार होणे हे देशासाठी घातक तर आहेच; शिवाय मुस्लिम धर्म आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे. असे कृत्य केल्याने कुणाच्याही पदरात विनाशाशिवाय काहीही पडणार नाही. आज, उच्चशिक्षित असलेले डाक्टर्स तुरुंगात गेले आहेत. त्यांची नोंदणी रद्द केल्याने आतापर्यंत केलेले श्रम आणि पैसा वाया गेला आहे. तपास संस्थांची छापेमारी अजूनही सुरूच असून, ६०० पेक्षा जास्त संशयितांची चौकशी सुरू आहे. एवढेच नव्हे तर काश्मिरातील जवळपास २०० डॉक्टर्स तपास संस्थांच्या रडारवर आहेत. दिल्लीतील बॉम्बस्फोटात १३ कुटुंबे उद्ध्वस्त झालीत. त्यात हिंदूंबरोबरच मुस्लिमांचाही समावेश आहे. मुले काय करतात, याकडे लक्ष देण्याची जबाबदारी घरच्यांची तर आहेच, आणि समाजाचीही तेवढीच आहे. काही वाईट घडत असेल तर त्यापासून समाज स्वत:ला दूर ठेवू शकत नाही. या घटनेमुळे फक्त काही व्यक्ती आरोपी ठरलेले नाहीत; एक अख्खा समुदाय त्यातील सुशिक्षित वर्गासह संशयाच्या घेऱ्यात आलाय. याही वेळी याची जबाबदारी इतरांच्याच डोक्यावर टाकायची, की आत्मपरीक्षण करून देशाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हायचे याचा निर्णय करण्याचा हा प्रसंग आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मुनीर यांची स्फोटक सलामी!

इस्लामाबादमध्ये पाकिस्तानी संसदेच्या वरिष्ठ सभागृहात १० नोव्हेंबर रोजी मुनीर नावाचा 'भस्मासुर' तयार केला जात असतानाच नवी दिल्लीत लाल किल्ला परिसरात झालेल्या कार बॉम्बस्फोटात दहा निष्पाप नागरिक ठार झाले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान मागील ७८ वर्षांपासून ज्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवित, राष्ट्राला संबोधित करतात, त्याच लाल किल्ल्याच्या परिसरात रक्ताचा जणू सडा शिंपडण्यात आला. हा योगायोग नव्हता. फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारताला आणखी एका युद्धासाठी दिलेली चिथावणी होती.

**तारीख आणि वेळ** : १० नोव्हेंबर रोजी पाकिस्तानी संसदेने एक वादग्रस्त असे २७ वे घटनादुरुस्ती विधेयक पारित केले. साधारणत: सायंकाळी ६.३० च्या सुमारास हे विधेयक मंजूर करण्यात आले. आणि इकडे नवी दिल्लीत १० नोव्हेंबर रोजीच सायंकाळी ६.५२ वा. बॉम्बस्फोट करण्यात आला. या घटना दुरुस्तीत फिल्ड मार्शल असिम मुनीर यांना प्रचंड अधिकार देण्यात आले आहेत. त्यांना आजन्म 'फिल्ड मार्शल' हा किताब ठेवता येणार आहे. पाकिस्तानमध्ये आता असिम मुनीर हे सर्वांत शक्तिशाली व्यक्ती ठरले आहेत. आणि याच मुनीर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी दिल्लीत लाल किल्ल्यासमोर बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला.

**पाकिस्तानच...** : सोमवारी १० नोव्हेंबरच्या सायंकाळी झालेल्या या बॉम्बस्फोटाबाबत दोनच शक्यता होत्या. एक तर कारमध्ये असलेल्या सीएनजी सिलेंडरचा स्फोट झाला वा मग पाकिस्तानने तो घडवून आणला असावा. बॉम्बस्फोटाची तीव्रता पाहता सीएनजी सिलेंडर स्फोटाची पहिली शक्यता सुरक्षा तज्ज्ञांनी फेटाळून लावल्यानंतर यामागे पाकिस्तानचाच हात आहे हे स्पष्ट झाले.

**मुनीरच्या धमक्या** : पाकिस्तानी लष्करप्रमुख मागील काही महिन्यांपासून सतत भारताला धमक्या देत आहेत. मुनीर यांची अमेरिकेतील भाषणे असोत की पाकिस्तानी लष्करी अकादमीतील भाषणे, त्यांनी सातत्याने भारतविरोधी भूमिका घेतली आहे. नवी दिल्लीत घडवून आणण्यात आलेल्या या बॉम्बस्फोटात मुनीर यांच्या त्या मानसिकतेचे प्रतिध्वनी उमटले आहेत.

**मुनीर यांचा डंका** : भारताने ऑपरेशन सिंदूर चार दिवसात संपवून एक मोठी चूक केली असे आता वाटते. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानचे कंबरडे मोडण्याचा निर्णय भारताने घ्यावयास हवा होता पण, भारताने संयम दाखवीत ऑपरेशन सिंदूर संपविले. यात पाकिस्तानला तडाखा देण्यात भारत यशस्वी झाला. असा दावा भारतीय वायुदलप्रमुख, सेनाप्रमुख यांनी केला असला तरी, अमेरिका, चीन, पाश्चिमात्य व मुस्लिम जगतात मात्र पाकिस्तानच्या विजयाचा डंका पिटण्यात आला. यात अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आघाडीवर राहिले. त्यांनी जनरल मुनीर यांच्यासाठी व्हाईट हाऊसमध्ये लाल पायघड्या घातल्या. त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी आयोजित केली. मुनीर यांच्या पराक्रमाचे ढोल पिटण्यात राष्ट्रपती ट्रम्प यांनीच पुढाकार घेतला. मग, चीन, मुस्लिम देशही मुनीर यांना मोठे करण्यासाठी सरसावले. आणि हे कथित यश आता जनरल मुनीर यांच्या अंगी संचारले आहे. पाकिस्तानी संसदेने १० नोव्हेंबर रोजी फिल्ड मार्शल मुनीर यांना शक्तिशाली करण्याचा निर्णय घेतला असताना, मुनीर आपल्या या शक्तीचे प्रदर्शन करणार होते. त्यासाठी त्यांनी १० नोव्हेंबरची निवड केली. लाल किल्ल्याची निवड केली आणि बऱ्याच वर्षांच्या कालखंडानंतर नवी दिल्लीत एक मोठा दहशतवादी हल्ला घडवून आणला.

**भारतासमोरील पर्याय** : फिल्ड मार्शल मुनीर यांच्या या दु:साहसानंतर भारत त्यांना कोणते व कसे उत्तर देतो हे महत्त्वाचे ठरणार आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात लहान मोठी लष्करी कारवाई केल्यास, पाकिस्तान त्याला केवळ प्रत्युत्तर देणार नाही, तर पाकिस्तानचे उत्तर कितीतरी प्रमाणात मोठे असेल असेही मुनीर यांनी स्पष्ट केले आहे. याचाच अर्थ पाकिस्तानने भारताशी युद्ध करण्याचा निर्णय अगोदरच घेतलेला आहे. मुनीर यांना जणू युद्धज्वर चढला आहे. असे त्यांच्या विधानांवरून व कृतीवरून दिसत आहे.

**हा तर प्रारंभ** : नवी दिल्लीत घडवून आणलेला बॉम्बस्फोट हा पाकिस्तानच्या 'नव्या व्यूहरचनेचा' प्रारंभ मानला जातो. पाकिस्तानला काश्मीर खोऱ्यात रक्तपात करावयाचा नाही. याने खोऱ्यातील काश्मिरी जनतेची सहानुभूती आपण गमावू याची पाकिस्तानला पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे मागील काही वर्षांपासून पाकिस्तानने काश्मीर खोऱ्यातील दहशतवादी कारवाया बंद केल्या आहेत. पहलगाम त्याला एक अपवाद होता. हा एक अपवाद वगळता पाकिस्तानने जम्मूच्या पूंछ, राजौरी या भागावर आपले लक्ष केंद्रित केले होते. यात भारतीय सुरक्षा दलाच्या जवानांना 'लक्ष्य' करण्याचे धोरण पाकिस्तान राबवीत होता. या भागाची भौगोलिक दुर्गमता लक्षात घेता येथील चकमकी ८-८ दिवस लांबविण्यात पाकिस्तानला यश येत होते.

**ऑपरेशन सिंदूरनंतर** : ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तानला पुरेसा चोप दिला नाही. याने जनरल मुनीर व पाकिस्तानी नेत्यांचे मनोबल वाढले. त्यास जगातील इतर देशांची साथ मिळाली आणि आता मुनीर नावाचा भस्मासुर पाकिस्तानात तयार झाला आहे.

**घटनात्मक उठाव** : पाकिस्तानात आता असिम मुनीर यांची सत्ता चालणार हे २७व्या घटना दुरुस्तीने दाखवून दिले आहे. या देशात अनेकदा लष्करी उठाव झाला आहे. राज्यघटनेला पायदळी तुडवीत लष्करी सेनापतींनी देशाची सत्ता आपल्या हाती घेतली आहे. यावेळी घटना पायदळी न तुडविता, घटनेची पायघडी घालून मुनीर यांना पाकिस्तानचे सर्वेसर्वा करण्यात येत आहे. यासाठी राज्यघटनेच्या कलम २४३ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून, मुनीर यांना चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस हे नवे पद बहाल करण्यात आले आहे. पाकिस्तानी लष्कर, वायुदल व नौदल या तिन्ही दलांना मुनीर यांच्या नेतृत्वाखाली काम करावे लागणार आहे. पाकिस्तानची आण्विक शस्त्रास्त्रे मुनीर यांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. हा सारा विषय माकडाच्या हाती कोलीत देण्यासारखा आहे. पण, या निर्णयावर पाकिस्तानी सिनेट व नॅशनल असेम्ब्ली या संसदेच्या दोन्ही सभागृहांनी शिक्कामोर्तब केले आहे.

**सुप्रीम कोर्टाचा सफाया** : या घटना दुरुस्तीत पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाचाही सफाया करण्यात आला आहे. आता तेथे पाकिस्तान संविधान न्यायालय स्थापन केले जाणार असून, सारे घटनात्मक विषय हे न्यायालय हाताळणार आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानचे हे नवे न्यायालय सर्वोच्च न्यायालयापेक्षा 'सर्वोच्च' राहणार आहे. या न्यायालयात नियुक्त होणाऱ्या न्यायधीशांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांपेक्षा अधिक वेतन-भत्ते राहणार आहेत. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायधीशांसाठी निवृत्तीचे वय ६५ वर्षांचे असताना, नव्या न्यायालयातील न्यायधीशांसाठी निवृत्तीची वयोमर्यादा ६८ करण्यात आली आहे. म्हणजे मुनीर यांच्यासाठी पाकिस्तानी लष्कर व पाकिस्तानची न्यायालये याची सारी व्यवस्थाच बदलण्यात आली आहे.

**मोठे आव्हान** : लाल किल्ल्यासमोर झालेल्या कार बॉम्बस्फोटाने भारतासमोर एक मोठे आव्हान उभे केले आहे. हा बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्यांना दंडित केले जाईल असे भारताने म्हटले आहे. यातील काही संशयितांना पकडण्यात आले असून, काहींना पकडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यांना कठोर शिक्षाही केली जाईल. पण, हा बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्या 'मास्टरमाईंड'चे काय?

**मास्टरमाईंड** : फिल्ड मार्शल मुनीर यांच्या आदेशाने हा बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला याबाबत कुणालाही कोणतीही शंका असण्याचे कारण नाही. पण, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानात व जगात मुनीर यांची प्रतिमा अचानक उंचावली आहे. याचे नेमके कारण सांगणे अवघड आहे. पाकिस्तानी सरकारने त्यांना 'फिल्ड मार्शल' किताब बहाल केला, चीन, अमेरिकेच्या गळ्यातील ताईत बनले. सौदी अरेबियाने मुनीर यांच्या 'कामगिरीवर' फिदा होत, पाकिस्तानशी सुरक्षा करार केला. आता केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानी संसदेत घटना दुरुस्ती पारित करवून मुनीर यांना शक्तिशाली करण्यात आले आहे. नवी दिल्लीत झालेला - घडवून आणण्यात आलेला बॉम्बस्फोट त्याचाच परिणाम होता. पण, एक दिवस मुनीर नावाचा भस्मासुर पाकिस्तानी नेत्यांच्या - जनतेच्या मानगुटीवर बसणार आहे. पण तोपर्यंत तो भारताला त्रस्त करणार यात शंका नाही. त्यामुळे भारत सरकार समोरील खरे आव्हान कार बॉम्बस्फोटातील चिल्लर आरोपींना पकडणे हे नाही तर फिल्ड मार्शल मुनीर यांचा युद्धज्वर उतरविणे हे राहणार आहे. भारत त्या दिशेने कोणती पावले टाकतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# थंडीतही तापले राजकीय वातावरण

नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्याने सध्या थंडीचा पारा घसरला असला तरी राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. १७ नोव्हेंबर रोजी या निवडणुकांसाठी नामनिर्देशन दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. या निवडणुका पार पडताच महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका आणि २६ जिल्हा परिषदांसह २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहे. सध्या नगरपरिषदा आणि नगरपंचायती मिळून २८८ ठिकाणी निवडणूक जाहीर झाली असून २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत ६ हजार ८४९ नगरसेवक आणि २८८ नगराध्यक्ष निवडले जातील. यावेळी तब्बल १ कोटी ७ लाखांवर मतदार आपला हक्क बजावतील.

ग्रामीण भागातही निवडणुकीचे वातावरण असून जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसाठी अनेक ठिकाणी आरक्षण सोडत पूर्ण झाली आहे. अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही प्रलंबित आहेत. परिणामी, विकासकामांत अनेक अडचणी येत आहे. कुठलाही प्रशासकीय अधिकारी सर्वसामान्य जनतेला न्याय देऊ शकत नाही. कारण, लोकनेत्यांच्या तुलनेत प्रशासकीय अधिकाऱ्यांचा जनतेच्या समस्यांशी संबंध खूपच कमी प्रमाणात येतो. त्यामुळे या निवडणुका होणे नितांत गरजेचे होते. आता टप्प्याटप्प्यात निवडणुका होणार आहे.



या निवडणुका आजी-माजी आमदारांची परीक्षा घेणाऱ्या ठरणार आहेत. त्यामुळे आजी-माजी आमदारांच्या हालचाली वाढल्या असून बुथनिहाय नियोजन केले जात आहे. नुकत्याच पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपाला एकतर्फी कौल दिल्याने या पक्षाकडे स्थानिक निवडणुकांसाठीसुद्धा इच्छुकांच्या रांगा लागल्या आहेत. काँग्रेस पक्षाकडूनही अनेक जण इच्छुक असल्याने तिकीट वाटप करताना वरिष्ठांची कसोटी लागत आहे. अशातच समाजमाध्यमांवर मतचोरी आणि ईव्हीएममधील गडबडीचा फेक नॅरेटिव्ह विरोधकांकडून प्रसारित केला जात आहे. वास्तविक आजपर्यंत याबाबत विरोधक कायदेशीररीत्या कुठलाही ठोस पुरावा सादर करू शकलेले नाहीत. बिहार विधानसभा निवडणुकीतही असाच काहीसा प्रचार काँग्रेससह इतर पक्षांनी करून पाहिला. परंतु, जनता आता विरोधकांच्या खोट्या प्रचाराला कंटाळली आहे.

बिहारातील भाजपाचे अभूतपूर्व यश पाहून उबाठा नेते संजय राऊत खूपच अस्वस्थ झाल्याचे जाणवत आहे. उबाठाने आपले सर्व लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीवर केंद्रित केले आहे. मुंबईतही उबाठाला धोबीपछाड बसल्यास या पक्षाचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. सध्या सगळीकडे भाजपाच क्रमांक एकचा पक्ष असून त्यानंतर काँग्रेस आणि राकाँकडे बऱ्यापैकी जनाधार आहे. विदर्भात मात्र बहुतांश ठिकाणी भाजपा आणि काँग्रेस या दोनच पक्षांत थेट लढतीचे चित्र आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात खा. प्रफुल्ल पटेल यांच्यामुळे अजित पवारांच्या राकाँकडे बऱ्यापैकी जनाधार आहे. वर्धा जिल्ह्यात खा. अमर काळे आणि अतुल वांदिले यांच्यामुळे शरद पवारांच्या राकाँचे अस्तित्व आहे. विदर्भात उबाठाचे फारसे अस्तित्व नसून काही ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उमेदवार रिंगणात दिसू शकतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्थानिक मुद्दे प्रामुख्याने प्रचारात येतात. परंतु, अलिकडील परिस्थिती पाहता या निवडणुकांमध्येसुद्धा राज्य आणि राष्ट्रीयस्तरावरील मुद्दे विचारात घेतले जाण्याची शक्यता आहे. तरीही बहुतांश ठिकाणी उमेदवारांची लोकप्रियता प्रभावी ठरू शकते. त्यामुळे उमेदवार देताना पक्षश्रेष्ठींचे कौशल्य पणाला लागत आहे. अनेक पक्षांमध्ये बंडखोरीचे प्रमाण अधिक राहणार असल्याने हा विषय वरिष्ठांच्या माध्यमातूनच मार्गी लावावा लागणार आहे. अन्यथा होतकरू उमेदवारांचे नुकसान होऊ शकते. आणखी दोन-तीन महिने संपूर्ण महाराष्ट्रात निवडणुकांचे वातावरण राहणार आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# दहशतवादाचा रक्तरंजित चेहरा

दहशतवादाचा कुठलाही धर्म नसतो हे कितीही कंठशोष करून काँग्रेस, पुरोगामी, कम्युनिस्ट हे सांगत असले तरीही, वारंवार देशामध्ये उरी, पठाणकोट, पुलवामा, संसद भवन, मुंबई बॉम्बस्फोट, दिल्ली बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांमधून जनतेला ते समजून येतं की दहशतवादाचा धर्म कोणता आहे, प्रत्येक वेळेस यावर शिक्कामोर्तब होत असते.

फक्त मुस्लिम एकगठ्ठा मतदानासाठी हे नेते लोक अशा पद्धतीची विधाने करीत असतात. वास्तविक दहशतवाद्यांचा संपूर्ण मुस्लिम समाजाशी संबंध जोडणे म्हणजे शंभर टक्के मुस्लिम समाजावर अन्याय करण्यासारखे असू शकते. परंतु सर्व मुसलमान हे दहशतवादी नसले, तरी भारतामध्ये पकडले जाणारे सर्वच अतिरेकी हे मुस्लिम समाजाचे असतात हे सुद्धा सत्य आपण नाकारू शकत नाही.

मुस्लिम समाजात देशभक्त आणि चांगले लोक आहेत, परंतु त्यांची संख्या इतकी नगण्य आहे आणि त्यांचा कट्टरवादी समाज त्यांना किंमत देत नाही हे सुद्धा वास्तव आहे. जोपर्यंत तुम्ही इस्लामला न मानणाऱ्या प्रत्येकाला 'काफीर' समजत राहाल, तोपर्यंत सामाजिक एकता आणि राष्ट्रीय एकता निर्माण होऊ शकत नाही. कट्टरवादी विचारसरणीचे लोक हा मुस्लिम समाजामध्ये नियम आहे, अपवाद फक्त काही लोकांचा असतो. आज अमेरिका, इंग्लंड आणि विविध पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये सुद्धा मुस्लिम जनसंख्येचा विस्फोट आणि त्यांच्या कट्टरवादी कारवाया ही त्यांच्यासाठी चिंतेची बाब बनलेली आहे. भारतामध्ये तर पाकिस्तानची जेवढी जनसंख्या आहे, तेवढेच लोक राहत आहेत. काल काश्मिरातील नौगाम येथे ज्या पोलिस स्थानकामध्ये अमोनियम नायट्रेटचा जप्त केलेला साठा ठेवला होता, त्याच्या परीक्षणासाठी नमुने घेताना त्याचा विस्फोट झाला व त्यामध्ये अनेक लोकांचा नाहक बळी गेला. जशी अमोनियम नायट्रेटमध्ये स्फोट घडविण्याची क्षमता आहे, तशीच क्षमता या समाजाच्या लोकसंख्या विस्फोटामध्ये आहे. जोपर्यंत या समाजामध्ये अगदी लहान मुलांना देखील भारतविरोधाचे व कट्टरवादी विचारसरणीचे शिक्षण दिले जाईल, तोपर्यंत हेच लहान मुलं कधी सैन्यावर दगडफेक करतील, तर कधी दहशतवादाच्या विविध कारवायांमध्ये सामील राहतील. हे अडाणी राहिले, तर मानवी बॉम्ब बनतील; भंगार गाडीत बॉम्ब ठेवतील; इंजिनीयर राहिले, तर ओसामा बिन लादेन बनतील; आणि डॉक्टर बनले, तर डॉ. शाहीन, डॉ. मुजम्मिलसारखे बनतील. म्हणजे शिक्षण घेऊन त्यांच्यामध्ये देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईलच असे सांगता येत नाही. एका अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेमध्ये मला भाषण देण्याचा योग आला होता. आपल्याला माहीत आहे की एमबीबीएससाठी खूप जास्त टक्केवारी असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश हा केवळ फारच हुशार विद्यार्थ्यांसाठी असतो आणि त्याहीपेक्षा जास्त टक्केवारी ही एम्ससारख्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी लागत असते.

ज्या वेळेस भाषण द्यायला मी तिथे गेलो होतो, त्या वेळेस काही विद्यार्थिनी हिजाब बांधून बसलेल्या होत्या. हिजाब ही त्यांची धार्मिक प्रथा आहे. प्रत्येकाने त्याच्या धार्मिक प्रथा पाळायला संविधानाने अनुमती दिलेली आहे. फक्त यातून डॉ. शाहीनसारखी दहशतवादी जन्माला यायला नको हे बघितले पाहिजे. शाहीन फक्त डॉक्टर नव्हती, तर ती प्राध्यापक सुद्धा होती. लोकांचे प्राण वाचविण्यासाठी डॉक्टर बनणारा माणूस लोकांचे प्राण कसे घेऊ शकतो? असा भोळा प्रश्न भारतातील लोकांना पडू शकतो. परंतु लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की अनपढ असले, इंजिनीयर असले, डॉक्टर असले, तरीसुद्धा त्यांची विचारसरणी जर धार्मिक कट्टरवादाची असेल, तर यातून आतंकवादच जन्माला येईल आणि हेच सर्व घडलेले आहे. आजपर्यंत एक लाखापेक्षा अधिक माणसे या दहशतवादामध्ये मारली गेलेली आहेत, तरीसुद्धा महाराष्ट्रातील व देशातील पुरोगामी नेते, काँग्रेस, कम्युनिस्ट, हिंदूंचे बुद्धिभेद करणारे लोक हे दहशतवाद्यांचा मुस्लिम समाजाशी संबंध जोडू नये असे म्हणतात. शहाबानो खटल्यामध्ये ज्या वेळेला शहाबानोने पोटगी मागितली होती, त्यावेळेस राजीव गांधींच्या काँग्रेसला वाटले होते की शहाबानोला जर पोटगी दिली तर मुस्लिम समाज नाराज होईल आणि आमची गठ्ठा व्होट बँक आमच्यापासून दूर जाईल. काँग्रेसच्या याच मानसिकतेने काश्मिरातील हजरत बल दर्ग्यामध्ये लपलेल्या अतिरेक्यांना बिर्याणी खाऊ घातली आहे.

दहशतवादाविरुद्ध आम्ही काही बोललो, तर मुस्लिम समाज नाराज होईल अशा पद्धतीचा ग्रह आमच्या हिंदू पुढाऱ्यांचा असतो. परंतु एकीकडे तुम्ही म्हणता की दहशतवाद्यांचा मुस्लिम समाजाशी संबंध नाही, मग दहशतवाद्यांना बिर्याणी खाऊ घालण्यापेक्षा गोळ्या का घालत नाही? कारण दहशतवादी हे मुस्लिम समाजाचे असले तरी त्यांचा संपूर्ण समाजाशी संबंध जोडला जाऊ नये, असे तुम्हीच म्हणता. शहाबानोला पोटगी दिल्याने मुस्लिम समाज कसा नाराज होईल ही काँग्रेस, कम्युनिस्ट आणि हिंदू धर्मातील तथाकथित बुद्धिवादी नेत्यांची समाजाचा बुद्धिभेद करण्याची खेळी आहे. दहशतवादाचा हिरवा रंग दिल्लीच्या रस्त्यावर पसरलेला आहे. जोपर्यंत दहशतवाद्यांची लढाई केवळ सर्वसामान्य समाज सोबत राहील, तोपर्यंत दहा बळी गेले काय आणि ५० बळी गेले काय, कोणाला त्याचा फारसा फरक पडणार नाही. परंतु दहशतवाद्यांचे हे कृत्य, त्यांची ही लढाई भारतासोबत आहे, भारतीय संविधानासोबत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. शांततेचा मार्ग सोडून समाजामध्ये अस्थिरता निर्माण करणे, लोकांचा जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेणे हे संविधानविरोधी आहे. असे कृत्य करणारे हे कुठल्याही विचारसरणीचे किंवा कुठल्याही धार्मिक विचारांचे असले तरी, परंतु त्यांची जागा तुरुंगातच असली पाहिजे. दहशतवादी आमच्या धर्माचे आहेत म्हणून कोणीही त्यांची पाठराखण करता कामा नये. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्या युद्धामध्ये लढणारे दोन्ही बाजूचे सैनिक मुसलमान आहेत. बलुचिस्तानमध्ये तेथील लोकांवर निर्दयी अत्याचार करणारे पण मुसलमान आहेत आणि अत्याचार सहन करणारे सुद्धा मुसलमान आहेत. अफगाणिस्तान पाकिस्तानातील सैनिकांना आपले शत्रू मानतो आणि बलुचिस्तानातील जनता पाकिस्तान आर्मीला आपला शत्रू मानते. ही शत्रू-मित्र परीक्षा आणि ओळख समाजाने सुद्धा कायम ठेवणे गरजेचे आहे. आतंकवादी हा आतंकवादीच आहे, तो इस्लामचा चेहरा नाही. त्याला गाडण्यासाठी कब्रस्तानामध्ये जागा सुद्धा दिली जाऊ नये. असे झाले तरच दहशतवाद पराभूत होईल. आणि मग दहशतवादाला हिरवा किंवा लाल रंग देण्याची आवश्यकता राहणार नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### सुरक्षा प्रथम, संधी सर्वांना

राजधानी दिलीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण देश हादरला आहे. स्फोटात मोठी हानी टळली असली तरी, या घटनेने राष्ट्रीय सुरक्षेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. प्राथमिक चौकशीनुसार, या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर स्फोटके, शस्त्रसामग्री आणि निधीचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी या प्रकरणाचा सर्वंकष तपास करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. ही घटना केवळ दहशतवादी कटापुरती मर्यादित नाही, तर ती देशातील सुरक्षाव्यवस्थेतील काही कमकुवत बाजूंकडेही लक्ष वेधते. उच्चशिक्षित व्यक्तीमधूनही समाजविघातक कृती होत असल्याचे आढळते, हे चिंताजनक आहे. त्यामुळे शासनाने शिक्षण, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा आणि प्रशासकीय नियुक्त्या यांसारख्या सर्व क्षेत्रांमध्ये सुरक्षा आणि पात्रतेचे निकष अधिक कडक करणे गरजेचे आहे.

सुरक्षा प्रथम, संधी सर्वांना या तत्त्वानुसार देशातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळावी, पण त्या सोबत राष्ट्रीय सुरक्षेशी कोणतीही तडजोड होऊ नये, हे सरकारने सुनिश्चित करणे गरजेचे आहे. सर्व सवलती, योजना आणि सुविधा या पारदर्शक आणि सुरक्षा तपासणीच्या चौकटीतूनच राबवाव्यात. आज देशासमोर सर्वांत मोठे आव्हान म्हणजे आतून आणि बाहेरून होणाऱ्या कटांना थोपविणे. या घटनेतून आपण सावध होऊन राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा आणि धोरणे अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. दोषींना कठोर शिक्षा आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना याच देशाच्या सुरक्षेचा पाया ठरतील.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

### जागृत गृहमंत्रालय

सध्या देशात नरसंहार घडविण्याचा घाट भारतातील काही देशद्रोही कंटकांनी उचलला आहे . गुजरात गृहमंत्रालयाने विषप्रयोगाला जायबंदी करून जागृतीची जाणीव इतर राज्यांना करून दिली आहे. विरोधी पक्ष मात्र भारतीय गृहमंत्रालयाला दिल्ली बॉम्बस्फोटाकरिता जबाबदार धरताना द्रोही नेटवर्कवर काहीच बोलत नाही! खरोखरच भारतीय गुप्तचर संस्था इतक्या मोठ्या लोकसंख्येवर लक्ष ठेवण्यासाठी पुरेशी आहे का? यावर विरोधी पक्षाने कधीतरी भाष्य का केले नाही? देशात शांतता राखण्यासाठी जेवढे सरकार जबाबदार आहे तेवढेच कर्तव्य लोकांचे नाही का? या देशाला लोकशाहीच्या नावाने जगात बदनाम करण्याचा एक नवे गोपनीय सूत्र वापरण्यात येत असेल तर गृहमंत्रालयाने त्यांचे हितचिंतक शोधून त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

●● ●●

### मृतांचे आधार कार्ड नष्ट करणे गरजेचे

जेव्हा एखादी नवीन यंत्रणा किंवा पद्धत अस्तित्वात येते तेव्हा जसे फायदे असतात तसे तोटेही असतात. त्याच बरोबर दोषही येतात. तसेच काही आधारकार्ड मृतांच्या बाबतीत घडले आहे. आता यूएआयडीतर्फे महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत, ग्रामपंचायत यांना अशी व्यवस्था करून द्यावी की जेव्हा नागरिक मृत्यू दाखला घ्यायला येतो तेव्हा त्या मृत व्यक्तीचे आधार कार्ड जमा करून त्याचे आधार कार्ड नंबर त्याच वेळी रद्द करण्यात यावे व त्यानंतर मृत्यू दाखला देण्यात यावा व मतदार यादीतून त्याचे नाव देखील काढून टाकण्यात यावे. अशी व्यवस्था झाल्यास अवैध मतदान होणार नाही व आधारकार्डद्वारे फसवणूक होणार नाही.

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

## आजचे संघगीत-४९

सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५

### अब जाग उठो कमर कसो...

अब जाग उठो कमर कसो मन्झिल की राह बुलाती है
ललकार रही हम को दुनिया भेरी आवाज लगाती है ॥धृ॥

है ध्येय हमारा दूर सही पर साहस भी तो क्या कम है
हम राह अनेकों साथी है कदमों में अंगद का दम है
असुरों की लन्का राख करे वह आग लगाने आते है ॥१॥

पग पग पर काटे बिछे हुये व्यवहार कुशलता हम में है
विश्वास विजय का अटल लिये निष्ठा कर्मठता हम में है
विजयी पुरखों की परम्परा अनमोल हमारी थाती है ॥२॥

हम शेर शिवा के अनुगमी राणा प्रताप की आन लिये
केशव माधव का तेज लिये अर्जुन का शरसन्धान लिये
सन्गठन तन्त्र की शक्ती ही वैभव का चित्र सजाती है ॥३॥

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत नर्मदा कनकी यांचे दुहेरी यश

**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

वार्षिक विज्ञान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धेत नू.म.वि मराठी शाळेतील सहशिक्षिका नर्मदा नरेश कनकी यांच्या 'देहदान आणि अवयवदान' या विषयावर लिहिलेल्या निबंधास खुल्या गटातून विभागीय स्तरावर दक्षिण महाराष्ट्रातून प्रथम तसेच महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांकाचे ३५०० रुपयाचे पारितोषिक प्राप्त होणार आहे. तसेच काल पुणे येथे झालेल्या द इंक अँड पेन यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शाई पेन हस्ताक्षर स्पर्धेत त्यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. पार्कर शाई पेनचा सेट, नावाचे बोर्ड आणि स्मृतीचिन्ह पारितोषिक म्हणून त्यांना प्राप्त झाले आहे. या दोन्ही राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.



### महापालिकेच्यावतीने बिरसा मुंडा यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस घनकचरा व्यवस्थापन अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, अशोक इंगळे, अशोक खडके, सिद्राम तम्मिगार उपस्थित होते.



### जि.प. शाळा अंत्रोळीच्या जाधव व बनसोडे यांचे विविध स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

जि प शाळा अंत्रोळी येथील शिक्षकांनी विविध स्पर्धेत यश मिळविले. कीर्ती जाधव यांनी तालुकास्तर रांगोळी स्पर्धेत प्रथम व पुष्पा बनसोडे यांनी भालाफेकमध्ये तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. सुगम गायन स्पर्धेत श्रीरंग बनसोडे यांनी द्वितीय स्थान मिळविले.

# जबरी चोरी करणाऱ्यास अटक; सोन्याच्या दागिन्यांसह ५५ किलो कॉपर वायर जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

जबरी चोरी करणाऱ्या टोळीतील सराईत गुन्हेगारास सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्याच्याकडून कार, सोन्याचे दागिने व ५५ किलो कॉपर वायर जप्त केली.

अमोल उर्फ विशाल शंकर पवार (वय-२१, रा.सवतगव्हाण, अकलूज, ता.माळशिरस) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. कुणाल परशु काळे, सोमनाथ दत्तू पवार, रवि सतीश काळे, दत्तू सुरेश काळे, दाद्या येंगाप्पा काळे (सर्वजण रा.सवतगव्हाण, अकलूज, ता.माळशिरस) अशी फरार आरोपींची नावे आहेत.

सवतगव्हाण येथील सराईत गुन्हेगार अमोल पवार हा त्याच्या साथीदारांसह एम.एच.११ ए.के.८६७४ या



क्रमांकाच्या कारमधून मोहोळ परिसरात चोरी करण्यासाठी येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली होती. त्यावरुन पोलिस पथकाने मोहोळ ते माळशिरस पालखी महामार्गावर सापळा लावला होता. त्यावेळी वेळापूर येथे मोहोळकडून माळशिरसकडे जाताना सदर कार ही दिसून आली.

पोलिसांनी त्या चालकास कार थांबविण्याचा इशारा केला असता त्याने कार तशीच दामटली. पोलिसांनी कारचा पाठलाग सुरु केल्यानंतर कारचालकाने तोंडले गावाजवळ हायवेवर कार थांबविली. त्यावेळी कारमधील संशयित आरोपी हे पळून जाऊ लागल्यानंतर पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला व अमोल पवार यास ताब्यात घेतले.

पोलिस पथकाने अमोल पवार याच्याकडे तपास केल्यानंतर त्याने व त्याच्या साथीदारांनी मिळून सोलापूर जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत १३ गुन्हे केल्याचे सांगितले. अमोल पवार हा अकलूज, सांगोला, टेंभुर्णी, कुर्डूवाडी, पंढरपूर, पुणे ग्रामीणमधील वडगा निंबाळकर, वालचंदनगर पोलिस ठाण्यातील जबरी चोरीच्या ११ गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. अमोल पवार यास मोहोळ पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, हवालदार सलीम बागवान, रवी माने, धनराज गायकवाड, वीरेश कलशेट्टी, अश्विनी गोटे, पोलिस शिपाई बाळराजे घाडगे, अन्वर अत्तार, हरिष थोरात, राहुल दोरकर, विनायक घोरपडे, मनोज राठोड, सूरज रामगुडे, सतीश बुरकुल यांनी ही कामगिरी पार पाडली.

**अमोल पवार हा सराईत गुन्हेगार**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेला अमोल पवार हा सराईत गुन्हेगार असून त्याने त्याच्या टोळीच्या माध्यमातून सोलापूर व पुणे जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत जबरी चोरीचे गुन्हे केले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ, अकलूज, कुर्डूवाडी, पंढरपूर तालुका, टेंभुर्णी, सांगोला, मंगळवेढा, नातेपुते पोलिस ठाण्याच्या हद्दीत तसेच पुणे जिल्ह्यातील वडगाव निंबाळकर, वालचंदनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे केले आहेत.

# जिल्ह्यातील १७ लाख नागरिकांची मधुमेह तपासणी

## ८८ हजार ६३८ रुग्णांवर उपचार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर**

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सोलापूर जिल्ह्यातील १६ लाख ६६ हजार १०६ नागरिकांची मधुमेह तपासणी करण्यात आली. त्यापैकी ८८ हजार ५३८ नागरिकांवर जिल्ह्यात उपचार सुरु आहेत. जागतिक मधुमेह दिनाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांतर्गत मधुमेह तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा, व्याख्याने, आरोग्य परिषदा आदींचा समावेश आहे.

आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर मधुमेह परिणाम करू शकतो. म्हणूनच, बाल्यावस्थेपासून वृध्दत्वापर्यंत मधुमेह प्रतिबंध, तपासणी आणि उपचार यावर भर देण्यात आला आहे. आरोग्यदायी आहार, नियमित व्यायाम, ताणतणाव नियंत्रण आणि वेळेवर तपासणी हे मधुमेह नियंत्रणाचे मुख्य घटक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**आनंदी जीवन जगावे**

आयुष्यात प्रत्येक क्षण धावपळीचा असल्याने मानसिक स्वास्थ्य व शरिरावर परिणाम होऊन विविध व्याधी व आजार होत आहेत. त्यामुळे मधुमेह होण्यास वाव मिळतो. म्हणून माणसांने जीवन जगताना कोणत्याही गोष्टीचे ताण न घेता आनंदी जीवन जगावे. त्यामुळे मधुमेहावर मात करता येऊ शकते.

**डॉ. संतोष नवले,**
जिल्हा आरोग्याधिकारी, सोलापूर



# मुस्लिम बांधवांनी बांधून घेतले शिवबंधन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

शहर मध्य विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्रमांक २१ येथील सामाजिक कार्यकर्ते इस्माईल मकानदार यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अनेक मुस्लिम बांधव शिवसेनेच्या झेंड्याखाली एकत्र येत आहेत. शिवबंधन बांधून त्यांना पक्षात प्रवेश देण्यात आला.

जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी सर्वांचे स्वागत केले. आजच्या या प्रवेशासाठी सिकंदर नदाफ यांनी मेहनत घेतली.

यावेळी अंबादास चव्हाण, सुशील उपलप, महिबूब पठाण, सिकंदर नदाफ, शाम कदम, महिबुब पठाण, अमजद मुल्ला, हाजी शेख, युवराज गायकवाड, रियाज बागवान, रशीद शेख, अल्ताफ शेख, शाहरुख पठाण, राजु खान पठाण, शाहिद शेख, जाबीर शेख, रफीक शेख, मोहसीन पठाण, तौसिफ शेख, इकरार शेख, शाहनवाज शेखसंदी, महिबुब अत्तार, सद्दाम नदाफ, मोहसीन धोटेघर यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# पद्मश्री अ‍ॅड.उज्वल निकम यांची बुधवारी प्रकट मुलाखत

## शिवछत्रपती रंगभवनमध्ये मसाप दक्षिण शाखेकडून आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**



राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर गाजलेल्या विविध खटल्याचे विशेष सरकारी वकील पद्मश्री उज्वल निकम यांची प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन मध्ये आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.

माझा जीवन प्रवास जळगाव ते दिल्ली व्हाया मुंबई या अंतर्गत पद्मश्री खासदार अ‍ॅड उज्वल निकम यांची मुलाखत होणार असून माधव देशपांडे हे मुलाखत घेणार आहेत. जळगावचे सुपुत्र असलेले अ‍ॅड. उज्वल निकम यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील पोलीस शिपाई धुळा कोळेकर या गाजलेल्या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून मोठी जबाबदारी पार पाडली होती. त्याचबरोबर त्यांनी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यात तसेच राज्यातील आणि देशातील विविध खटल्यात सरकारची बाजू त्यांनी योग्य प्रकारे मांडून पिडीतांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याने भारत सरकारकडून त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सध्या ते राज्यसभेचे सदस्य असून खासदार म्हणून त्यांनी नुकतेच कामकाज सुरू केले आहे. अशा या देशभक्ताचा जीवनप्रवास कसा आहे याचा उलगडा होवून आजच्या पिढीला मार्गर्शक ठरणार आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, अभय जोशी, अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी कार्यरत आहेत.



# किशोरावस्था ही आयुष्यातील महत्वाची पायरी : कांबळे

## सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

किशोरावस्था ही आयुष्याच्या प्रवासातील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. या काळात शारीरिक, मानसिक आणि भावनिक असे तिन्ही स्तरांवर वेगाने बदल घडत असतात. शरीराची उंची वाढणे, स्नायू आणि हाडांची मजबुती, हार्मोन्सचे बदल, मेंदूची कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता या सर्वांवर योग्य आहाराचा थेट परिणाम होतो. त्यामुळे या वयोगटातील मुलांनी व पालकांनी आहाराबाबत जागरूक राहणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे किशोरावस्थेच्या योग्य वाढीसाठी सकस आणि सात्विक आहारच उत्तम पर्याय आहे असे प्रतिपादन कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा कांबळे यांनी केले.

त्या प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर सोलापूर तालुका येथील नान्नज गावातील जी. बी. घोडके विद्यालयात तीन दिवसीय सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य रमेश अगलदीवठे, सुशांत घोडके, शुभांगी माने, सचिन कोरे, गिरीश देवकाते, मुकुंद भोसले, विकी शिवशरण, उर्मिला बनसोडे, संध्या वाघमारे आदी उपस्थित होते.

इयत्ता ७ वी ते १० पर्यंतच्या मुलांना विकी शिवशरण, उर्मिला बनसोडे व संध्या वाघमारे यांनी किशोरावस्था वाढीचे टप्पे, किशोरावस्था व आहार, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, मासिकपाळी स्वच्छता, शारीरिक सौरचना, चांगला व वाईट स्पर्श, एच.आय.व्ही/एड्स, कॅन्सर, सायबर गुन्हे, पोक्सो अ‍ॅक्ट, शारीरिक सौरचना आदी विषयावर जागृत केले. शेवटच्या दिवशी सर्व मुलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली व गरजू मुलींना रक्त वाढीसाठी औषधे देण्यात आली. प्रास्ताविक विकी शिवशरण यांनी केले सूत्रसंचालन उर्मिला बनसोडे यांनी केले तर आभार संध्या वाघमारे यांनी मानले.

# डेअरीला १ लाख ८० हजार लिटर दूध घेऊन ५१ लाखांची फसवणूक

## बारामतीच्या रियल डेअरीच्या चेअरमन, मॅनेजरसह चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

सुमारे १ लाख ८० हजार लिटर दुध घेऊन त्याचे पैसे मागितले तर खोटी पोलिस केस करण्याची तसेच ठार मारण्याची धमकी देत ५० लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बारामती येथील रियल डेअरीच्या चेअरमन, मॅनेजरसह चौघांविरुध्द मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बंडू सुखदेव लेंडवे (वय ५०, रा. आंधळगाव, ता. मंगळवेढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रियल डेअरी व फॉर्च्यून डेअरी बारामतीचे चेअरमन मनोज कुंडलिक तुपे, दुध संकलन अधिकारी प्रविण शिवाजी तावरे, बाबूराव नकाते, मॅनेजर सुशांत ज्ञानदेव शिर्के (रा. बारामती, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंडू लेंडवे यांचे आंधळगाव येथे पांडुरंग दूध संकलन केंद्र आहे. बारामतीच्या रियल डेअरीच्या चेअरमन, मॅनेजर, दुध संकलन अधिकाऱ्यांनी लेंडवे यांना विश्वासात घेऊन सन २०२१ मध्ये पांडुरंग दुध संकलन केंद्राचे दुध हे रियल डेअरी व फॉर्च्यून डेअरी येथे पाठविण्यास सांगितले. त्यानुसार लेंडवे यांनी सुरूवातीला पाठविलेल्या दुधाचे बिल डेअरीकडून देण्यात आले. त्यानंतर लेंडवे यांना फसविण्याच्या उद्देशाने डेअरीतील वजनकाटा कर्मचाऱ्यांशी संगनमत करून दुधाचे वजन वाढवून घेतले असे म्हणून डेअरीकडून लेंडवे यांच्यावर केस केली व सुरळीत असणारा दुध पुरवठा बंद केला. त्यामुळे लेंडवे यांनी १ जानेवारी २०२२ ते २९ जानेवारी २०२२ या कालावधी १९ टँकरमधून १ लाख ७९ हजार ५०८ लिटर दुध पाठविलेली रक्कम ५१ लाख ५१ हजार ७०७ रुपयांची रक्कमेची मागणी डेअरीकडे केली. त्यावेळी डेअरीचे चेअरमन मनोज तुपे, मॅनेजर सुशांत शिर्के, दुध संकलन अधिकारी प्रविण तावरे, बाबूराव नकाते यांनी लेंडवे यांना दुधाच्या पैशाची मागणी केली आणि पुन्हा बारामतीमध्ये दिसला तर पुन्हा खोटी पोलिस केस करण्याची धमकी देत ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे याबाबत फसवणुक झाल्याबाबत लेंडवे यांनी मंगळवेढा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सहायक पोलिस निरीक्षक लातूरकर पुढील तपास करीत आहेत.

### खरेदी पुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः मौजे दिंडेगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीरप्रगटनव्दारे सुचित करण्यांत येते की, मौजे दिंडेगाव, ता. तुळजापूर, येथील जमीन **गट नं. २ यापैकी क्षेत्र ०९ हे. ४८ आर.,** आकार रु. १६-४८ पैसे, ही जमीन गणेश आप्पासाहेब बुवा, रा. दिंडेगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची जमीन असून, तशी सदर जमीनीच्या ७/१२ रेकॉर्डला त्यांच्या नांवाची रितसर नोंद आहे. सदर जमीनीच्या क्षेत्रापैकी **०२ हे ०० आर.,** या जमीनीच्या चर्तुःसिमा पुर्वेस-तुळजापूर-अक्कलकोट रोड, पश्चिमेस दिंडेगाव गाव रोड, दक्षिणेस-गणेश आप्पासाहेब बुवा, यांची उर्वरीत जमीन, उत्तरेस-सरकारी कॅनाल, वरील चर्तुः सिमेच्या आतील जमीन ही आमचे आशिल नामे-संतोष जनार्धन पाटील, रा. चिवरी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांचे सोबत विक्रीचा ठराव केलेला असून, त्यासाठी जमीन मालकांना इसाराही दिलेला आहे व ठरावाची उर्वरीत रक्कम देवून खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदर जमीन ही निर्वेध व निर्जोखीम असल्याची खात्री जमीन मालक नामे-गणेश आप्पासाहेब बुवा यांनी आमचे आशिल **नामे-संतोष जनार्धन पाटील** यांना दिलेली आहे.

तथापि सदरच्या मिळकतीबद्दल कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण दान, पोटगी, लीज, बक्षीस वगैरे तत्सम हक्क हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आंत विधीज्ञांकडे लेखी कागदपत्रासह हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणतीही तक्रार वा हरकत न आलेस, सदरची मिळकत निर्वेध व निर्जोखीम आहे, असे समजून आमचे आशिल खरेदीखताचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कोणतीही हरकत वा तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसवणुक होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे.

**सबब ही जाहीर प्रगटन दिले असे.**
**दिनांक :- १६/११/२०२५**

**मार्फत**
स्वाक्षरित/-
**(फारुख एस.शेख)**
**अ‍ॅडव्होकेट,**
**तुळजापूर.**
**मो.क्र. ९८५०४०२६५६**

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**
**E-TENDER NOTICE NO: 2025_DOAWB_1246612**
**(Supply, Installation, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic rice Mill Machinery)**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Asgaonkar Agro Farmer Producer Company Ltd. Asgoan, Tah. Paoni, Dist. - Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The last date for submission of online bid is **16/12/2025 up to 01.00 PM**. Any updates or notices shall be published on aforementioned website only.
**District Implementation Unit, SMART Project, Dist.: Bhandara**

### जाहीर समन्स

रेमूनं, १००९/२०२१
**सोलापुर येथील मे. सिव्हिल जज्ञ सिनियर डिव्हिजन न्यायालय सो, यांचे कोर्टात**
(मे. भोसले मॅडम जज्ज साहेब) निशान नं.

मे. सोलापुर ई कॉन रेसिफाईनचे भागीदार,
१) श्री. दुर्गाप्रसाद मुरलीधर मिणीयार
२) श्री. गुलाबचंद जिवराज शहा
३) श्री. उदय दुर्गादास मिणीयार
४) श्री. निलय विपुल शहा,
वादी नं. १ ते ४ यांचे कुलमुखत्यारधारक म्हणुन
श्री. दुर्गाप्रसाद मुरलीधर मिणीयार
रा. ४४/३, महावीर भगवती सोसायटी, सम्राट चौक,
सोलापुर. ४१३००३. **-- वादी**

**विरुध्द**

**श्री. वैभव विलास कुलकर्णी**
वय : ४१ वर्षे, धंदा व्यापार,
रा. इंडियन मॉडेल स्कुल समोर, जुळे सोलापुर **-- प्रतिवादी**

ज्याअर्थी वादी मे. सोलापूर ई कॉन यांनी प्रतिवादीविरुध्द मे. कोर्टात दावा दाखल केला असुन सदर दाव्याचे समन्स अनेकदा पाठविले असता, सदरहूकामी प्रतिवादीस में. कोर्टातर्फे अनेकदा बेलिफमार्फत समन्स काढले असता, प्रतिवादी हा दिलेल्या नमुद पत्त्यावर अनेक वर्षापासुन रहात नाही, असा बेलिफ रिर्पोट आल्यामुळे तो समन्स न बजावता परत आले आहे व मे. कोर्टानी सदर प्रतिवादी यांना जाहिर समन्सव्दारे समन्स बजावणीचा हुकुम केला आहे.

त्याअर्थी प्रतिवादी यांना सदर जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, सदर दाव्याचेकामी प्रतिवादीचे व कोणाचेही कसल्याही प्रकारचे काही हरकत अथवा म्हणणे असल्यास हि जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासुन मे. कोर्टानी दिलेली तारीखः१८/१२/२०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. अन्यथा याप्रकरणी प्रतिवादीस काही सांगावयाचे नाही, असे ग्रहीत धरुन सदर दाव्याचे एकतर्फी सुनावणी केली जाईल, याची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/११/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपीक**

शिक्का

**हुकुमावरुन**
**सही/-**
**सहा अधिक्षक मे. जिल्हा न्यायालय सो**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत ईश्वरी पांडेचे दुहेरी यश



**नागपूर** : नागपूरची दृष्टिहीन जलतरणपटू ईश्वरी पांडे हिने २५व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत ५० मी. बॅकस्ट्रोकमध्ये सुवर्णपदक व १०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्यपदक पटकाविले. ही स्पर्धा बीएमसी बालयोगी अक्वेटिक कॉम्प्लेक्स, गाचीबावली, हैदराबाद सुरू आहे. यापूर्वी ईश्वरीने ५० मीटर बॅकस्ट्रोक, ५० ब्रेस्ट स्ट्रोक आणि १०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक प्राप्त केले आहे. प्रशिक्षक संजय बाटवे यांनी सांगितले की, ईश्वरी एक अत्यंत मेहनती जलतरणपटू आहे. प्रचंड आत्मविश्वास आणि मेहनतीच्या भरवशावर ईश्वरीने राष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे. ईश्वरी स्थानिक शार्क ॲक्वाटिक स्पोर्टिंग असोसिएशनची जलतरणपटू आहे. ती एनआयटी जलतरण तलावावर नियमित सराव करते. या यशाबद्दल प्रशिक्षक व खेळाडूंनी ईश्वरीचे अभिनंदन केले आहे.

### धुनषचा सुवर्णभेद मुर्तझला रौप्यपदक

**टोकियो** : येथे आयोजित डेफलिम्पिकमध्ये रविवारी नेमबाज धनुष श्रीकांतने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताचे खाते उघडले. २०२२ मध्ये कॅक्सियास दो सुल (ब्राझील) येथे वयाच्या १९ व्या वर्षी डेफलिम्पिकमध्ये पदार्पण करणाऱ्या व लगेचच दोन सुवर्णपदके जिंकून मोठी कामगिरी करणाऱ्या २३ वर्षीय श्रीकांतने आणखी एक उत्कृष्ट कामगिरी केली आणि अव्वल स्थानावर पोहोचताना २५२.२ चा डेफ फायनल वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला. भारताच्या मोहम्मद मुर्तझा वानियाने अंतिम फेरीत २५०.१ गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर दक्षिण कोरियाच्या बेक सेउंघकने २२३.६ गुणांसह कांस्यपदक जिंकले. हैदराबादमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या श्रीकांतने ६३०.६ गुणांसह अंतिम फेरीत प्रवेश केला, हा डेफलिम्पिक विक्रम आहे, तर मुर्तझा (६२६.३) हा दुसऱ्या क्रमांकावर होता. धनुषने डेफलिम्पिक व आणि डेफ फायनल दोन्ही जागतिक विक्रम मोडून पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल डेफलिम्पिकमध्ये दुसरे सुवर्णपदक पटकावले.

### बुमराहचा नवीन गोल्डन विक्रम

**नवी दिल्ली** : ईडन गार्डन्स स्टेडियमवर भारताने गमावलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने दोन्ही डावांमध्ये एकूण सहा बळी टिपले. त्याने पहिल्या डावात पाच बळी टिपले, तर दुसऱ्या डावात तो केवळ एकच बळी टिपू शकला. तथापि, या एका बळीसह बुमराहने एक महत्त्वाचा टप्पा गाठला. गत दोन वर्षांत कोणत्याही गोलंदाजाने ही कामगिरी केलेली नाही. जसप्रीत बुमराह गत दोन वर्षांत कसोटी क्रिकेटमध्ये १०० बळी टिपणारा पहिला गोलंदाज आहे. बुमराहने २०२४ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये ७१ बळी टिपले व २०२५ मध्ये त्याने आतापर्यंत २९ बळींची नोंद केली आहे. अशा प्रकारे, गत दोन वर्षांत त्याने १०० बळी टिपले आहेत. या काळात बुमराहने एकूण २० सामने खेळले आहेत आणि तो सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. बुमराहची सर्वोत्तम कामगिरी ४५ धावांमध्ये सहा बळी आहे. २०२४ पासून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी टिपणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद सिराज बुमराहनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. सिराजने २२ सामन्यांमध्ये ४२ डावात ७६ बळी घेतल्या आहेत. इंग्लंडचा शोएब बशीर १९ सामन्यात ६८ बळी घेतल्या आहेत. भारताचा रवींद्र जडेजा २१ सामन्यात ६७ बळी टिपत यादीत चौथ्या क्रमांकावर आहे.

### भारताची आशा अर्जुनवर; पी. हरिकृष्ण पराभूत

**पणजी** : रविवारी येथे पाचव्या फेरीत टायब्रेकमध्ये ग्रॅण्डमास्टर पी. हरिकृष्ण पराभूत झाल्यानंतर फिडे विश्वचषक २०२५ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या आशा दुसऱ्या मानांकित ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगासीवर अवलंबून असतील. अर्जुनने दोन शास्त्रीय सामन्यांमध्ये दोन वेळा विजेत्या ग्रॅण्डमास्टर लेव्हॉन एरोनियनला १.५-०.५ ने पराभूत केले होते, तर दोन्ही शास्त्रीय सामन्यांमध्ये बरोबरी साधल्यानंतर हरिकृष्णाला मार्टिनेझ विरुद्ध टायब्रेक जिंकावा लागला. १५ मिनिटांच्या वेळेचे नियंत्रण असलेले पहिले दोन रॅपिड गेम देखील बरोबरीत सुटले. हरिकृष्णने दुसऱ्या गेममध्ये काळ्या खेळाडूसह जिंकणे आवश्यक असलेल्या परिस्थितीचा सामना केला परंतु केवळ ड्रॉ मिळवू शकला आणि ३० चालींमध्ये तो स्पर्धेतून बाहेर पडला. सोमवारी होणाऱ्या उपात्यपूर्व फेरीत अर्जुनचा सामना चीनच्या ग्रॅण्डमास्टर वेई यीशी होईल, शँकलँडचा सामना एसिपेंकोशी होईल आणि मार्टिनेझचा सामना ग्रॅण्डमास्टर जावोखिर सिंदारोव्हशी होईल.

# दक्षिण आफ्रिकेचा ३० धावांनी विजय

**भारतीय संघ ९३ धावांत गारद**

**१५ वर्षांनंतर जिंकली भारतात कसोटी**

**सामनावीर सायमन हार्मर**



विजयाचा आनंद साजरा करताना दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू

**कोलकाता, १६ नोव्हेंबर**

कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्याच दिवशी दक्षिण आफ्रिकेने भारताचा ३० धावांनी पराभव केला. गत १५ वर्षांत पहिल्यांदाच दक्षिण आफ्रिकेने भारतात कसोटी सामना जिंकला आहे. पहिल्या व दुसऱ्या डावांत प्रत्येकी ४ बळी असे आठ बळी टिपणारा फिरकीपटू सायमन हार्मर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

दक्षिण आफ्रिकेने भारतात शेवटचा कसोटी सामना २०१० मध्ये जिंकला होता. नागपूरमध्ये खेळलेला तो कसोटी सामना दक्षिण आफ्रिकेने एक डाव व ६ धावांनी जिंकला. परंतु, त्यानंतर दक्षिण आफ्रिकेला भारतात एकही कसोटी जिंकता आली नव्हती, मात्र यावेळी भारत दौऱ्यावर दक्षिण आफ्रिकेने ही पराभवाची मालिका खंडित केली. या विजयाबरोबरच दक्षिण आफ्रिकेने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेचा संघ १५९ धावांवर बाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून एडन मार्करामने सर्वाधिक ३१ धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने डावाची सुरुवात केली. मोहम्मद सिराज व कुलदीप यादवने प्रत्येकी दोन बळी टिपले. अक्षर पटेलनेही एक बळी टिपला. प्रत्युत्तर देताना भारतीय संघाचा पहिला डाव १८९ धावांत आटोपला व त्यांना केवळ ३० धावांची आघाडी मिळविता आली.

भारतीय संघाला किमान ३०० धावा करून काही धावांची आघाडी घेण्याची अपेक्षा होती. तथापि, यजमान संघ हे साध्य करू शकला नाही. भारताकडून केएल राहुलने सर्वाधिक ३९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने ४ बळी घेतले, तर मार्को जॅन्सनने ३ बळी टिपलेत. केशव महाराज व कॉर्बिन बॉशने प्रत्येकी एक बळी घेतला.

**पहिल्या डावात शुभमन गिल जखमी झाला**

भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल पहिल्या डावात दुखापतग्रस्त झाला व केवळ तीन चेंडू खेळल्यानंतर तो जखमी वित्त झाला. त्याला मानेचा त्रास झाला आणि तो सध्या रुग्णालयात दाखल आहे.

दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेला १५३ धावांवर रोखण्यात आले. कर्णधार टेम्बा बावुमाने सर्वाधिक ५५ धावा केल्या. तो नाबाद परतला. त्याच्या खेळीमुळे दक्षिण आफ्रिकेने भारतासमोर १२४ धावांचे लक्ष्य ठेवले. दुसऱ्या डावात भारताकडून रवींद्र जडेजा ४ बळी घेतले. मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादवने प्रत्येकी २ बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेलने प्रत्येकी एक बळी घेतला.

१२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा संघ केवळ ९३ धावांवर गारद झाला व सामना ३० धावांनी गमावला.

कर्णधार शुभमन गिल आधीच सामन्यातून बाहेर झाला होता, त्यामुळे तो फलंदाजीसाठी उपलब्ध नव्हता. भारताचा फलंदाजीचा क्रम पूर्णपणे वाईट झाला. वॉशिंग्टन सुंदर (३१), रवींद्र जडेजा (१८) आणि अक्षर पटेल (२६) शिवाय सर्वांनी हार पत्करली. दक्षिण आफ्रिकेकडून फिरकीपटू सायमन हार्मरने ४ बळी घेतले. केशव महाराज व मार्को जानसेनने प्रत्येकी दोन बळी घेतले. एडन मार्करामनेही एक बळी घेतला.

(वृत्तसंस्था)



सायमन हार्मरचे ८ बळी

# शुभमन गिलची दुखापत गंभीर

**कर्णधार अति दक्षता विभागात दाखल**

**कोलकाता, १६ नोव्हेंबर**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवसाच्या सुरुवातीपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. कर्णधार शुभमन गिल उर्वरित सामन्यातून बाहेर झाला आहे. दुसऱ्या सामन्यातील त्याचा सहभाग अद्याप अनिश्चित आहे.

मानेला झालेल्या दुखापतीमुळे त्याला कोलकाता येथील वुडलँड्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती बिघडत चालली आहे आणि आता त्याला अति दजक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. दुसऱ्या दिवसाच्या खेळादरम्यान शुभमन गिल केवळ तीन चेंडू खेळू शकला. सायमन हार्मरच्या चेंडूवर स्वीप शॉट खेळताना त्याला अस्वस्थ वाटले. त्याने मान धरली आणि वैद्यकीय मदत घेतली. त्यानंतर त्याला स्कॅन आणि चाचण्यांसाठी रुग्णालयात नेण्यात आले. गिल सुरुवातीपासूनच अति दक्षता विभागामध्ये आहे, परंतु हे केवळ निरीक्षणासाठी आहे. त्याच्यावर डॉ. सप्तर्षी बसू यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. गिलच्या मानेला दुखापत झाली असून तो वैद्यकीय देखरेखीखाली आहे, अशी पुष्टी बीसीसीआयने केली आहे.



(वृत्तसंस्था)

### मीनाक्षी, प्रीती, अंकुश, नरेंद्रची पदके निश्चित

**ग्रेटर नोएडा** : विश्वविजेती मीनाक्षी, प्रीती, अंकुश फांगल आणि नरेंद्र बेरवालने २०२५ च्याजागतिक मुष्टियुद्ध चषक फायनल स्पर्धेच्या पहिल्या दिवशी प्रभावी विजयांसह चारही पदके निश्चित करत भारताला दणदणीत सुरुवात करून दिली. मीनाक्षीने (४८ किलो) कझाकस्तानच्या बोलाट अकबोटाविरुद्ध विजय मिळविला. त्यानंतर प्रीतीने (५४ किलो) उझबेकिस्तानच्या माजी युवा विश्वविजेत्या निगीना उक्तामोवाला पराभूत केले. अंकुश फांगलने (८० किलो) जपानच्या गो वाकायावर तर.नरेंदर बेरवालने युक्रेनच्या आंद्री खलेत्स्कीवर विजय मिळवला.

# आव्हानाशी जुळवून घ्यायला हवे होते : पंत

**कोलकाता, १६ नोव्हेंबर**

फलंदाजांनी ईडन गार्डन्सच्या अवघड खेळपट्टीवर खेळण्याच्या आव्हानाशी जुळवून घ्यायला हवे होते, असे उपकर्णधार ऋषभ पंत म्हणाला.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्या कसोटीत १२४ धावांचा पाठलाग करण्यात भारताला अपयश आले, त्याबद्दल त्याने दु:ख व्यक्त केले. भारताचा दुसरा डाव ९३ धावांतच आटोपला. आम्हाला त्याचा पाठलाग करता आला असता. आम्ही परिस्थितीशी जुळवून घेऊ शकलो नाही. आम्हाला दबाव सहन करून फायदा उठवता यायला हवा होता, असे दुखापतग्रस्त नियमित कर्णधार शुभमन गिलच्या अनुपस्थितीत सामन्यानंतरच्या सादरीकरण समारंभासाठी आलेला पंत म्हणाले.

गुवाहाटी येथील दुसऱ्या कसोटीत यजमान संघ अधिक मजबूतपणे परत येईल, असा विश्वास त्याने व्यक्त केला. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा आणि कॉर्बिन बॉश यांच्यातील आठव्या गड्यासाठी ४४ धावांची भागीदारी हा सामन्याचा टर्निंग पॉइंट होता. सकाळी टेम्बा आणि बॉशने चांगली भागीदारी केली.

# खेळपट्टी खेळण्यायोग्य नव्हती : गंभीर

**कोलकाता, १६ नोव्हेंबर**

ईडन गार्डन्सची खेळपट्टी खेळण्यायोग्य नव्हती. आम्ही अशीच खेळपट्टी मागितली होती व आम्हाला हवी तशीच मिळाली. येथील क्युरेटर सुजन मुखर्जी खूप आधार देणारे होते. ही अशी खेळपट्टी आहे, जी तुमच्या मानसिक कणखरतेचे मूल्यांकन करू शकते, कारण चांगल्या बचावाने खेळणाऱ्यांनी धावा केल्या, असे भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत म्हटले. असे म्हणत गंभीरने रविवारी ईडन गार्डन्सच्या कठीण खेळपट्टीचा जोरदार बचाव केला.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १२४ धावांचा पाठलाग करताना भारताचा संघ ९३ धावांतच संपला आणि येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३० धावांनी हार मानली.

गंभीरने नंतर टेम्बा बावुमा (नाबाद ५५) आणि वॉशिंग्टन सुंदर (९२ चेंडूत ३१) यांचे उदाहरण देऊन आपला युक्तिवाद सत्यापित केला.



आम्हाला नेमकी हीच खेळपट्टी हवी होती. ही खेळपट्टी खेळण्यासारखे नव्हती. अक्षर, टेम्बा, वॉशिंग्टनने धावा केल्या. जर तुम्ही म्हणाल की ही वळण घेणारी खेळपट्टी आहे, तर बहुतेक बळी वेगवान गोलंदाजांनी घेतल्या, असे ते म्हणाले. आम्ही पहिल्या दिवसापासूनच फिरकीपटूंना मदत करण्यासाठी खेळपट्टीची मागणी केली होती, जेणेकरून नाणेफेक महत्त्वाचा ठरू नये. जर आम्ही कसोटी जिंकलो असतो तर तुम्ही खेळपट्टीबद्दल इतके विचारले नसते किंवा चर्चा केली नसती. कारण आमच्याकडे कोणत्याही परिस्थितीत कामगिरी करण्यासाठी खेळाडू आहेत, असे ते म्हणाले.

दुखापत झालेल्या कर्णधार शुभमन गिलच्या स्थितीबद्दल अपडेट देताना गंभीर म्हणाले की, गिलचे अजूनही मूल्यांकन केले जात आहे. फिजिओ आज निर्णय घेतील.

(वृत्तसंस्था)



## गांधी नाथा रंगजी विद्यालयास टेनिक्कॉईट स्पर्धेत तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १९ वर्षांखालील मुलींचा गटात तृतीय स्थान संपादिले. या खेळाडूना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे, सरोजना मुलिंटी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**संघ :** कादंबरी लोकरे, तनुश्री बद्दुरकर, अमृता जेंबगी, समृद्धी पतंगे, समृद्धी कवठेकर, अक्षदा मदने.



## श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

श्री स्वामिनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल, कुंभारी येथे वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन रमेश मुळगावकर सर व बजरंग कापसे यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापक सुधीर धुळम यांनी विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. या सप्ताहात क्रिकेट, हॉलीबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ आदी खेळांचा समावेश होता. या कार्यक्रमात संस्थेचे आचार्य श्री विश्वमंगलदास स्वामीजी, श्री ब्रह्मस्वरूपदास स्वामीजी यांचे आशीर्वाद लाभले. क्रीडा शिक्षक राजेश येमूल यांनी आभार मानले. तुकाराम शेंडगे, मनोज बाळगे, दिनेश सारंगी यांनी परिश्रम घेतले.



## सान्वी गोरेची राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ नोव्हेंबर-**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांच्यावतीने राज्यस्तरावर घेण्यात आलेल्या शालेय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या सान्वी गोरे हिने घवघवीत यश संपादन केले.

कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा येथे झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये १४ वयोगट मुलींमध्ये राज्यातून तृतीय क्रमांक मिळवत राज्याच्या यादीत येण्याचा मान मिळवला. या खेळासाठी संघ व्यवस्थापक म्हणून अतुल नलगे यांनी काम पाहिले. सर्व खेळाडूंना क्रीडाशिक्षक पुष्कराज पाटील, योगेश उपळकर व विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सान्वी गोरेचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ मिराताई यादव व एस.बी. शेळवणे, सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## प्रताप मंडळाच्या बालक्रीडा स्पर्धेत १ हजार ६८० खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ नोव्हेंबर-**

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शंकरनगर-अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी बालक्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

स्पर्धेचे उद्घाटन श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय, कोथरूड शाखेच्या सभापती ऋतुजादेवी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते व मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या व बाल खेळाडूंच्या शुभहस्ते सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर मैदान पूजनाने व आकाशात कबुतरे सोडून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

स्पर्धेत तालुक्यातील ११ शाळांमधून सहा विविध खेळप्रकारात ९०२ मुले व ७७८ मुली असे एकूण १६८० बाल खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला.



स्पर्धेतील या विजेत्या प्रथम तीन खेळाडूंना अनुक्रमे तीन चाकी सायकल, कॅरम बोर्ड, स्कुल बॅग, टिफिन बॉक्स व प्रमाणपत्र तर चतुर्थ व पंचम क्रमांकास प्रमाणपत्र देण्यात आले. सर्व सहभागी खेळाडूंना खाऊ वाटप करण्यात आले. मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते विजेत्या स्पर्धेकांना बक्षीसांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धाप्रमुख शिवाजी पारसे, भानुदास आसबे, संजय राऊत, अर्जुन बनसोडे, यशवंत माने-देशमुख, सर्व पंच, क्रीडा शिक्षक, मंडळाचे सर्व संचालक, शाखाप्रमुख, मंडळाचे सदस्य, पालक, प्रेक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन राजकुमार पाटील यांनी केले. आभार भानुदास आसबे यांनी मानले. सर्व समितीतील सदस्यांच्या अचूक नियोजनमुळे स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाली.

**स्पर्धेतील गटनुसार प्रथम तीन विजेते पुढील प्रमाणे**

**लहानगट -** डोक्यावर चेंडू घेऊन पळणे (४0 मी.) या गटात (मुली) प्रथम -संजीवनी मगर द्वितीय-आरुवी शिंदे, तृतीय -उमामा बागवान, (मुले) प्रथम -विराज शिगवण, द्वितीय -कार्तिक कोडग, तृतीय -शिवांश जाधव

**मोठा गट -** धावणे (६0मी.) या गटात (मुली) प्रथम -समयरा शेख, द्वितीय -काव्या बडे, तृतीय-स्वंसंस्कृती भगत (मुले) - प्रथम - हसनैन शेख, द्वितीय - ध्रुवतेज देशमुख, तृतीय - विनायक इंगळे. इयत्ता १ ली कमरेवर हात ठेऊन उड्या मारत जाणे (४0 मी.) (मुली) प्रथम - शिवश्री भगत , द्वितीय -द्रिशा घनवट, तृतीय- अक्षरा गुरवे , (मुले) - प्रथम - रुद्राक्ष साठे, द्वितीय - प्रतीक जाधव , तृतीय - माऊली गवळी,

इयत्ता २ री. लंगडी घालत जाणे (४0मी.) (मुली)- प्रथम - आरोही पवार , द्वितीय - स्वरांजली क्षिरसागर, तृतीय - सायली भोंग, (मुले) - प्रथम- हुसैन शेख , द्वितीय- विश्वा शेळके , तृतीय - हितेश यादव,

**इयत्ता ३ री -** तीन पायाची शर्यत (४0 मी.) (मुली) -प्रथम - कृष्णप्रिया मिटकल- राजनंदिनी जाधव द्वितीय- ईश्वरी चव्हाण- तनुजा वरपे, तृतीय- वैष्णवी शिगवण- साक्षी जाधव,

**(मुले) प्रथम -** गणेश काळे- रियांश येवले, द्वितीय - निरंजन पवार- इंद्रनील खरात, तृतीय - राजवीर यादव- मुशाहिदरजा नदाफ

**इयत्ता ४ थी -** पोत्यात पाय घालून उड्या मारत जाणे (५0 मी.)(मुली) - प्रथम- संचिता लवटे, द्वितीय- स्वरांजली पवार , तृतीय- आरोही माने

**(मुले)- प्रथम -** शिवजीत जाधव , द्वितीय - मानव काटकर, तृतीय- शिवतेज भोसले या खेळाडूंनी विजेतेपद पटकावले.

## महत्वाचे...

# बार्शीत नगराध्यक्षासाठी एक तर नगरसेवकासाठी ६४ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१६ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सातव्या दिवशी म्हणजे रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी, भाजपचे २६ , शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे २२, काँग्रेस (आय) १ व अपक्ष १५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अमोलसिंह भोसले यांनी दिली.

रविवार सुट्टीचा दिवस असताना सुद्धा इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी बार्शी नगरपरिषद परिसरात गर्दी केली होती.

बार्शी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित असून, यासाठी भाजपतर्फे तेजस्विनी प्रशांत कथले यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

त्याचप्रमाणे आजच्या इच्छुक उमेदवारांमध्ये अर्ज भरलेल्यांपैकी आमदार दिलीप सोपल यांच्यावतीने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातर्फे माजी नगरसेवक नागेश अक्कलकोटे, देविदास शेटे, रिजवाना शेख, मेहंदीमिया लांडगे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

माजी आमदार राजेंद्र राऊत गटाच्यावतीने भाजपतर्फे माजी नगरसेवक दिलीपकुमार डमरे, संतोष बारंगुळे, भगीरथी भालके, मनीषा पोफळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

### या निवडणुकीत काँग्रेसची वेगळी चूल

काँग्रेसने महाविकास आघाडीत सामील न होता, स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाप्रमाणे प्रभाग क्रमांक १९ ब मधून काँग्रेसचे अजित कांबळे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रभाग क्रमांक १६ ब राजश्री देशमुख, ६ ब नागेश अक्कलकोटे, २१ ब अमोल डिसले, ५ ब राजू घोंगाने, १९ ब अजित कांबळे, १४ ब विशाल बागल, १४ लक्ष्मीबाई गव्हाणे, २१ अ सुनीता डमरे, २१ ब दिलीप कुमार डमरे, १६ अ रोहिणी भोसले, १५ ब तायराबी शेख, १६ ब मनीषा निकम, १९ ब भारत पवार, १अ चांगुना जाधव, १५ ब रागिनी पाचपुते, ३ अ प्रशांत घोडके, १० ब उर्मिला मुळे, १२ अ भागीरथी त्रिंबके, २ अ अनुराधा वाणी, १२ ब संतोष बारंगुळे, १८ ब कांचन मोहिते, ३ अ कुमार माळी, १७ ब किरण गव्हाणे, १५ अ मेहंदीमिया लांडगे, १४ अ मनीषा पोफळे, १५ ब स्वाती पाचपुते, ३ ब अर्चना बारस्कर, ३ ब साक्षी घोडके, ८ अ भाग्यश्री बोंडवे, ७ ब मीरा नाळे, १३ ब एजाज शेख, १६ ब स्वाती पिंगळे, १९ अ शारदा गायकवाड, ३ अ अनिकेत कारंडे, ८ अ सुजाता मस्के, १४ अ रिजवाना शेख, ९ अ सुमय्या मोमीन, ४ अ युवराज वाघमारे, २ ब सुनीता ढोणे, २ अ अनुरथ वाणी, २० ब मोहसीन सौदागर, ८ ब देविदास शेटे, ८ अ संगीता शेटे, ८ ब तुलसीदास मस्के, ५ ब भगवंत घोंगाने, ५ ब वीरेंद्र शिराळ १ अ कांताबाई मोहिते आदींनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.



### मोडनिंब उड्डाणपुलावरील डिजिटल फलक अखेर हटवले

**मोडनिंब, दि. १६ नोव्हेंबर-**

सोलापूर पुणे महामार्गावरील मोडनिंब (ता.माढा) येथील उड्डाणपुलाच्या दर्शनी भागावर तसेच पुलाखाली बसविण्यात आलेले डिजिटल, जाहिरात फलक अखेर हटवण्यात आले आहेत. या फलकांमुळे वाहनचालकांचे लक्ष विचलित होत होते. परिणामी अपघाताचा धोका निर्माण झाल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने होत होती.उड्डाणपुलाजवळील पेट्रोलपंप परिसर, एसटी स्टँड, उमा विद्यालय तसेच हॉटेल पंचरत्न चौक परिसरात पुलाच्या भिंतींवर आणि खाली दोन्ही बाजूंना तब्बल २० ते २२ विविध प्रकारचे डिजिटल फलक लावण्यात आले होते.नागरिकांच्या मागणीची दखल घेत अखेर संबंधित विभागाने हे सर्व डिजिटल फलक हटवण्याची कारवाई केली. या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या महामार्गावर शेटफळ, मोडनिंब, वरवडे, वेणेगाव येथील तसेच उड्डाण पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्ता खचला आहे. या बाबींकडे देखभाल दुरुस्ती विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, अशी नागरिकांची तक्रार आहे.

## निधन वार्ता...

### विठ्ठल वाघमारे

**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**



जुना विजापूर नाका येथील रहवासी विठ्ठल धर्मा वाघमारे (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते कैलास वाघमारे यांचे वडील होते. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

### अन्वर कमिशनर

**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**



जुन्या काळातील एम.आर. व साहिल नगर येथील रहिवासी, खादिमाने उर्दू फोरम व बज्मे गालीबचे संचालक अन्वर हुसेन कमिशनर (वय ७०) यांचे निधन झाले. सकाळी ११ वाजता जडेसाब कब्रस्तान येथे नमाजे जनाजा ऊदा करून तेथेच दफन करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली नातवंडे असा परिवार आहे. काँग्रेसचे नेते फारूक कमिशनर यांचे ते मोठे भाऊ होते. ते ऊर्दूचे लघु कथाकार होते व उत्तम सूत्रसंचालन करून अनेक मुशायरे गाजविले.

# तीर्थक्षेत्र आघाडीतर्फे नगराध्यक्षपदासाठी डॉ.प्रणिता भालकेंचा अर्ज दाखल

## भाजपाची सावध भूमिका; सोमवारीच जाहीर होणार उमेदवाराचे नाव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपालिका निवडणूकीसाठी तिर्थक्षेत्र विकास आघाडीचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून डॉ.प्रणिता भालके यांनी आपला उमेदवारी अर्ज रविवारी दाखल केला आहे. दुसरीकडे बंडखोरी होऊ नये याची परिचारकांकडून दक्षता घेण्यात येत असल्याने भाजपकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराबाबत अद्याप सस्पेन्स राखण्यात आला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशीच सोमवारी भाजपाचा उमेदवार जाहीर होवून तो उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे परिचारकांच्या गोटातून सांगितले जात आहे.

पंढरपूर नगरपालिका निवडणूकीचे पडघम जोरदार वाजू लागलेले आहे. या निवडणूकीत सत्ताधारी परिचारकांच्या भाजप विरोधात विरोधी गटाच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे आव्हान असणार आहे. भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी वैशाली वाळुजकर, साधना भोसले आणि शामल शिरसाट या तीन उमेदवारांमध्ये रस्सीखेच सुरु आहे.

दरम्यान शनिवारी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पंढरपूर दौऱ्यात सोलापूर जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांच्या निवडणूका भाजपा स्वबळावर आणि कमळ चिन्हावर लढविणार असल्याचे सांगितले होते. या बरोबरच नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची भाजपाकडून नावे देखील कन्फर्म करण्यात आली असून ती मुंबई येथे श्रेष्ठींकडे पाठविण्यात आल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले होते. त्यामुळे पंढरपूर पालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी भाजपाकडून कोणाचे नाव कन्फर्म करण्यात आले आहे या बाबतची उत्सुकता निर्माण झालेली आहे.




दुसरीकडे नगराध्यक्षपदाच्या नावांबाबत बंडखोरीच्या भितीमुळे भाजपाकडून सस्पेन्स राखला जात असल्याचे देखील सांगितले जात आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच सोमवारी भाजपाचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर होवून नगराध्यक्षपदासाठी ते उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे. एकंदरीतच पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथे दररोज नवीन नवीन राजकीय घडामोडी घडत असल्याचे दिसून येत आहे.

दुसरीकडे पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजपच्या विरोधात सर्व विरोधी मंडळींना एकत्र करून पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आघाडी स्थापन करण्यात आली आहे. या तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्यात येणार आहे. या आघाडीच्या नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून डॉ.प्रणिता भालके यांनी आपला उमेदवारी दाखल केला आहे. यामुळे पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये भाजप विरुद्ध तीर्थक्षेत्र विकास आघाडी असा सामना रंगणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

**डॉ. भालकेंना निश्चितच यश मिळणार : खासदार शिंदे**

खासदार प्रणिती शिंदे या रविवारी पंढरपूर दौऱ्यावर आलेल्या होत्या. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले की, पंढरपूर पालिकेच्या निवडणूकीसाठी भाजप विरोधात सर्व विरोधी पक्ष एकत्र आले असून या निवडणूकीसाठी विरोधकांकडून तीर्थक्षेत्र विकास आघाडी स्थापन करण्यात आली आहे. या आघाडीच्या माध्यमातून पंढरपूर नगर परिषदेची निवडणूक लढविण्यात येणार आहे. नगराध्यक्ष पदाची उमेदवारी तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून यांना देण्यात आली आहे.पंढरपूर शहरांमध्ये माजी आमदार (कै.) भारतनाना भालके यांना मानणारा मोठा वर्ग आहे. या बरोबरच भालके गटाचे काम देखील चांगले आहे.त्यामुळे या निवडणुकीत प्रणिता भालके यांना निश्चितच यश मिळणार असल्याचा विश्वास देखील यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केला.

**आमदार पाटील आणि आमदार खरे निवडणूकांपासून दूर**

पंढरपूर नगर परिषदेच्या निवडणुकीचे पडघम सध्या जोराने वाजू लागलेले दिसत आहेत. गेल्या दोन, तीन महिन्यापासून विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील, मोहोळचे आमदार राजु खरे यांनी पंढरपूर नगरपरिषदेतील परिचारकांची गेल्या चाळीस वर्षाची सत्ता संपुष्टात आणण्याच्या आणाभाका केल्या होत्या. त्यासाठी परिचारक विरोधकांची मोट देखील बांधण्यासाठी आमदार अभिजीत पाटील, मनसेचे दिलीप धोत्रे यांनी पुढाकार घेत विरोधी गटाची जुळवा जुळव देखील केलेली होती.या मंडळींकडून पंढरपूर नगरपालिका निवडणूकांसाठी बैठकांचा सपाटा देखील सुरु होता. मात्र मोहोळचे आमदार राजु खरे हे निवडणूकीची घोषणा झाल्यापासूनच अलिप्त दिसत आहेत. तर भाजपाचे नेते प्रविण दरेकरांच्या दौऱ्यानंतर आमदार अभिजीत पाटील हे देखील निवडणूकी पासून अंतर ठेवून असल्याची चर्चा आहे.

# एकता महिला मंच, बार्शी तालुका कार्यकारिणीची निवड जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ नोव्हेंबर-**

महिला सक्षमीकरणाच्या उद्दिष्टाने बार्शी तालुक्यात 'एकता महिला मंच' च्या २०२५-२०२६ वर्षासाठीच्या नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. तालुक्यातील महिलांना प्रेरणा आणि बळ देणाऱ्या या व्यासपीठाची ही पहिलीच सक्रिय कार्यकारिणी आहे.

ही प्रक्रिया प्रभाकर क्षीरसागर (एकता महिला मंच) यांच्या अध्यक्षतेखाली एकमताने पूर्ण झाली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची यादी बार्शी तालुक्यातील सर्व सदस्यांनी एकत्र येत ११ प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्यांची निवड सर्वानुमते केली आहे. नवनियुक्त पदाधिकारी पुढीलप्रमाणे : तालुका प्रमुख कविता दसवंत, तालुका उपप्रमुख नुरजहा शेख, तालुका सचिव जास्मिन शेख, तालुका कोषाध्यक्ष रेश्मा मुकटे, तालुका प्रसिद्धीप्रमुख गीतांजली जोशी, तालुका संघटन सचिव लक्ष्मी सुतार, तालुका कार्यकारिणी सभासद वसुधा कुंभार, तालुका कार्यकारिणी सभासद रीना गुरव, तालुका कार्यकारिणी सभासद स्वाती चव्हाण, तालुका कार्यकारिणी सभासद सानिया सय्यद, तालुका कार्यकारिणी सभासद शबनम सय्यद. एकमताने झालेल्या निवडीमुळे 'एकता महिला मंच' बार्शी तालुक्यात महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, त्यांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांत सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. ही निवड बार्शीच्या महिला चळवळीला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

# पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा

## रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त भैरवनाथ विद्यालयात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ नोव्हेंबर-**

भैरवनाथ माध्यमिक विद्यालय गुळपोळी मध्ये रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त महासंगणकाचे जनक पद्मभूषण डॉक्टर विजय भटकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा व ग्रंथ तुला कार्यक्रम संपन्न झाला. डॉक्टर विजय भटकर यांच्या हस्ते पद्मभूषण डॉक्टर विजय भटकर स्किल स्कूलचे उद्घाटन करण्यात आले. तसेच रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान डॉक्टर विजय भटकर यांच्या हस्ते करण्यात आला. बारामती इकोसिस्टीम अँड टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड संस्थापक अभिमन्यू नागवडे यांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांना वह्यावाटप व वृक्षवाटप केले.

डॉक्टर विजय भटकर यांनी प्रशालेला आदर्श स्कूल बनवण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी विद्यार्थी समाधान मचाले व तुषार चिकणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत, सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मुंबईचे चेअरमन डॉक्टर चंद्रकांत पाटील, डीवायएसपी. सायकर ,बार्शी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नेटके यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावून आपल्या मनोगतातून प्रशालेला शुभेच्छा दिल्या. बार्शी ग्रामीण पोलीस स्टेशनचे एपीआय दिलीप ढेरे, यशोदा शिक्षण संस्थेचे संस्थापक अरुण बारबोले, पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक अभिमन्यू नागवडे, सेकंडरी सोसायटी मुंबईचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, चैतन्य सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीचे प्रमुख देशपांडे, गुळपोळी गावचे सरपंच शिरीष चिकणे, शिक्षण प्रेमी गणेश चिकणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थापक अरुण कापसे यांनी भूषविले.



प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक प्रमोद देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन मोकाशी व देशमुख यांनी केले तर आभार सत्यवान माळी यांनी मानले.

# अध्यक्षासाठी ९४; सदस्यांसाठी १५३९ अर्ज दाखल

## आज अर्ज दाखलचा शेवटचा दिवस; प्रशासनावर येणार ताण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

सोलापुरातील ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेसाठी रविवारपर्यंत जिल्ह्यातून अध्यक्षपदांसाठी ९४ तर सदस्यपदांसाठी १५३९ अर्ज दाखल झाले आहेत. ऑफलाईनद्वारे अध्यक्षांसाठी १७ तर सदस्यपदांसाठी ३१५ अर्ज दाखल झाले आहेत. सोमवार, दि.१७ नोव्हेंबर ही अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. आजच्या दिवशी अर्ज दाखल करण्यासाठी कार्यकर्त्यांची भाऊगर्दी होणार आहे. त्यामुळे प्रशासनावर चांगलाच ताण येण्याची शक्यता आहे.

एकीकडे राजकीय पक्षांकडून उमेदवार जाहीर करून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या हालचाली सुरु आहेत. तर दुसरीकडे उमेदवारी अर्ज दाखल करून घेणे, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक प्रक्रिया व प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबविणे यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर तयारी केली जात आहे. सोमवारी मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाकडूनही मनुष्यबळ वाढविण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते.

दि.१८ नोव्हेंबर रोजी अर्जांची छानणी होणार आहे. दि.२१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. जिल्ह्यातील ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेच्या निवडणुकीतंर्गत एकूण १५२ प्रभागात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार नव्या कारभाऱ्यांचा फैसला करणार आहेत. विविध पक्षात बंडखोरी दिसून येणार आहे.

# मैंदर्गीत नगरसेवकासाठी ५४ तर नगराध्यक्षासाठी सात अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१६ नोव्हेंबर-**

मैंदर्गीत नगराध्यक्षपदासाठी सातव्या दिवशी स्थानिक गटाकडून माजी नगरसेविका शिवम्मा यल्लप्पा पोतेनवरू सह सरूबाई सिद्धाराम बुरुड, पोतेनवरू सोनाली रॉकेश, बुरुड गौराबाई यालप्पा, आरेनवरूमनीषा वसंत, भांगर्गी भारती सिद्धेश्वर, कांबळे अनिता हिरालाल या सात जणांनी अर्ज दाखल केले. नगरसेवक पदासाठी तब्बल ५४ जणांनी रविवारी अर्ज दाखल केले.

नगरसेवकपदासाठी **प्रभाग १** : मेहबूब अब्दुल रहमान बांगी, हन्नूरे सैफन मुस्तफा, बाबुडे अब्दुलगनी घुडूभाई. **प्रभाग दोन अ** : कावेरी खाजपा पुजारी, राणी महेश शावरी. **प्रभाग तीन अ** : देगाव शब्बीर शहहूशेनी,शिवचलप्पा न्यामनप्पा मुंनोली. **प्रभाग४ अ** : पोतेनवरू सरस्वती नागेद्र, किरगल धोंडाबाई भीमभगवान, मनिकडे ओमिका सुनील, मनीषा वसंत आरेनवरू.**प्रभाग ५ अ** : आकाश विट्ठल आरेनवरू, बुरुड बसवराज आनंदप्पा, मैंदर्गीकर बसवराज शरणप्पा, भांगर्गी विरेश सिद्देश्वर, **प्रभाग ६ अ** : डफेदार शमिनबानो महिबूब,बांगी प्रवीनबानो मुजीव,मेहराज माकतूम लुकडे. **प्रभाग ७ अ** : शांताबाई अर्जुन कौलगी, लुकडे मेहराज मकतूम, आस्ताद रेश्मा इब्राहिम **प्रभाग ८ अ** : मोरे सपना संजय,गीता श्रीशैल कोळी.**प्रभाग ९ अ** : सिंदगी सुलेचना राजेंद्र, होळीकट्टी सुरेखा बसवराज. **प्रभाग क्रमांक १०** : जकापुरे सुनीता सिद्धाराम, जाकापुरे राजश्री दरेप्पा, बामनळ्ळी शिवम्मा लक्ष्मण.

# वृध्दाश्रमात साजरा केला मुलगा रणवीरचा वाढदिवस

## एकता महिला मंचच्या तालुका कोषाध्यक्षा रेश्मा मुकटेंचा वेगळा पायंडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१६ नोव्हेंबर-**

सामाजिक बांधिलकी जपत बार्शी तालुक्यातील जामगांव (आवटे) येथील 'एकता महिला मंच'च्या तालुका कोषाध्यक्षा रेश्मा मुकटे यांनी मुलगा रणवीर मुकटे याचा वाढदिवस दि. १६ नोव्हेंबर रोजी उपळे (दुमाला) येथील सहारा वृद्धाश्रमातील अनाथ वृद्धांसोबत साजरा केला.

हा अनोखा उपक्रम बार्शी तालुक्यात एक आदर्श उदाहरण म्हणून समोर आला आहे.

जामगांव (आवटे) येथील रहिवासी रेश्मा मुकटे यांनी आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त महागड्या पार्ट्यांचा आणि दिखाऊ खर्चाला फाटा देत, सहारा वृद्धाश्रमातील निराधार वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचा निर्णय घेतला.




**सेवा आणि आनंदाचा अनोखा संगम:**

मुकटे परिवाराने वृद्धाश्रमात उपस्थित राहून वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी वृद्धांना भेटवस्तू प्रदान केल्या, तसेच त्यांच्यासाठी अन्नदान केले. यासोबतच वृद्धाश्रमाच्या परिसरात वृक्षारोपणासाठी रोपे देखील भेट दिली. महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी वृद्धाश्रमास एक प्रेरणादायी प्रतिमा भेट देऊन सामाजिक संदेश दिला.

हा वाढदिवस आम्ही आज अनाथ वृद्धांसोबत साजरा केला. हा आमच्यासाठी केवळ एक आगळावेगळा उपक्रम नव्हता, तर एक भावनिक अनुभव होता. या निरागस आणि प्रेमळ वृद्धांसोबत आनंद वाटून घेताना माझ्या मुलाच्या आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाच्या चेहऱ्यावर जो आनंद फुलला, तो कोणत्याही भौतिक सुखाहून खूप मोठा आहे. या उपक्रमाने आम्हाला खूप वेगळा आणि अवर्णनीय आनंद तर दिलाच, पण त्याचबरोबर समाजासाठी काहीतरी करण्याची एक नवीन आणि सकारात्मक ऊर्जा देखील मिळाली आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यातील खास क्षण अशा गरजूंसोबत साजरे करावेत, हीच माझी इच्छा आहे.

**- रेश्मा मुकटे, तालुका कोषाध्यक्षा, महिला एकता मंच, बार्शी.**

सामाजिक जाणीव ठेवून साजरा करण्यात आलेल्या या वाढदिवसामुळे वृद्धांना एक वेगळाच आनंद मिळाला आणि हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

**उपस्थितांची मांदियाळी:**

यावेळी राहुल मुकटे, विकास मुकटे, मंगल मुकटे, रेश्मा मुकटे, तेजस्वी मुकटे, वाढदिवस असलेल्या रणवीर मुकटे, ओवी मुकटे आणि आराध्या मुकटे यांचा सहभाग होता.

तसेच सहारा वृद्धाश्रमातील सर्व सहकारी उपस्थित होते. रेश्मा मुकटे यांनी सामाजिक बांधिलकीचे हे अनमोल कार्य करून बार्शी तालुक्यात एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# 'लोकमंगल'च्या विवाह सोहळ्यात ५२ जोडप्यांच्या रेशीमगाठी

## जिल्हा पर्यटन थीममुळे सोहळा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू


## वधुवरांना आशीर्वाद देण्यासाठी जिल्ह्यातील महाराज मंडळींचीही उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

रविवार, दि. १६ रोजी सायंकाळी सूर्य अस्ताला जात असताना वातावरणात मंगलध्वनी... ढोल-ताशांचा गजर अन् विवाहसोहळ्याची लगबग दिसत होती... लोकमंगल फाउंडेशनतर्फे आयोजित सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात ५२ जोडपी रेशमी जोडीने व्यासपीठावर दाखल झाली... अन् हजारोंच्या उपस्थितीत त्यांच्या मंगल कार्यासाठी रेशीमगाठी बांधल्या गेल्या... नवदांपत्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर झळकत होती... तर सभोवताली उपस्थित असलेले नातेवाईक, उपस्थित महाराज मंडळी व मान्यवरही या भावनिक क्षणांचे साक्षीदार बनले... आणि ५२ जोडप्यांच्या रेशीमगाठी लोकमंगलच्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात बांधल्या गेल्या... दरम्यान, जिल्हा पर्यटन थीममुळे हा सोहळा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला!

हा भव्य सोहळा माजी सहकार मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रेरणेतून विजापूर रोडवरील शिवाजी अध्यापक विद्यालय (डी.एड. कॉलेज) मैदानावर पार पडला. या परिसरात दिवसभर वऱ्हाडी मंडळींची मोठी गर्दी, रंगीबेरंगी सजावट, सुनियोजित व्यवस्थापन दिसून आले आणि आकर्षक थीममुळे संपूर्ण मैदान उत्सवाचे रंगमंच बनले होते. आमदार सुभाष देशमुख आणि त्यांच्या पत्नी स्मिता देशमुख यांनी कन्यादान केले. यावेळी ४९ हिंदू तर तीन बौध्द विवाह पार पडले. आ.देशमुख यांनी दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात सामुदायिक विवाह सोहळा राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजातील वधू-वरांना आर्थिक व मानसिक आधार देणे आणि विवाहातील अनाठायी खर्चाला आळा घालणे हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू विशद केला.

अनेक स्वयंसेवकांनी सहकार्य केल्यानेच हा सोहळा उत्साहात पार पडले. गेल्या २० वर्षांपासून या उपक्रमास सुरूवात केली असून, यंदाचा सोहळा ४६ वा असल्याचेही आ. देशमुख यांनी सांगितले. या सोहळ्याला राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनीही विशेष भेट देऊन नवदांपत्यांना समुपदेशन करीत शुभाशीर्वाद दिले. आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते राज्यपाल बागडे यांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित महाराजांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अक्षता सोहळ्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. या सोहळ्यास हजारो वऱ्हाडी मंडळींची उपस्थिती होती.



### सोहळ्यास लाभली महाराजमंडळी आणि मान्यवरांची उपस्थिती

या विवाह सोहळ्याला धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. यामध्ये पंढपूर मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आ.सुभाष देशमुख, लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख, मनीष देशमुख, पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी (मळकवठे), अभिनव बसवलिंग महास्वामीजी (नागणसूर), श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी (नागणसूर), सुधाकर महाराज इंगळे महाराज, बळीराम जांभळे महाराज, भागवत चवरे महाराज, संजय पाटील महाराज, नाशिककर महाराज यांच्यासह अनेक मान्यवर महाराज मंडळी तसेच आमदार विजय देशमुख, ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, तालुक्याचे अध्यक्ष राम जाधव व विविध पक्षीय राजकीय पदाधिकारी-कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचा लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी यथोचित सत्कार केला.

### जिल्हा पर्यटन थीमची अनोखी अनुभूती

या वर्षीचा विवाह सोहळा विशेष ठरला तो 'जिल्हा पर्यटन थीम'मुळे. आमदार सुभाष देशमुख यांनी सुरु केलेल्या जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या धर्तीवर या सोहळ्यात पर्यटनाची झलक सादर करण्यात आली होती. या मैदानावर सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणांचे पॅनेल्स, सांस्कृतिक वारशांची ओळख करून देणारे माहिती फलक, विविध गावांच्या विशेष परंपरांची मांडणी, पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची स्थळे दर्शविणारे स्टॉल्स आदी माध्यमातून जिल्ह्याची ओळख जिवंत करण्यात आली. विशेष म्हणजे, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती स्थळावर प्रदर्शित करण्यात आली होती. भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे हा संदेश उपस्थितांमध्ये श्रध्दा आणि आत्मविश्वास निर्माण करणारा ठरला.

### लग्न मांडवात दिवसभर उत्साहमय कार्यक्रम


सकाळी सर्व वधू-वरांसाठी समुपदेशन आयोजित करण्यात आले होते. विवाहोत्तर आयुष्य, कुटुंब व्यवस्थापन आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन देऊन दांपत्यांना सक्षम केले गेले. मान्यवरांच्या हस्ते वधुंना शालू व वरांना सफारी ड्रेस तसेच रुखवत साहित्याचे वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वधू-वरांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी चपाती, भाजी, बुंदीचा लाडू असे स्वादिष्ट भोजन देण्यात आले. खुल्या बग्गीतून काढण्यात आलेली वधू-वरांची मिरवणूक ही सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरली. वाजत गाजत, सनई-चौघड्याच्या निनादात मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. एकूणच लग्न मांडवात उत्साही वातावरण होते.

# महिलांना दहा हजार हे यशाचे कारण असेल तर आम्हाला विचार करावा लागेल

## ● बिहार निवडणूक निकालासह विविध मुद्द्यांवर शरद पवारांनी केले भाष्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ नोव्हेंबर**

नगरपालिका निवडणुकीत पैसे वाटतात हे ऐकले होते, पण सरकारमार्फत महिलांना प्रत्येकी १० हजार देणे आम्ही कधी ऐकले नव्हते. या योजनेचा निवडणुकीवर झालेला परिणाम लोकांनी ठरवावा. जर महिलांना प्रत्येकी दहा हजार रुपये देणे हेच यशाचे कारण असेल तर आम्हाला विचार करावा लागेल, असे रोखठोक प्रतिपादन माजी केंद्रीय कृषीमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खा.शरद पवार यांनी केले.



एका खासगी कार्यक्रमाच्या निमित्ताने ते रविवारी सोलापुरात आले असता प्रसार माध्यमांशी संवाद साधताना बिहार निवडणूक निकालासह सामाजिक प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, महिलाविषयक धोरण, सध्य राजकीय परिस्थिती आणि विविध मुद्द्यांवर त्यांनी आपल्या खास स्टाईलने भाष्य केले.

### पक्ष कधीही संपत नसतो

आमदार राजू खरे यांच्याबाबत बोलताना खा.शरद पवार म्हणाले, मी त्याच्या खोलात जाऊ इच्छित नाही. आमदारांनी पक्षाच्या चौकटीबाहेर जाऊ नये. स्थानिकस्तरावर पक्षसंघटनेच्या अस्तित्वावर भाष्य करताना ते म्हणाले, पक्ष असे संपत नसतात, विचार संपत नाहीत. १९७५ साली काँग्रेसचा पराभव झाला होता. पण काँग्रेस पुन्हा उभी राहिली. गांधी-नेहरु विचार स्वीकारणारी काँग्रेस संपणारी काँग्रेस नाही. ती पुन्हा वेगळ्या स्थितीत पोहोचेल.

### जिथे एकत्र येता येईल तिथे एकत्र येणेच योग्य

समाजात फूट पाडणाऱ्या प्रवृत्ती रोखण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. नगरपरिषद आणि महापालिका, नगरपरिषदांच्या निवडणुका यापूर्वी कधीही इतक्या लांबणीवर पडल्या नव्हत्या. स्थानिक नेतृत्वाने एकत्र आले पाहिजे. भाजपला बाजूला ठेवून जिथे एकत्र येता येईल तिथे एकत्र येणे योग्य आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

उद्याच्या १ ते १९ तारखेपर्यंत संसदेचे अधिवेशन आहे. विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांसह आम्ही या मुद्द्यांवर चर्चा करणार आहोत. बिहार निवडणुकीविषयी आमची माहिती वेगळी होती, पण निकाल वेगळा आला. मात्र लागलेला निकाल स्वीकारायचा असतो.

बिहार राज्यातही लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आल्याने त्याचा परिणाम झाला. काही शक्ती जात-धर्माच्या नावावर दुरावा निर्माण करत आहेत, हे देशाच्या ऐक्यासाठी धोकादायक आहे. बेरोजगारी वाढत असून त्याचा परिणाम तरुण पिढीवर गंभीरपणे होत आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

ना.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, मी त्यांच्या विधानाचे स्वागत करतो. यापुढे भाष्य टाळत त्यांनी संयत भूमिका ठेवली. तरुण शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर आलेल्या पत्राबद्दल बोलताना ते म्हणाले की, पत्र मिळाले हे खरं आहे. एका सहकाऱ्याने मला ते दाखवले. पण मी त्यावर अद्याप ठोस विचार केला नाही.

## आदिला नदीच्या उगमापासून संगमापर्यंत नदी परिक्रमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

आर्ट ऑफ लिव्हिंग आणि सृष्टी इकोविजन फाउंडेशनच्या वतीने डॉ.श्रीनिवास वडकबाळकर, नदी पुनर्जीवन प्रकल्पाचे डॉ.अनिल नारायणपेठकर या दोन भूगर्भ शास्त्रज्ञांच्या समवेत आदिला नदीच्या उगमापासून ते संगमापर्यंत परिक्रमा आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, विद्यापीठ पर्यावरण विभागाचे संचालक डॉ. विनायक धुळप हेही मार्गदर्शन करणार आहेत. पर्यावरण प्रेमी डॉ.किशोर वाघमारे, शिरीष गोळवलकर, प्रवीण तळे हे परिश्रम घेत आहेत.

आदिला नदीचे उगमस्थान असलेले धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथील धनेगाव ते सीना नदीजवळील संगम असलेले तेलगाव यादरम्यान ही परिक्रमा होणार आहे. या परिक्रमांतर्गत नदीवरील प्रमुख स्थळांना भेटी देऊन माहिती देण्यात येणार आहे. यासाठी मार्गदर्शक पथक तयार करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

आदिला नदीचे उगमस्थान तुळजापूर तालुक्यातील धनेगाव येथे आहे. तर उत्तर सोलापूर तालुक्यातील तेलगाव येथे सीना नदीला मिळते.

# पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या प्रारुप व अंतिम मतदार याद्या तयार करण्यास मुदतवाढ

**पुणे, दि. १६ नोव्हेंबर-**

पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम सुरू असून प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यास भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३ डिसेंबर व अंतिम मतदार याद्या तयार करण्यास १२ जानेवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदान अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली आहे.सुधारित कार्यक्रमानुसार हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई- शुक्रवार २८ नोव्हेंबर, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी- बुधवार ३ डिसेंबर, दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी- ३ ते १८ डिसेंबर, दावे व हरकती निकाली काढणे, पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे- सोमवार ५ जानेवारी २०२६ व मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी- सोमवार १२ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येईल.

# भाऊसाहेब : धर्मनिष्ठ शिक्षणतपस्वी आणि जैन तत्त्वज्ञानाचे साकार रूप

*सोलापूरच्या भूमीने अनेक युगपुरुष पाहिले. शिक्षण, धर्म आणि समाजसेवा या तिन्ही क्षेत्रांचा संगम ज्यांच्या जीवनात विलक्षण पवित्रतेने उमटला, ते होते श्रीमान भाऊसाहेब गांधी. जैन धर्माच्या सत्त्वशील तत्वज्ञानाने प्रेरित होऊन त्यांनी संपूर्ण आयुष्य शिक्षण, धर्मप्रसार आणि मानवकल्याणासाठी वाहिले. त्यांच्या आयुष्याची दिशा शिक्षण हाच धर्म या जैन मूल्याधिष्ठित विचारसरणीशी एकरूप झाली होती.*



भाऊसाहेब गांधी यांचा जन्म एका अतिशय धार्मिक, तत्त्वनिष्ठ आणि संस्कारित जैन कुटुंबात झाला. गांधी घराणे मूळचे गुजरातमधील 'इडर' जिल्ह्यातील 'टाकाटूका' गावचे. या कुटुंबाने अक्कलकोट तालुक्यातील 'वागदरी' गावात स्थायिक होताच समाजात आपले मानाचे स्थान निर्माण केले. धर्मसेवेची परंपरा त्यांच्या रक्तातच होती - स्व. हेमचंद दलजी गांधी आणि श्री रामचंद गांधी यांनी वागदरी येथे जैन मंदिर उभारून धर्मकार्याला नवे अधिष्ठान दिले.

सोलापुरातील भुसार गल्लीत श्री १००८ माणिकस्वामी जैन मंदिर हे सोलापूरच्या धार्मिक इतिहासातील पहिले जैन मंदिर गांधी घराण्यानेच स्थापले. गेली दोन शतके या मंदिराची सेवा गांधी परिवार करत आहे. अशा धर्मपरायण परंपरेचा वारसा लाभल्यामुळे भाऊसाहेब गांधींच्या व्यक्तिमत्त्वात आध्यात्मिक शांतता आणि आत्मानुशासन यांचा उत्तम संगम दिसून येतो. भाऊसाहेब गांधी यांचे जीवन जैन धर्मातील अहिंसा, अपरिग्रह, सत्य आणि संयम या चार प्रमुख तत्त्वांवर उभे होते. श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण आणि धर्म यांची सांगड घातली.

आजच्या युगात बहुसंख्य समाज आरक्षण मिळविण्यासाठी मागणी करीत आहे. खरे तर अल्प संख्याका मधील अल्पसंख्याक म्हणून ओळखला जाणारा जैन समाजराजकीय पाठबळ नसताना, उग्र आंदोलन करण्यासाठी रस्त्यावरही येत नाही. सगळे ओळखून भाऊसाहेबांनी ११ वर्षे न्यायालयीन यशस्वी लढा दिला. त्यांच्या या संघर्षमय प्रयत्नामुळे जैन संस्थांना अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झाला. म्हणूनच श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा भारतातील पहिली जैन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था ठरली. ही जैन समाजासाठी मोठी उपलब्धी आहे.

भाऊसाहेब गांधींच्या धार्मिक प्रवासात त्यांना अनेक थोर जैन मुनींचे सान्निध्य लाभले. प. पू. गुरुदेव १००८ श्री समन्तभद्र महाराज, आचार्यश्री १०८ विद्यानंदजी महाराज, आणि सल्लेखना ग्रहण करणारे आचार्यश्री १०८ वीरसागर महाराज यांच्याशी त्यांचे अतूट आत्मीय संबंध होते. जैन मुनींच्या विहारात भाऊसाहेब गांधी स्वतः पुढाकार घेऊन त्यांच्या सेवा, निवास आणि प्रवचनांच्या आयोजनात स्वतःला समर्पित करत. श्री ऐ. प. दि. जैन पाठशाळेच्या प्रांगणात उभारलेले जैन मंदिर हे केवळ पूजेचे स्थान नाही, तर ते विद्यार्थ्यांच्या संस्काराचे केंद्र आहे. येथे दर रविवारी णमोकार मंत्राचे सामूहिक पठण, पर्युषण पर्वात २४ तास सतत जप, आणि भगवान महावीर जयंतीचे भक्तिभावाने आयोजन - हे सर्व भाऊसाहेब गांधींच्या प्रेरणेने सुरु आहे. कुंथलगिरी हे मराठवाड्यातील पवित्र सिद्धक्षेत्र. तेथे त्यांनी मंदिरांची उभारणी, वसतिगृहांची स्थापना आणि जैन मुनींच्या प्रवचनांचे आयोजन केले. श्री माणिकस्वामी दिगंबर जैन मंदिर, श्री आदिनाथ मंदिर आणि महावीर सांस्कृतिक भवन या धार्मिक स्थळांच्या उभारणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांचे स्नेहसंबंध श्रवणबेळगोळ, कुंभोज बाहुबली, आणि जयपूर येथील पंडित टोडरमल स्मारक यांसारख्या जैन क्षेत्रांशी दृढ होते, जैन धर्माच्या प्राचीन परंपरांचे संवर्धन करणाऱ्या अनेक विद्वानांशी संपर्क साधून त्यांनी सोलापूरात धार्मिक सभांचे आयोजन केले. जैन धर्मातील आत्मशुद्धीचा संदेश त्यांनी आपल्या कर्माने साकार केला. त्यांचे योगदान म्हणजे केवळ सोलापूरचे नव्हे, तर संपूर्ण जैन समाजाचे अभिमानस्थान आहे. ज्ञान हेच दान, शिक्षण हीच साधना, आणि धर्म हीच जीवनाची दिशा - या त्रिसूत्रीचा साक्षात अवतार होते श्रीमान भाऊसाहेब गांधी. त्यांच्या पावन स्मृतीस शतशः नमन !

**- पराग अरविंद शहा**
विश्वस्त श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व वालचंद शिक्षण समूह, सोलापूर

# संजवाड येथील पायी वारीत हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड गावातून पंढरपूरला जाणाऱ्या पायी वारीमध्ये यंदा हिंदू-मुस्लिम ऐक्याचा एक प्रेरणादायक संदेश पाहायला मिळाला . शनिवारी १५ नोव्हेंबर रोजी उत्पत्ती एकादशीनिमित्त संजवाडहून पंढरपूरकडे निघालेल्या दिंडीचे सर्वधर्मीय नागरिकांनी केलेले स्वागत आणि त्यातून व्यक्त झालेले सलोख्याचे चित्र सध्या चर्चेचा विषय ठरले असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड येथील ग्रामस्थ दरवर्षीप्रमाणे यंदाही लाडक्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी दिंडी घेऊन पंढरपूरकडे निघाले आहेत यावर्षी ही त्यांची २० वी पायी दिंडी असून, ती उत्पत्ती एकादशीनिमित्त नोव्हेंबर महिन्यात पंढरपूरकडे मार्गस्थ झाले आहेत .

या वारी दरम्यान, संजवाड गावच्या नागरिकांनी सर्वधर्मसमभावाचे उत्तम उदाहरण घालून दिले. या दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत आणि व्यवस्थेत हिंदू बांधवांसोबत मुस्लिम बांधवांनीही उत्साहाने सहभाग घेतला. संजवाड ते पंढरपूरच्या प्रवासात गावकऱ्यांनी एकत्रितपणे हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला, जो सर्व वारकऱ्यांसाठी आणि या घटनेचे साक्षीदार झालेल्या लोकांसाठी एक सकारात्मक अनुभव ठरला.

या दिंडीमध्ये दिसून आलेले हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दृश्य आणि सर्वधर्मसमभाव जपण्याची ही अनोखी पद्धत सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. विठ्ठलाच्या

पायी वारीत संजवाड येथील गैबी शेख हा मुस्लीम परीवार सहभागी होऊन विठ्ठलाचे फोटो गळ्यात घालून भजन व किर्तनात सहभागी झाले आहेत. पाच वर्षापासून शेख परीवार विठ्ठलाच्या भक्तीत मग्न होऊन पायी वारीत सहभागी होत असल्याचे संजवाडच्या ग्रामस्थांमधून सांगण्यात आले.



वारीसारख्या पवित्र धार्मिक सोहळ्यातून सामाजिक सलोख्याचा संदेश देणाऱ्या संजवाड गावच्या ग्रामस्थांचे आणि या वारीचे सर्वत्र कौतुक होत आहे. धार्मिक भावना आणि सामाजिक ऐक्य यांचा संगम साधणारी ही वारी खऱ्या अर्थाने एक आदर्श ठरली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## चेक-बॉन्डचा बहाणा करून महिलेला कारमध्ये नेऊन लैंगिक अत्याचार

### तुळजापूर पोलिसांत गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ नोव्हेंबर -**
तुळजापूर पोलीस ठाण्यात ४३ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत पीडितेला गावातील एका तरुणाने चेक व बॉन्ड देण्याचे आश्वासन देत कारमध्ये बसवून नेले. मात्र ठिकाणी पोहोचल्यानंतर त्याने चेक व बॉन्ड न देता तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार महिलेने पोलिसांकडे केली.

पीडितेच्या प्रथम खबरीनुसार तुळजापूर पोलिसांनी भा.न्या.सं. कलम ६४ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### नूतन सपोनि. विजय पवार यांचा सत्कार

**लोहारा, दि.१६ नोव्हेंबर -**
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया लोहारा तालुक्याच्या वतीने लोहारा येथील पोलीस स्टेशनचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार यांचा सत्कार आरपीआय आठवले पक्षाच्यावतीने करण्यात आला. यावेळी रोजगार आघाडी जिल्हाध्यक्ष उत्तम भालेराव तालुकाध्यक्ष काकासाहेब भंडारे, पोलीस पाटील तानाजी माटे, जिल्हा उपाध्यक्ष शरद मस्के, रोजगार आघाडी शहराध्यक्ष अशपाक फुलारी, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी नागटिळे, तालुका सचिव कलापा दुपारगुडे, युवराज सूर्यवंशी, पुरुषोत्तम सीतापुरे, जनार्दन मिसाळ, लोहार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### धाराशिवचा चेतन डेफ ऑलिंपिकमध्ये

**धाराशिव, दि.१६ नोव्हेंबर -**
धाराशिवचा कर्णबधिर पिस्तूल नेमबाज चेतन हणमंत सपकाळ हा २५ व्या डेफ ऑलिंपिकमध्ये (टोकियो) २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूल आणि २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करीत आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर मिळून २१ पदकांची कमाई करूनही चेतनला शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नाही. शिष्यवृत्ती, प्रशिक्षण निधी आणि साहित्य खरेदीसाठी सहाय्य न मिळाल्याने पालकांना पेन्शनवर कर्ज घेऊन चेतनला जपानला पाठवावे लागले. आंतरराष्ट्रीय खेळाडूंना देण्याची सरळ सेवांची प्रक्रिया दोन वर्षांपासून प्रलंबित असून पारितोषिकाची रक्कमही अद्याप मिळालेली नाही. दिव्यांग युवा नेमबाजाकडे झालेले हे दुर्लक्ष म्हणजे राज्याच्या क्रीडा व्यवस्थेची लाज असल्याची क्रीडाप्रेमींची भावना असून प्रलंबित प्रस्ताव व आर्थिक सहाय्यावर त्वरित निर्णय घेण्याची मागणी होत आहे.





### तेरखेडा : वाहन कोंडीने ग्रामस्थ त्रस्त

**वाशी, दि.१६ नोव्हेंबर -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा हे परिसरातील सर्वात महत्त्वाचे बाजारपेठ केंद्र मानले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या गावात वाहन कोंडीची समस्या तीव्र झाली असून वाहनचालकांच्या बेशिस्त वर्तनामुळे ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. गावालगत राष्ट्रीय महामार्ग असून येथे सर्व्हिस रोडची सोय करण्यात आलेली आहे. तरीही अनेक वाहनधारक आपली वाहने रस्त्याच्या कडेला तसेच ब्रिजखाली अनधिकृतरीत्या उभी करतात. यामुळे इतर वाहनांना जाण्या-येण्यात अडथळे निर्माण होतात. विशेषत: ब्रिजखाली उभी असलेली वाहने बस सेवेसाठी मोठा अडसर ठरत असून, दोन्ही बाजूंनी बस वळवताना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे काही बसचालकांनी या मार्गाने येणे टाळण्यास सुरुवात केली आहे. अशा बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक विस्कळीत झाली असून ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

### धाराशिवचा अनिरुद्ध ढगे 'केबीसी'मध्ये

**तुळजापूर, दि.१६ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील काटीचे मूळ रहिवासी आणि सध्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात सहाय्यक वनसंरक्षक म्हणून कार्यरत असलेले अनिरुद्ध अनिल ढगे यांची 'कौन बनेगा करोडपती'मध्ये निवड झाली असून त्यांच्या सहभागाचा भाग नुकताच चित्रीत झाला आहे. यंदाच्या रौप्य महोत्सवी वर्षात बिग बी अमिताभ बच्चन यांच्या समोर हॉट सीटवर बसण्याची संधी ढगे यांना मिळाली आहे. केबीसीची सात वेळा मुख्य परीक्षा दिल्यानंतर राज्य सेवेतील अधिकारी झालेल्या ढगे यांच्या सहभागाचा भाग १७ व १८ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वा. सोनी टीव्हीवर प्रसारित होणार आहे.



# केशेगाव शिवारात विद्युत तार तुटून दोन एकर ऊस जळून खाक

### शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१६ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील मौजे केशेगाव येथील शेतकरी दत्तात्रय शिवाजी शिनगारे यांच्या शेतातील विद्युत तार अचानक तुटून झालेल्या शॉर्टसर्किटमुळे उभ्या अवस्थेतील दोन एकर ऊस जळून भस्मसात झाला. ही घटना रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे दीड वाजता केशेगाव शिवारात घडली. या आगीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.



घटनेची माहिती पुढीलप्रमाणे आहे. शेतकरी दत्तात्रय शिनगारे यांच्या गट नंबर ३७५ मधील दोन एकर शेतात जोमाने वाढलेला व तीस कांड्यावर आलेला ऊस उभा होता. दोन दिवसांत ऊसतोड होणार असताना रविवारी अचानक विद्युत तार तुटली आणि शॉर्टसर्किटमुळे शेतात मोठा जाळ झाला. या आगीत दोन एकर ऊसासह दोन एकर ड्रिपलाइनही जळून नष्ट झाली.

घटनेची माहिती मिळताच लाईनमन बोरमन यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी शेतकरी दत्तात्रय शिनगारे, मुरलीधर शिनगारे, बाबुराव शिनगारे यांच्यासह इतर शेतकरी उपस्थित होते.

आधीच अतिवृष्टीमुळे खरीपातील सोयाबीन वाहून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहे. त्यातच महावितरणच्या गलथान कारभारामुळे उभा असलेला ऊस आणि ड्रिप जळून खाक झाल्याने शेतकऱ्यावर दुहेरी संकट ओढावले आहे.

या नुकसानीबाबत महावितरण कंपनीने तातडीने पंचनामे करून योग्य भरपाई द्यावी, अशी मागणी येथील शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## प्रेमसंबंधाच्या रागातून तरुणाची निर्घृण हत्या; दोन आरोपींवर गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील वडगाव लाख येथे प्रेमसंबंधाच्या कारणावरून एका ४१ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलिसांनी दोघा आरोपींवर खुनाचा गुन्हा नोंदवला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी खंडु उमराव लोहार आणि उद्धव उमराव लोहार (दोघे रा. वडगाव लाख, ता. तुळजापूर) यांनी दि.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.४५ ते १२ वाजण्याच्या दरम्यान वडगाव लाख पाटीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नदीच्या पुलावर मेहबुब दगडू शेख (वय ४१) यांना अडवले.

स्वाती खंडु लोहार आणि मेहबुब यांच्यातील कथित प्रेम संबंधाच्या रागातून आरोपींनी लोखंडी रॉड व दगडाने वार करून मेहबुब यांचा जागीच खून केला, असा तक्रारीत उल्लेख आहे.

या प्रकरणी मृताच्या पत्नी सलीमा मेहबुब शेख (वय ४०) यांनी दि.१५ नोव्हेंबर रोजी तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## २२ वर्षीय युवकाचे जबरदस्ती अपहरण; पोलीसात गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१६ नोव्हेंबर -**
परंडा पोलीस ठाण्यात २२ वर्षीय युवकाच्या अपहरणाचा गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मखा गुलाब चव्हाण, सुनील मखा चव्हाण, अनिल मखा चव्हाण (सर्व रा. मुड्डोंगरी, ता. नांदगाव, जि. नाशिक) तसेच इतर एक इसम यांनी दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता ईडा साखर कारखान्याजवळून रविंद्र गोरख राठोड (वय २२) यास आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून जबरदस्तीने चारचाकी गाडीत बसवून कोठेतरी घेऊन गेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पीडित युवकाची आई जनाबाई गोरख राठोड (वय ४२) यांनी दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी परंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या प्रथम खबरीनुसार परंडा पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## आष्टामध्ये घरफोडी; घरातून चांदीचे नाणे लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ नोव्हेंबर -**
तालुक्यातील आष्टा जहागीर येथे घरफोडीची घटना घडली असून अज्ञात व्यक्तींनी घरातील रोख रक्कम व चांदीचे नाणे चोरून नेल्याची तक्रार उमरगा पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी उत्तम राघु कांबळे (वय ७०) हे पत्नीसमवेत देवदर्शनासाठी गावी गेले असताना, दि.१४ नोव्हेंबर रोजी सायं. ४ वाजेपासून ते दि.१५ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजेपर्यंत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाट उचकून चोरट्यांनी रोख रक्कम व चांदीची १७ नाणी असा मुद्देमाल लंपास केला.

## एनव्हीपी शुगरकडून शेतकऱ्यांना ४ कोटी ३ लाखांची ऊसबिल अदा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील जागजी शिवार येथील एनव्हीपी शुगर कारखान्याने १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल म्हणून रु. ४ कोटी ३ लाख ७५ हजार ४५८ रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली असल्याची माहिती चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.




एनव्हीपी शुगरने चाचणी गळीत हंगामापासूनच शेतकऱ्यांना अवघ्या १५ दिवसांत ऊसबिल अदा करण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. यंदाच्या गळीत हंगामातही ही परंपरा कायम ठेवत प्रतिटन रु. २५०० प्रमाणे ऊसबिल पंधरा दिवसांच्या आत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जात आहे. ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या तातडीच्या पेमेंट प्रणालीचा लाभ यंदाही शेतकऱ्यांना मिळत आहे.



याच अनुषंगाने १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान गाळपास झालेल्या ऊसाचे बिल पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी आणि उस्मानाबाद जनता सहकारी बँक येथील खातेदार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती चेअरमन नानासाहेब पाटील यांनी दिली.

### मोहिनी मेहेर कुस्ती स्पर्धेत विजेती

**धाराशिव, दि.१६ नोव्हेंबर -** लोणेरे आणि यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव येथील मोहिनी नारायण मेहेर हिने ५० किलो गटात प्रथम क्रमांक पटकावला.

## स्वप्निलची राज्यस्तरीय बास्केटबॉल संघासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ नोव्हेंबर -**
तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मकरंद बामनकर यांचे चिरंजीव स्वप्निल बामणकर याची राज्यस्तरीय बास्केटबॉल संघासाठी निवड झाली.



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सातारा श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलातून राज्यस्तरीय स्पर्धा पात्र संघ आणि खेळाडूंची यादी प्रसिद्ध झाली असून विश्वास विद्या निकेतन उच्च माध्यमिक विद्यालय यशवंतनगर चिखली,सांगली येथे आठवी वर्गात शिक्षण घेत असलेला आरळीतील विद्यार्थी स्वप्निल बामणकर याची राज्यस्तरीय बास्केटबॉल संघासाठी निवड झाली.

स्वप्निल बामणकर याच्या निवडीनंतर सरपंच किरण व्हरकट, माजी जि.प. सदस्य काशिनाथ बंडगर, पापालाल सय्यद, बजरंग कोकाटे, सुधाकर काटकर, सुभाष बामनकर, सौदागर गिड्डे, संजय घोडके, महेश सराटकर, प्रवीण व्हरकट, व्यंकट पाटील, धैर्यशील नारायणकर, मरगू बनपट्टे, दयानंद सोनवणे, ॲड. फारूक शेख, सिंकदर पिरजादे, अब्दुल सय्यद, नितेश तानवडे, सचिन पारवे, सुदेश माने, रामचंद्र भोसले आदींनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

## लोटस पोदार लर्न स्कूल, नळदुर्ग येथे बालदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ नोव्हेंबर -**
नळदुर्ग येथील लोटस पोदार लर्न स्कूल येथे बालदिन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.



या पूजनाचा मान विद्यार्थ्यांना देण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये बालदिनाविषयीचा आदरभाव आणि आनंद अधिक वाढला.

यानंतर शाळेतील शिक्षकांनी स्वतः आदर्श परिपाठ सादर करून विद्यार्थ्यांना शिस्त, वेळपालन आणि एकात्मतेचा सुंदर अनुभव दिला. कार्यक्रमादरम्यान शिक्षक मदन इगवे यांनी साने गुरुजींवर आधारित हृदयस्पर्शी गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

'बालदिन का साजरा करतो?' या विषयावर गीतांजली घोडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंडित जवाहरलाल नेहरू यांचा प्रेरणादायी जीवनपरिचय सांगितला. विविध स्पर्धांचे आयोजन राजरत्न बनसोडे यांनी केले.

तसेच विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी नृत्य, गायन अशा आकर्षक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले. स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्या रेवती शिंदे-मगर आणि प्रशासकीय अधिकारी योगेश सुर्यवंशी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज कुलकर्णी यांनी केले तर आभार महेश कोरे यांनी मानले.

या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जि.प. येरमाळा गटासाठी ज्योती जगताप यांची अधिकृत उमेदवारीची मागणी

### मजबूत राजकीय परंपरा आणि सक्रिय सामाजिक कार्याचा आधार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१६ नोव्हेंबर -**
जि.प. येरमाळा गटातील उमदवारीसंदर्भातील चर्चा जोर धरत असताना ग्रामपंचायत चोराखळी येथील विद्यमान सदस्य ज्योती तुकाराम जगताप यांनी जिल्हा परिषद सदस्यपदासाठी अधिकृत उमेदवारीची मागणी केली आहे.



पिढ्यान्पिढ्या लाभलेल्या भक्कम राजकीय परंपरा आणि शत-टक्के सामाजिक सक्रियतेच्या आधारे त्यांनी ही दावेदारी सादर केल्याची माहिती मिळते.

ज्योती जगताप यांचे कुटुंब ग्राम राजकारणात नेहमीच अग्रणी राहिले आहे. त्यांच्या सासऱ्यांनी काशिनाथ रामा जगताप यांनी १९८०-८५ या काळात उपसरपंच म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली.

त्यानंतर त्यांच्या जाऊ दैवशाला बापुराव जगताप यांनी १९९०-२००० दरम्यान सदस्य म्हणून कार्य करत गावातील महिलांच्या नेतृत्वाला बळकटी दिली. पुढे जगताप यांचे पती तुकाराम काशिनाथ जगताप यांनी २०१०-२०१५ या काळात उपसरपंच पदावर राहून विकासकामांना नवी दिशा दिली.

या समृद्ध परंपरेचा वारसा सांभाळत ज्योती जगताप यांनी ग्रामपंचायत सदस्या म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

गावातील मूलभूत प्रश्न, महिला सबलीकरण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, रस्ते व शैक्षणिक विकास यासाठी त्यांनी सक्रीय भूमिका घेतली आहे.

लोकांच्या समस्या वेळोवेळी मांडल्याने त्यांची लोकप्रियता वाढली आहे.

> जि.प. गटात अधिक व्यापक पातळीवर जनसेवा करण्याची माझी इच्छा आहे. महाआघाडीतील शिवसेना (उबाठा) घटक पक्षश्रेष्ठींनी माझ्या कार्याची दखल घेऊन मला जिल्हा परिषद सदस्यपदाची उमेदवारी द्यावी, अशी विनंती केली आहे.
> **- ज्योती जगताप**

> येरमाळा गटातील आगामी जि.प. निवडणुकीसाठी उमेदवारीबाबत उत्सुकता वाढली असून ज्योती जगताप यांची दावेदारी मजबूत मानली जात आहे. त्यांच्या उमेदवारीला स्थानिक महिलांचा तसेच ग्रामस्थांचा चांगला पाठिंबा मिळत असल्याचेही समजते. आता पक्षश्रेष्ठींकडून त्यांच्या नावाला हिरवा कंदील मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कानेगाव येथे १७ नोव्हेंबर रोजी लोकनाथ चषक ग्रामीण क्रिकेट स्पर्धा; ३२ संघांमध्ये रंगणार रोमांचक सामना

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ नोव्हेंबर -**
लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे कै. नाना कदम क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित लोकनाथ चषक भव्य ग्रामीण गावनिहाय क्रिकेट स्पर्धा दि.१७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गावोगावीच्या संघांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, फक्त ३२ संघांनाच प्रवेश दिला जाणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.



ग्रामीण भागातील तरुणाईला खेळातील कौशल्य आणि स्पर्धेचा थरार अनुभवण्याची उत्तम संधी म्हणून हा क्रिकेट सोहळा ठरणार आहे. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणून आकर्षक बक्षीस रचनेची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार प्रथम पारितोषिक ४१ हजार रूपये, द्वितीय पारितोषिक ३१ ४१ हजार रूपये, तृतीय पारितोषिक १५ ४१ हजार रूपये, चौथे पारितोषिक ७ ४१ हजार रूपये. ही स्पर्धा युवासेना लोहारा व आनंद तात्या पाटील मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, कार्यक्रमाचे आयोजक तथा आधारस्तंभ आनंद सतिशराव पाटील (लोकसभा अध्यक्ष, शिंदे युवासेना धाराशिव) यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

नामवंत खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थांनी या ग्रामीण क्रिकेट सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आनंद पाटील यांनी केले आहे.

# राधानगरीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मोफत वाटप

## पुणे येथील बाक्स्ट इंडियाचा पुरग्रस्तासाठी पुढाकार




**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १६ नोव्हेंबर :** ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत तेरणा नदीला आलेल्या महापुर आला. यामध्ये बाधित झालेल्या कुटुंवांना संसारपयोगी तर मुला, मुलींना आधार देण्यासाठी शालेय साहित्याच्या पुर्ण संचाचे ४०० विद्यार्थ्यांना पुणे येथील बाक्स्ट इंडिया प्रा. लि. कंपनीच्या वतीने विद्या ज्योती उपक्रमाअंतर्गत मोफत वाटप करण्यात आले. सरपंच युवराज गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष नारायण लोखंडे, औसा खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, माजी सभापती योगीराज पाटील, राष्ट्रवादीचे सिध्देश्वर आळंगे, शालेय समितीचे अध्यक्ष शब्बीर शेख उपस्थित होते. विद्या-ज्योती प्रकल्पाच्या कार्यक्रमाची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व आद्य क्रांतिकारक लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांचे शाल, पुष्पहार व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राधानगर उजनी, जिल्हा परिषद शाळा उजनी, सावित्रीबाई फुले कन्या शाळा राधानगर उजनी या तिन्ही शाळेतील ४०० पूरग्रस्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ हजार रुपये किमतीचे आवश्यक शालेय साहित्य मोफत संच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

वर्षानुवर्षे सततचा दुष्काळ आणि पाणीटंचाईनंतर या वर्षी अतिवृष्टीमुळे महापुराचे संकट आले. यामुळे पुराचे पाणी गावात शिरल्यामुळे गावांचा संपर्क तुटला होता.पुरामुळे शेती खरडून गेली, विहिरी भरल्या, शेतांमध्ये चिखल होवून काढणीसाठी आलेली पिके उद्ध्वस्त झाली. पुराच्या पाण्यामुळे दुधाळ जनावरे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. तसेच घर संसारासह शालेय विद्यार्थ्यांचे वह्या, पुस्तके, गणवेश, दप्तर यांसारखे शैक्षणिक साहित्य देखील वाहून गेले.

या पुरग्रस्तांना आधार देण्यासाठी पुणे येथील बॉक्स्ट इंडिया प्रा. लि. पिरंगुट या कंपनीच्या वतीने पूरग्रस्त विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य संच मोफत वाटप करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग, पाणी बॉटल, टिफीन बॉक्स, रजिस्टर, पेन्सील बॉक्स, कंपास पेटी, पेन, ड्रॉईंग वही आदी साहित्य यांचा समावेश आसलेले संच ४०० विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कंपनीचे ज्योतीराम काळे, विनायक चिल्का, आलिन नायन, दादासाहेब विर, अजित पिल्लाने, आसिफ मुल्ला, सोमनाथ कदम, पल्लवी देसाई, गोधियर दी मोन्टमरीन यांच्यासह जालिंदर शिखरे श्याम मोरे, सुरेश खर्चे आदी उपस्थित होते. शशिकला गवलवाड यांनी सुत्रसंचालन केले. मुख्याध्यापक रमेश काटे यांनी प्रास्ताविक केले तर संजयसिंग बायस यांनी उपस्थितांचे आभार मानले. केले. शिक्षक महानंदा कांबळे, उषा ठाकूर, विद्या नदीवाडे, सुभाष मुळे, अब्दुल करीम शेख यांच्यासह गावातील नागरिक, महिला, पालक व विद्यार्थी हे उपस्थित होते.या प्रकल्पाचा उद्देश राज योगिराज पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते यांनी स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, पुरामुळे कोणीही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये. साहित्य नष्ट झाल्यामुळे शाळा सोडण्याची वेळ येऊ नये. त्यामुळे कंपनीच्या वतीने हा प्रकल्प राबवला जात आहे.

**जीवाचे रान करत यश संपादन करा : तानाजी काळे**

विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार व वारसा पुढे सुरू ठेवावा. शिक्षणामुळे आपण यशाचे शिखर गाठु शकतो. आई वडील यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवाचे रान करत यश संपादन करा. यावेळी देण्यात आलेली छोटीशी मदत पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचं नुकसान भरून काढण्यासाठी उपयुक्त ठरेल. हाच यामागचा एकमेव उद्देश आहे.

# साकोळ येथील देवणी जातीच्या गायीची परळीत होणाऱ्या पशु प्रदर्शनासाठी शिफारस

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १६ नोव्हेंबर :** तालुक्यातील साकोळ येथील पशुपालक वाघमारे मनोज सुभाषराव यांच्या देवणी जातीच्या गायीची परळी वैजनाथ येथील साकोळ येथील देवणी जातीच्या गायीची शिफारस तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश पाटील यांनी केले.

तालुक्यातील साकोळ येथील मनोज सुभाष वाघमारे यांच्या देवणी गोवंश जातीच्या गायीची परळी येथे होणा-या डिसेंबर २०२५ च्या आखील भारतीय पशुपक्षी प्रदर्शनात शिफारस करित असल्याचे शिरूर अनंतपाळ तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रृषीकेष पाटील यांनी तरुण भारतशी बोलताना म्हणाले. साकोळ येथील पशुपालक मनोज सुभाष वाघमारे हे गेल्या बऱ्याच वर्षांपासून विविध जातीतील गोवंश पाळण्याचा व्यवसाय



त्यांचे वडील सुभाष नरसिंग वाघमारे व आजोबा नरसिंगा वाघमारे यांना देवणी जातीच्या गाईंचे संगोपन करणे फार आवडत होते. नरसिंगा वाघमारे यांचा हा छंद पिढीजात चालत आलेला व्यवसाय आहे. त्यांचा वारसा मनोज सुभाष वाघमारे यांनी पुढं कायम चालू ठेवून पशुपालक शेतकरी वर्गात एक आदर्श ठेवला आहे.

येथील शेतकऱ्यांना नवनवीन लालकंधारी, जरसी, देवणी अशा विविध जातीची गोवंश पाळण्याचा छंद असून हे गोवंश सांभाळण्यासाठी शासन स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येऊन जास्तीत जास्त गोवंश पालन कसे करता येईल याकडे शासनांकडून भरीव स्वरूपाचे अनुदान तसेच छोटे मोठे प्रदर्शन भरविण्यात येऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. पशुधनातून मिळणाऱ्या अतिरिक्त आणि स्थिर उत्पन्नामुळे शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेत पशुपालन व त्यापासून दुग्ध व्यवसाय महत्त्वाचा घटक मानला जातो आहे.

म्हणूनच तालुक्यातील साकोळ येथील मनोज सुभाष वाघमारे यांच्या देवणी जातीतील गायीची परळी येथे होणाऱ्या अखील भारतीय पशुप्रदर्शात पाठविण्याची शिफारस तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रृषीकेष पाटील केली असल्याचे त्यांनी सांगितले. मनोज वाघमारे यांच्या देवणी जातीच्या गायीने आतापर्यंत महाराष्ट्रासह दिल्ली, हरियाणा, मध्यप्रदेश, आणि कर्नाटक या राज्यांच्या पशुप्रदर्शनात भाग घेवून अनेक बक्षिसे मिळविली आहेत.

२०२५ मध्ये सुध्दा मनोज वाघमारे यांच्या गायीची शिफारस डॉ. ऋषिकेश पाटील यांनी केल्यामुळे गावातील महेश तिवारी, आशिष धुमाळे, सविचार कांबळे भातांगळीकर, प्रदीप पाटील, व्यंकट रवळे, सत्यम पाटील, मंगेश महाजन, महेश तिवारी, इरफान होनमाळे, देविदास वाघमारे, शेख इरफान, अनंत शिंदे प्रशांत शिंदे, मधुकर कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# वलांडी येथे ७ व ८ जानेवारीला उमुमी इस्तेमाचे भव्य आयोजन

**त.भा. वृत्तसेवा/ रियाज मोमीन**

**वलांडी, १६ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील वलांडी येथे अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उमुमी इस्तेमा आयोजित होणार असल्याची जाहीर झाली आहे. येत्या ७ व ८ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या या ऐतिहासिक आणि सातही सेंटर्सच्या संयुक्त भव्य इस्तेमासाठीची प्राथमिक नियोजन बैठक रविवारी उस्मानिया फंक्शन हॉल येथे उत्साहात पार पडली.

लातूर व उदगीर येथून विशेष आलेले इस्लाम धर्माचे प्रमुख अमीर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत सर्वसमावेशक नियोजन, समित्यांची जबाबदारी, पाहुण्यांचे स्वागत, कार्यक्रमाची आखणी, निवासव्यवस्था, साफसफाई, पाणीपुरवठा, वाहतूक, सुरक्षा आणि इतर सर्व आवश्यक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस ७ केंद्रांतील एकूण ८७ मशिदींचे प्रमुख, जबाबदार आणि मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वलांडी सेंटर, देवणी सेंटर, गुरुनाळ सेंटर, मोगा सेंटर, कमालनगर सेंटर, उदगीरचे दोन प्रमुख झोन हे समाविष्ट सात सेंटर्स आहेत.

सर्व प्रतिनिधींनी इस्तेम्याच्या सर्व सोयी-सुविधा पुरविण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारली असे सांगून पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

वलांडीतील इस्लामिक धर्माचे तरुण मंडळींनी संपूर्ण जिमी मशवर्याचे नियोजन अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पाडले. सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या मशवर्यात उपस्थितांनी भावनिक आणि उत्साही वातावरणात तयारीला सुरुवात झाली असल्याचा आनंद व्यक्त केला.

येणारा उमुमी इस्तेमा हा सात सेंटर्सचा संयुक्त आणि भव्य आयोजन म्हणून वलांडीमध्ये पार पडणार आहे. या यशस्वी प्रारंभिक बैठकीनंतर आता पुढील नियोजनाला गती मिळणार असून, इस्तेम्याच्या सर्व तयारीचे काम अधिक जोमाने हाती घेतले जाणार आहे.

# भाजपने 'बिहार'च्या विजयोत्सव केला साजरा

**त.भा. वृत्तसेवा**

**निलंगा, १६ नोव्हेंबर :** भारतीय जनता पार्टी व संयुक्त जनता दल प्रणित एनडीए आघाडीने बिहार विधानसभा निवडणुकीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल या विजयाचे शिल्पकार पंतप्रधान. नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा व या प्रचार मोहिमेत मोलाची भूमिका बजावणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून भाजपा युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या



नेतृत्वाखाली निलंगा शहरात फटाक्यांची आतिषबाजी करून व मिठाई वाटप करून बिहारच्या विजयोत्सव साजरा करण्यात आला.

बिहारचा निकाल हा फक्त एक ऐतिहासिक विजय नसून देशात होत असलेल्या परिवर्तनाचे ते द्योतक आहे. विरोधकांनी पसरवलेल्या वोटचोरी सारख्या खोट्या अफवांना दिलेले हे चोख उत्तर आहे. बिहारी जनतेने विरोधकांना या निकालातून सांगितले आहे, तुम्ही किती खोटी राळ उठवली. तरी हा देश भाजप आणि विकास सोबतच राहणार आहे. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे, संजय दोरवे, शहराध्यक्ष रवी फुलारी, वैभव पाटील, ईश्वर पाटील, भगवान बाहेती, सुमित इन्नानी, शरद पेठकर, किशोर लंगोटे, त्यांच्या मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'यशवंत'च्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत सादरीकरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १६ नोव्हेंबर :** राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२४-२५ अन्वये राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा दि.१२ नोव्हेंबर रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

या मध्ये लिंग समानता, पर्यावरण संरक्षण, सायबर सुरक्षा अशा विषयावर लोकनृत्याचे सादरीकरण झाले. सदरील स्पर्धेत यशवंत विद्यालय अहमदपूर येथील स्वराली घाटोळ, मोक्षा बाफना, अंकिता फड,प्राची मिरजगावे, खुशी इरले यांनी हिंसा व व दुखापती पासून संरक्षण या विषयावर लोकनृत्य सादर केले. कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणेचे संचालक राहुल रेखावार (भाप्रसे), सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक श्रीमती ज्योती शिंदे, श्रीमती वर्षाराणी भोपळे, सामाजिक शास्त्र विभागाचे उपसंचालक अरुण जाधव, दत्तात्रय थिटे, रामेश्वर लोटके, श्रीमती ज्योती शिंदे यांच्या उपस्थितीत यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते



कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सुत्र संचलन बाळासाहेब गायकवाड यांनी केले तर आभार ज्योती शिंदे यांनी मानले.

या सादरीकरणाबद्दल संचालक राहुल रेखावार, डॉ. कमलादेवी आवटे, श्रीमती ज्योती शिंदे, श्रीमती वर्षाराणी भोपळे, अरुण जाधव, दत्तात्रय थिटे, रामेश्वर लोटके, श्रीमती ज्योती शिंदे, बाळासाहेब गायकवाड, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, संस्थेचे सचिव डी.बी.लोहारे गुरुजी, डॉ. भालचंद्र पैके, डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, माधव वाघमारे, रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी आदींनी अभिनंदन केले.

# तुगाव पीएम श्री शाळेत बालदिन, पालक मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १६ नोव्हेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील तुगाव हा येथील पी एम श्री सरकारी आदर्श प्राथमिक शाळेमध्ये १४ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी बालदिन व महापालक मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व सरस्वती माता प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका सौ. मुक्ताताई एकलुरे व तुगाव हा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. सविता पिचरुटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मेहकर पोलीस स्टेशनचे पीएसआय सुदर्शन रड्डी, माजी सरपंच जाकिया निसार मुजावर शाळा सुधारणा समिती अध्यक्ष बालाजी आडबाळे, सौ. जगदेवी मुळे, पीडीओ मगर पाटील, खंडू मुळे, पप्पू तुळजापुरे, पत्रकार दत्तात्रय साबणे या प्रमुख मान्यवरांचा शाळेच्या वतीने शाल पुष्पहार देऊन सात्विक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सौ. जयमाला पुरकर यांनी प्रार्थना गीत गायले. प्रास्ताविक सौ. वर्षा पाटील यांनी केले.

यावेळी शिक्षक-शिक्षिका अशोक रामा, नरसिंग मेहत्रे, अर्जुन कांचे, संतोष लासूने, अनंतोष सूर्यवंशी, दत्ता सूर्यवंशी, सौ. जय माला पुरकर, सौ. वर्षा पाटील, सौ. शोभाताई मजकुरे, रेणुका जाधव, सौ. शिल्पा पाटील, सौ. श्वेता कोणे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित मंडळी, शिक्षक-शिक्षिका, माता-बहिणी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरसिंग मेहत्रे यांनी तर आभार प्रदर्शन सौ. शिल्पा पाटील यांनी मानले.

# रेणापूर नगराध्यक्षपदासाठी शोभा आकनगिरेंचा उमेदवारी अर्ज दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर , १६ नोव्हेंबर :** रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या वतीने श्रीमती शोभा शामराव आकनगिरे यांचा उमेदवारी अर्ज १५ नोव्हेंबर शनिवार रोजी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत दाखल करण्यात आला. यावेळी भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी होते.

येत्या २ डिसेंबर रोजी रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी मतदान होणार असून भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली रेणापूर शहरात कोट्यावधी रुपये खर्चाच्या केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर संपूर्ण ताकतीनीशी भारतीय जनता पार्टी निवडणूक रिंगणात उतरली आहे.

या निवडणुकीत नगराध्यक्षपद महिलेकरिता आरक्षित असून या पदासाठी भाजपाच्या वतीने श्रीमती शोभा शामराव आकनगिरे यांनी भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत १५ नोव्हेंबर शनिवार रोजी दुपारी रेणापूर तहसील कार्यालय येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ मुळे, महादेव साळुंखे, अँड मनोज कराड,




भोसले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, माजी सभापती अनिल भिसे, उपसभापती अनंत चव्हाण, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, शहराध्यक्ष अच्युत कातळे, किसान मोर्चाचे साहेबराव सरपंच सुनील चेवले, रवींद्र नागरगोजे, नामदेव बोबडे, विष्णू गोरे, पद्माकर चिंचोलकर, रवींद्र पाटील, रामराव मोरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, दत्ता सरवदे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेळगाव, परीसरातील शेतकऱ्यांना नाम फाउंडेशनकडून मोफत बियाणे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १६ नोव्हेंबर :** चाकूर तालुक्यातील शेळगाव व परीसरातील १५० शेतकऱ्यांना हरभरा व ज्वारी बियाण्यांचे दि.१४ नोव्हेंबर रोजी मोफत वाटप करण्यात आले.

नाम फाउंडेशन व बीएएसएफ या संस्थेच्या वतीने शेळगाव, राचन्नावाडी, चवळेवाडी, संगाचीवाडी येथील शेतकऱ्यांना मोफत रब्बी हंगामासाठी हरभरा व ज्वारी बियाणेच्या १५० बॅगांचे मनोज नानासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली निलेश भोसले व नाम फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक विलास चामे यांच्या हस्ते बियाणे वाटप करण्यात आले.

मागील काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रासह लातूर जिल्ह्यातील शेळगाव परीसरात मोठ्याप्रमाणात अतिवृष्टी व पुरस्थिती निर्माण होऊन शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे, यांना सहाय्य करण्याचे सामाजीक उदात्त हेतू ठेऊन नाम फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक विलास चामे यांना वेळोवेळी संपर्कात राहून मनोज नानासाहेब पाटील यांनी शेळगाव व परीसरातील बाधीत शेतकरी आर्थिक संकटात येऊ नये, त्यांना रब्बीच्या पेरणीसाठी मदत करावे म्हणून नाम फाउंडेशन कडे शेतकऱ्यांसाठी सहाय्य करण्याची विनंती केली होती.




रब्बी हंगामासाठी मोफत हरभरा व ज्वारी बियाणेच्या १५० बॅगचे वाटप करण्यात आले.यावेळी शेतकऱ्यांना रब्बीच्या पेरणीसाठी हरभरा व ज्वारी या बियाण्यांचे मोफत बियाणे मिळाल्याने शेतकऱ्यांकडून नाम फाउंडेशन व यांचेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला परीसरातील शेतकऱ्यांस युवा कार्यकर्ते मनोज पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी शेळगावचे ग्रामसेवक बी.एन.शिंदे, चेअरमन शिवाजी वागलगावे, संचालक संपत मलिशे,उत्तम सोनकांबळे, ग्रामरोजगार सहाय्यक बापुराव माने, पत्रकार सतिष गाडेकर, शेतकरी मुकुंद कस्तूरे, सोमनाथ वाडकर, उमाकांत झुलपे, दिनकर कुलकर्णी, सुरेश पाटील, रामरतन पाटील, शरद पाटील, मन्मथ पाटील, प्रेमरस चवळे, विद्यासागर चवळे, सोमनाथ चवळे, नवनाथ तोंडारे, संगम हावा, रामराजे पाटील, मारोती पाटील, दयानंद बिराजदार, प्रमोद पाटील, शाम बोरुळवाड, खंडू वागलगावे, पुंडलिक सुरवसे, धनराज घुमाडे, माधव वागलगावे सह २०० शेतकरी बांधव यावेळी उपस्थीत होते.

शेतकरी व गावकरी बांधवाना जेथून मदतीचा हात मिळेल ते देण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असणार आहोत. परीसरातील व्यापारी तसेच शेतकरी, वयोवृध्द, नागरीकांना डीसीसी बँकेची सुवीधा उपलब्ध करुन देण्यात आली व शासनाचे खरेदी विक्री केंद्र सुरू करुण आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व शेतकरी वर्गाला सतत दिलासा देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत, अशी माहिती युवा कार्यकर्ते मनोज पाटील यांनी दिली.

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार **श्री. प्रमोद वसंतराव नखाते** यांनी रमाकांत नामदेव सुर्यवंशी, रा. झरी खु., ता.चाकूर जि. लातूर यांच्या स्वकष्टार्जीत मालकी व ताब्यातील **मौ. चाकूर, ता. चाकूर जि. लातूर** येथील जमीन गट नं. ४७१/१/१४ मधील प्लॉट नं. २ ज्याचा नगर पंचायत मिळकत नं. ६६६० असून ज्याचा अकृषी क्र. २००३/एन.ए./सी.आर./डब्ल्यु. एस./२२१ सब डिव्हीजनल ऑफिस उदगीर दिनांक २५/०१/२०२३ अधारे अकृषी केलेला प्लॉट ज्याची साईज **पूर्वेस-२० फुट रस्ता, पश्चिमेस-बंडाप्पा मल्लिकार्जुन कंठे यांची जमीन, दक्षिणेस - प्लॉट नंबर १, उत्तरेस - प्लॉट नंबर ३.**

येणेप्रमाणे वरील चतुसिर्मेच्या आतील मौ. चाकूर येथील खुला प्लॉट माझे पक्षकार यांनी कायम खरेदी करण्याचा ठराब केला असून ठरावापोटी ठरलेल्या रक्कमे पैकी त्यांना इसारा रक्कम पंचा समक्ष दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वीवाद व निरजोखमी असल्याचे लिहून देणार यांनी सांगीतले आहे. तरी परंतु माझे पक्षकार यांनी सर्व जनतेच्या माहितीसाठी सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळवण्यात येते की, सदर मिळकती संबंधी कोणाचे हितसंबंध, दावा, हक्क, करार, मदार तसेच कर्ज बोजा, गहाणखत, अथवा इतर कुठल्याही प्रकारचे हितसंबंध असतील त्यांनी सदर जाहीर प्रगटन झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी उजर, हरकती कळवाव्यात अन्यथा सदरची मिळकत ही निर्विवाद व निरजोखमी असल्याचे समजून माझे पक्षकार पुढील व्यवहार पुर्ण करतील व त्या नंतर आलेल्या उजर किंवा आक्षेप माझे पक्षकार यांच्यावर बंधनकारक रहाणार नाहीत.

याची सर्व जनतेने नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.

**दिनांक : १६/११/२०२५.**

**अॅड. बी. बी. नंदागवळे**

कार्यालय : लिगल पॉइंट, शॉप नंबर १२, उद्योग भवन, एमआयडीसी, चाकूर


जाहीर प्रगटन देणार : **श्री.प्रमोद वसंतराव नखाते**

रा.चाकूर ता. चाकूर जि. लातूर

# वॉन्टेड गुंडावर गोळीबार करून अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**
गंभीर गुन्ह्यामध्ये पाहिजे असलेल्या रब्ज्योतसिंघ उर्फ गब्या नावाच्या गुंडास वजिराबाद पोलिसांनी गोळीबार करून ताब्यात घेतले. हि घटना दि.१६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री बाराच्या सुमारास शहरातील भगतसिंघ रस्त्यावर घडली.

वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला दि.१६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री शहिद भगतसिंघ रस्त्यावर खंडणी, जिवघेणे हल्ले अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेला आरोपी रब्ज्योतसिंघ उर्फ गब्या हा दिसला. पोलिसांनी त्याला अटक



करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांवर झडप घालून त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस अंमलदार गणेश धुमाळ यांनी बचावात्मक कारवाई करत त्याच्या कंबरेवर गोळी झाडली. यात तो जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर सध्या उपचार सुरु आहेत. या प्रकरणी गणेश धुमाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रब्ज्योतसिंघ उर्फ गब्या याच्यावर स्थानिकांना धमकावणे, खंडणी उकळणे, गुन्हेगारी टोळ्यामार्फत वसुली करणे, जिवघेणे हल्ले करणे आदी गंभीर गुन्हे दाखल असून, मागील अनेक वर्षापासून तो फरार होता. दिर्घकाळ पसार असलेल्या गब्याला वजिराबाद गुन्हे शोध पथकाने अटक केली असून, त्यांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# योग केल्यामुळे मनाचे प्रदूषण आजारापासून लांब राहते : नरेंद्र चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**
योग केल्यामुळे मनाचे प्रदूषण आजारापासून लांब राहते तसेच ज्यांचे कडे लक्ष्मी आहे ती येते किंवा जाते परंतु ज्यांच्याकडे सरस्वती आहे त्यांच्याकडे लक्ष्मी ही असते असे प्रमुख प्रतिपादन भाऊराव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांनी केले.

भारतीय जनता पक्ष आणि नित्य योग सेवा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथील प्रभाग क्रमांक चार मध्ये , नाईक नगर येथील हरित क्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक उद्यानात आठ दिवसीय रोगमुक्ती साठी मोफत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबिराच्या समारोपीय प्रसंगी नरेंद्र चव्हाण बोलत होते.

योगाचार्य नांदेड भूषण तथा योगऋषी स्वामी रामदेव बाबा यांनी आदर्श योग शिक्षक पुरस्कार म्हणून गौरवलेले सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले असून या शिबिराला प्रचंड प्रतिसाद लाभला. नांदेड जिल्ह्यातून हजारो योग साधकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिरासाठी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नांदेडच्या माजी महापौर सौ शैलजाताई किशोर स्वामी, स्थाई समितीचे माजी सभापती किशोर स्वामी तसेच नगरसेवक दयानंद वाघमारे यांनी संयोजनाची मोठी जबाबदारी पेलली.

योग शिबिराच्या समारोपीय प्रसंगी भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी संयोजक नांदेड मनपा माजी सभापती किशोर स्वामी व माजी नांदेड मनपा महापौर शैलजा स्वामी यावेळी माजी नगरसेवक दयानंद वाघमारे, तसेच योग गुरु सीताराम सोनटक्के, गजानन कदम, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका गायत्री कदम, माजी नगरसेविका सुनंदा पाटील, दीपक पाटील, माजी नगरसेवक विश्वास कदम, अनुसया चौधरी मीनाक्षी चिद्रुरुगे संतोष मुधाकर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्रा. विलास गारोळे यांच्या संगीत संचाने संपूर्ण आठ दिवस आपली उत्कृष्ट संगीत सेवा दिली. समारोपिय कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्याने योग शिबिरात रोमांच आणले. तर योग साधक पत्रकार मकरंद पांगरकर, सौ. रेखा धूत, योगाने ब्रेन ट्युमर बरा झालेला शशिकांत गंगाधर कदम यांनी प्रतिक्रिया दिल्या. तर कु. सिद्धी कोकरे हिने बहारदार भरत नाट्यम नृत्य केले.

कार्यक्रमाचे संचालन वृक्ष मित्र फाउंडेशनचे संतोष मुधुकर यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रभाग क्रमांक चार चे सर्व भाजपाचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## शिवाजीराव जाधव यांना नानक साई फाऊंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार

**नांदेड** -येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी तालुका मुखेड चे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे मुखेड तालुका अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांना नानक साई फाऊंडेशन चा संत नामदेव जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. लंगर साहिब गुरुद्वारा चे जथेदार



महान तपस्वी श्रीमान संत बाबा बलविंदरसिंघजी यांच्या हस्ते तर खा. प्रा. रवींद्र चव्हाण,आ. बालाजीराव कल्याणकर,नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष पंढरीनाथ बोकारे, चैतन्यनगर शिवमंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष माधवराव पटणे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजीराव जाधव यांना हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. नानक साई फाऊंडेशन दर दोन वर्षांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा संत नामदेव महाराज यांच्या नावाने 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करत असते, शिवाजीराव जाधव यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याची नानक साई फाऊंडेशनने नोंद घेऊन संतांच्या नावे असलेल्या संत नामदेव जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमातून शिवाजीराव जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत गोर, गरीबांचे मुलांना मोफत शिक्षण देऊन, भावी चांगली पिढी निर्माण व्हावी यासाठी शिक्षण महर्षी स्व. नागोराव जाधव यांचे कार्य ते नेटाने पुढे चालवत आहेत. शिवाजीराव जाधव यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातील अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी डॉ. मुजाहिद खान

**नांदेड** -राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीच्या अल्पसंख्यांक विभाग प्रदेश कार्याध्यक्षपदी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री कमलकिशोर कदम यांचे निष्ठावंत कार्यकर्ते डॉ. मुजाहिद खान यांची निवड करण्यात आली. मुंबई येथील पक्ष कार्यालयात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीत विविध पदावर डॉ. मुजाहिद खान यांनी काम करून विविध सामाजिक उपक्रम राबवत पक्षाचे विचार, ध्येय-धोरण जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री कमलकिशोर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मुजाहिद खान यांनी नांदेड शहर आणि जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम घेतले आहेत. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, पूरग्रस्त नागरिकांना मोफत उपचार, कोवीड काळात, गरजूंना मोफत आरोग्य सेवा असे विविध उपक्रम राबवत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष सिराज मेहदी साहेब यांच्या सुचनेवरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी डॉ. मुजाहिद खान यांची अल्पसंख्यांक विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी निवड केली. मुंबई येथील पक्ष कार्यालयात नुकतेच त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी प्रदेश अल्पसंख्यांक विभागाचे प्रभारी नसीम सिद्दिकी, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार, मुंबई शहराध्यक्ष रेखाताई अहिर, जिल्हा उपाध्यक्ष मोहम्मद तनवीरोद्दीन, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख रहेमद आदींची उपस्थिती होती. डॉ. मुजाहिद खान यांच्या निवडीबद्दल अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिल्हा रुग्णालयात जागतिक मधुमेह दिन साजरा

**नांदेड** -नांदेड जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ संजय पेरके व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ पांडुरंग पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला. यावेळी रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना वैद्यकीय अधिकारी डॉ. चांदू पाटील यांनी मधुमेहाची लक्षणे, मधुमेहामुळे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच मधुमेह आजारासंबंधी घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थी, उपस्थित रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपाच्या अनुषंगाने बोलताना एनसीडी नोडल अधिकारी डॉ. हनुमंत पाटील म्हणाले की, दिवसेंदिवस व्यक्तीचे शारीरिक (कष्टाची कामे) कमी होत आहेत, त्यामुळे त्यांना मधुमेहासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने दररोज किमान अर्धा तास तरी शारीरिक व्यायाम तसेच कष्टाची कामे केले पाहिजे. तसेच आहारात मिठ आणि साखरेचे प्रमाण कमी ठेवावे, संतुलित आहार घ्यावा जेणेकरून व्यक्तींना मधुमेह सारखा आजार नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल. यावेळी तंबाखूमुक्त युवा अभियान ३.० जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमास निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच.के. साखरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी माने, डॉ.सुमित लोमटे, डॉ. शाहू शिराढोणकर, डॉ.सुजाता राठोड, डेंटल सर्जन डॉ. दीप्ती सूर्यवंशी, एनसीडी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. उमेश मुंडे, मेट्रन सुनिता राठोड, प्राचार्या सुनिता बोथीकर, इंचार्ज श्रीमती नारवाड, श्रीमती बंडेवार तसेच जिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी, नर्सिंग महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी तसेच रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय अधिकारी डॉ. विखारुनिसा खान यांनी तर सूत्रसंचालन बालाजी गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश आहेर, सदाशिव सुवर्णकार, सुनिल तोटेवाड व चंद्रभान कंधारे यांनी परिश्रम घेतले.

## शाश्वत भुयारे यांची राज्य चाचणीसाठी निवड

**नांदेड** -येथील किड्स किंगडम स्कूल श्री चैतन्य टेक्नो स्कूलचा विद्यार्थी व मराठवाडा क्रिकेट अॅकॅडमीचा खेळाडू शाश्वत भुयारे यांची नाशिक येथे दि. २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धा व निवड चाचणीसाठी नुकतीच निवड झाली आहे. शाश्वत भुयारे यांनी किड्स किंगडम श्री चैतन्य टेक्नो स्कूलकडून तालुका, जिल्हा व धाराशिव येथे विभागीय स्तरावर मॅच विनिंग कामगिरी केल्यामुळे नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध कामांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**
नांदेड तालुक्यातील नाळेश्वर पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील राहाटी (बु.) या गावाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकतीच भेट दिली. पशुसंवर्धन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची त्यांनी पाहणी करुन शेतकरी व पशुपालकांशी संवाद साधला.

जिल्हाधिकारी यांनी राष्ट्रीय दुध विकास मंडळ, दिल्ली (एनडीडीबी) मार्फत पुरविल्या जाणाऱ्या कृत्रिम रेतन सुविधांची तपासणी केली. कृत्रिम रेतनाद्वारे जन्मलेल्या कालवडीची पाहणी करून पशुपालकांनी या अत्याधुनिक सेवांचा अधिकाधिक लाभ घेऊन आपल्या घरीच उच्च वंशावळीच्या कालवडी तयार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांअंतर्गत सुरू असलेल्या दिगंबर के. बोकारे यांच्या पनीर निर्मिती उद्योगाची पाहणी करत त्यांनी उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता आणि बाजारपेठेची माहिती घेतली. सदर शेतकरी दररोज गावातच उत्पादन झालेल्या ४०० लिटर दुधापासून दररोज १८० किलो स्वच्छ, ताजे व भेसळमुक्त पनीर तयार करून नांदेड शहरास पुरवठा करतात याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

नांदेड जिल्ह्यात सुरू होणाऱ्या विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा दोन प्रकल्पातील योजनांचा व महिलांच्या मराठवरहाड दूध उत्पादक कंपनीचा व राष्ट्रीय दुध विकास मंडळ दिल्ली यांचेमार्फत बायोगॅस प्रकल्प उभारणीच्या उपक्रमाचा पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

एक गाव एक फार्म गृहीत धरून हा प्रकल्प राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

भेटीदरम्यान जिल्हाधिकारी कर्डीले यांनी मराठवऱ्हाड दूध उत्पादक कंपनीचे सहायक ज्ञानोबा बोकारे, माधव मारोती बोकारे आणि दिगंबर केशवराव बोकारे यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या कामाचा आढावा घेतला. या कार्यक्रमास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार पाडिले, पशुधन विकास अधिकारी नाळेश्वर डॉ. दीप्ती एम. चव्हाण तसेच कृत्रिम रेतन तंत्रज्ञ परसराम जमदडे उपस्थित होते.

# देगलूरात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रचार यंत्रणेत आघाडीवर

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. १६ नोव्हेंबर-**
येथील नगरपरिषद निवडणुकीची वातावरणनिर्मिती जोर धरत असून सध्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या दोन प्रमुख पक्षांनी प्रचार यंत्रणेत स्पष्ट आघाडी घेतली आहे. तर भारतीय जनता पक्षाकडूनही 'डोअर टू डोअर' प्रचार मोहीम राबवली जात आहे. पण अद्याप भाजपाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची अधिकृत घोषणा करण्यात आली नसल्याने भाजपा आघाडी कधी घेणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.



नगरपरिषद निवडणुकीची प्रचार यंत्रणा सकाळपासून रात्रीपर्यंत घराघरांमध्ये संपर्क, गाठीभेटी, प्रभागनिहाय समीकरणे आणि संघटनात्मक तयारीचा वेग वाढला आहे. सध्या देगलूरात माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे प्रचार विविध प्रभागात चालू आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे लक्ष्मीकांत पदमवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते सक्रीय झाले आहेत. भाजपाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची अद्याप अधिकृत घोषणा न झाल्याने स्पष्ट भूमिका दिसून येत नाही. पण नुकतेच भाजपात गंगाधर भांगे आणि प्रशांत दासरवाड यांच्या कुटुंबियांपैकी एकास नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मिळेल अशी चर्चा आहे.

यंदा पक्षप्रवेश, प्रचाराची गती, नियोजन आणि कार्यकर्त्यांची हालचाल पाहता काँग्रेसने चांगलेच मैदान तयार केले आहे पण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडूनही व्यूहरचना आखली जात असल्याची भावना व्यक्त होत आहेत. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आपापल्या प्रभागात भेटीगाठी घेत हालचाल गतीमान करीत असल्याचे दिसून येत आहे. मोठा जनसमुदाय न जमवता अंतर्गत प्रचार यंत्रणा भाजपाची चालू आहे. यासाठी आमदार जितेश अंतापुरकर आणि माजी नगराध्यक्ष शंकरराव कंतेवार यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

इतर पक्षांकडूनही काही प्रमाणात हालचाली सुरु आहेत. काही पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपात सामील होण्याची चिन्हे दिसत आहेत. सद्यः स्थितीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचा प्रचार अधिक परिणामकारक ठरत असून खरी लढत या दोनच पक्षांमध्ये होण्याची शक्यता आहे.

# क्रीडा स्पर्धासाठी वसतिगृह रिकामे करण्याचे आदेश; एनएसयुआयचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**
स्वा. रा. ती. म. विद्यापीठात क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन होणार असून राज्यभरातून सुमारे ४५०० स्पर्धक यांत सहभागी होणार आहेत. या स्पर्धकांच्या निवासासाठी विद्यापीठ प्रशासनाने सध्याच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना तात्पुरते वसतिगृह रिकामे करण्याचे निर्देश दिले आहेत. पूर्वी विद्यार्थ्यांना महिनाभरासाठी तर आता तो आदेश बदलून आठ दिवसांसाठी सर्व साहित्यासहित वसतिगृह सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाचा विरोध करत एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष सुरज पाटील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला निवेदन



दिले.

विद्यार्थ्यांनी यांस विरोध केला असता, विद्यापीठ प्रशासन त्यांस जुमानत नाही. विद्यार्थ्यांच्या या विरोधात एनएसयुआयने उडी घेतली असून, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष सूरज पाटील शिंदे हे गेल्या चार ते पाच दिवसांपासून वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपर्कात असून, त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व विद्यार्थ्यांच्या या समस्येबाबत प्र-कुलगुरू महाजन यांनी निवेदन दिले व या विद्यार्थ्यांच्या अडचणींवर त्यांच्याशी संवाद साधला. विशेष म्हणजे सदर निवेदनावर वसतिगृहात राहणाऱ्या दोनशे विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

यांबाबत माध्यमांशी बोलताना सूरज पाटील-शिंदे यांनी सांगितले की, क्रीडा स्पर्धांचे आयोजन स्वागतार्ह आहे; परंतु त्यासाठी आधीपासून वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थलांतर करण्यास भाग पाडणे योग्य नाही. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होतील, तसेच यामुळे विनाकारण आर्थिक भार आणि विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या बाबतीत प्रश्न निर्माण होऊ शकतात. विद्यापीठ प्रशासनाला सदर स्पर्धेच्या आयोजनाची तब्बल वर्षभरापूर्वी सूचना मिळाली होती, तर त्या वर्षभरात विद्यापीठाने येणाऱ्या ४५०० च्या खेळाडूंच्या राहण्याची वेगळी व्यवस्था करण्याचे नियोजन का केले नाही ? पुढे बोलताना त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. निर्णय रद्द न केल्यास एनएसयुआयतर्फे सोमवार, १७ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड एनएसयुआयची संपूर्ण टीम वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन विद्यापीठात लाक्षणिक उपोषण करेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. मात्र विद्यापीठ प्रशासनाकडून या प्रकरणी अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# पीएनजी ज्वेलर्स'तर्फे नव्या पिढीच्या वधूसाठी 'प्रथा' संग्रह सादर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**
भारतीय विवाहसोहळ्यांच्या हंगामाची सुरुवात होत असताना, भारतातील सर्वात विश्वासार्ह पारंपरिक दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'ने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे.

'प्रथा' म्हणजेच 'परंपरा'. हा संग्रह भारतीय स्त्रीच्या सौंदर्य, भावना आणि कलात्मकतेचे प्रतिनिधित्व करतो. या नव्या कलेक्शनमध्ये सोने आणि हिरे जडित सुंदर ब्रायडल सेट्स, हार, कानातले, बांगड्या आणि मांगटिका यांचा समावेश आहे. प्रत्येक दागिन्याच्या डिझाईनमध्ये पारंपरिक नक्षीकाम आणि आधुनिक डिझाईन्सचा सुंदर मिलाफ दिसून येतो, जो आजच्या आत्मविश्वासू आणि समंजस वधूंसाठी खास तयार करण्यात आला आहे.

विवाह हंगामाच्या निमित्ताने पीएनजी ज्वेलर्सतर्फे ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५ टक्के पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ० टक्के कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ''प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक डिझाईन वधूच्या नव्या प्रवासाची सखी बनावी, या उद्देशाने तयार केले आहे.



**हदगाव: माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष पदासाठी कुमुद सुनील सोनुले यांनी दि.१६ नोव्हेंबर रोजी काँग्रेस पक्षाच्या वतीने नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांच्या कडे दाखल केले.**

# कुंटूर जि.प. गटात तिरंगी लढतीची चाहूल ; ओबीसी मतांची एकजूट समीकरणे बदलणार?

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. १६ नोव्हेंबर-**
नायगांव तालुक्यातील बहुचर्चित कुंटूर जिल्हा परिषद गट यंदा इतर मागासवर्गीय महिला या प्रवर्गासाठी राखीव असल्याने, या गटात अभूतपूर्व तिरंगी लढत रंगण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. स्थानिकराजकारणात बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या गटात पहिल्यांदाच तीन प्रभावी उमेदवारांमध्ये चुरस निर्माण झाली आहे.

कुंटूर साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कुंटूरकरांच्या सौभाग्यवती सौ. मधुमती कुंटूरकर या पारंपरिक बालेकिल्ल्याच्या बळावर दमदार दावेदार मानल्या जात आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकरांच्या सौ.दिपाली पाटील होटाळकरांची उमेदवारी ही चर्चेत असून, त्यामुळे लढत अधिक रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे काँग्रेसकडून मूळ ओबीसी समाजातील श्रीमती अहिल्याबाई बालाजी चोंडे यांच्या नावाच्या चर्चेने जोर धरला असून,कुंटूर सर्कलच्या स्थानिक पातळीवर धनगर समाजाचा त्यांच्या नावाला सध्या प्रथम पसंती मिळत आहे.



काँग्रेस पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते व छत्री शेळगांव ग्रामपंचायतचे सरपंच संजय चोंडे यांचा त्यांना भक्कम पाठिंबा असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**मराठा नेतृत्वातील मतविभाजन ओबीसींसाठी फायद्याचे?**

कुंटूरकर व पाटील या दोन्ही बाजूंच्या मराठा नेतृत्वा मध्ये मतांचे विभाजन झाले, तर ओबीसी मतांची एकजूट चोंडे यांच्या बाजूने निर्णायक ठरू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात वेगाने पसरत आहे. विशेष म्हणजे, भाजप व राष्ट्रवादी (अजितदादा गट) हे सत्तेचे भागीदार असल्याने त्यांच्या मतांमध्ये तडा गेल्यास काँग्रेसला अनपेक्षित बळ मिळण्याची शक्यताही राजकारणात रंगत आणत आहे. शिवराज पाटील होटाळकर हे पक्षातील प्रमुखपदी असल्याने जिल्ह्यातील सर्वच पाच नगरपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या जबाबदाऱ्या त्यांना खूप ताण असुन यापूर्वी शिवराज पाटील होटाळकरांनी तळेगाव जि.प. सर्कल (ता. उमरी) व मांजरम जि. प. सर्कल निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले होते. परंतु कुंटूर सर्कल मध्ये त्यांचा जन संपर्क खुप मोठ्या प्रमाणात असुन. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बळावर यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संस्थेच्या निवडणुकीत नक्कीच यश प्राप्त करतील असा काही जानकार मंडळीचे मते व्यक्त केली जात आहेत.तर दुसरीकडे सध्या ते जिल्हाध्यक्ष असल्याने जिल्ह्यातील निवडणुकीच्या जबाबदाऱ्यांमुळे त्यांच्या उमेदवारीवर अजितदादा गटात पुनर्विचार होईल का, याकडे जिल्ह्यातील दिग्गजांचे लक्ष लागले आहे.तर कुंटूर सर्कल मधील स्थानिक नाराजीने समीकरणे बदलण्याची चिन्हे गेल्या काही वर्षात कुंटूरकर परिवार हा साखर कारखान्याच्या कामकाजात गुंतल्याने स्थानिकसह पंचक्रोशीतील ल गावे ही विकासाच्या योजनेपासून वंचित राहिल्याने,त्यामुळे स्थानिक नागरिकांत सध्या प्रचंड नाराजी वाढलेली आहे. यासोबतच मूळ ओबीसी समाजाला संधी न मिळाल्याची भावना अधिक तीव्र होत असून, याचा प्रत्यक्ष परिणाम हा देशमुख व पाटील गटाच्या मतांवर होऊ शकतो, असा अंदाज वर्तविला जात आहे.एकंदरीत, कुंटूर जि.प. गटातील ही तिरंगी लढत स्थानिक राजकारणात चुरस निर्माण करण्याबरोबरच अनिश्चिततेचे सावट आणणारी ठरणार, हे निश्चित मानले जात आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वक्तृत्व स्पर्धेत 'शाहू'ची प्रतीक्षा मोरे प्रथम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** शहीद टिपू सुलतान सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत खुल्या गटात राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रतीक्षा मोरे हिने प्रथम, निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या गीता वाडकर हिने द्वितीय तर अलीबागच्या पीएनजी महाविद्यालयाच्या पंकज पांडुळे याने तृतीय क्रमांक पटकावला.

शालेय गटात जान्हवी कर्डिले, भाविका जाधव द्वितीय तर प्रवीण बिराजदार तृतीय आला आहे. टिपू सुलतान यांच्या जीवनकार्यावर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने खुल्या व शालेय गटात भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत मराठवाड्यातून ५८ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष इसरार सगरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विकास बँकेचे व्हा. चेअरमन ॲड. समद पटेल, अफजल कुरेशी, बरकत काजी यांची उपस्थिती होती. ११ हजार रोख, सन्मानपत्र देऊन विजेत्यांचा गौरव स्पर्धेत खुल्या गटात प्रतीक्षा मोरे, गीता वाडकर, पंकज पांडुळे, उत्तेजनार्थ कार्तिक दरोडे, शालेय गटात जान्हवी कर्डिले, भाविका जाधव, प्रवीण बिराजदार, उत्तेजनार्थ उमेशा सय्यद हिने अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना प्रथम पारितोषिक ११०००, द्वितीय ७००० व तृतीय ५००० रुपये रोख व सन्मानपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.



# लातूर केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धेचे आज थाटात उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** जिल्ह्यातील हौशी रंगकर्मी आणि चोखंदळ नाट्य रसिकांना प्रचंड ओढ असलेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे लातूर केंद्रावर आज दि. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता उद्घाटन होणार आहे. शहरातील एकुण नाट्य वर्तुळात प्रचंड उत्साह असल्याचे वातावरण सर्वत्र दिसून येत आहे. शहरातील मार्केट यार्डातील स्व.दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृहात ही स्पर्धा होणार असून १२ नाटकांचा समावेश आहे. जिल्ह्यातील हजारो कलावंत आपल्या नाट्यविष्काराने हौशी रंगभुमी गाजवून सोडणार आहेत.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड़ आशीष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा मोठ्या जल्लोषात लातूरनगरीत पार पडणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी दिली.

१२ दिवस दररोज सायंकाळी ७ वाजता होणाऱ्या या नाटकांना ऐतिहासीक,

### नाट्य वर्तुळात प्रचंड उत्साह

सामाजिक, कौटुंबिक, गुढ, जहस्यमय, अशा विविध प्रकारच्या विषयांची पार्श्र्वभूमी असून लातूरच्या कलावंतांनी ही नाटके उभी करण्यासाठी प्रचंड परिश्रम घेतले आहेत.या निमित्ताने अनेक कलावंत पहिल्यांदा रंगभूमीवर दमदार पदार्पण करणार आहेत हे विशेष.

कल्याण वाघमारे-रे शुन्य मना, गणपत वेणुगोपाळ कुलकर्णी- अंतरछिद्र-द ब्लॅक होल, अभय राठोड- बेईमानी, विशाल लामतूरे-रातमतरा, प्रदीप भोकरे- घाट, संजय प् अयाचित-टेडी बिअर, प्रा. ज्योतीबा बडे-इथे ओशाळला मृत्यू, पांडूरंग वाघमारे-विसावा, प्रमोद कांबळे- विठ्ठला, सुवर्णा बुरांडे-संकेत मीलनाचा, ॲड़. शैलेश गोजमगुंडे-उन्हातलं चांदणं, महेश सबनीस-दास्ताँ यांच्या दिग्दर्शनाचे कसब लातूरकर नाट्य रसिकांना अनुभवयास मिळणार आहे.संयोजन समितीने या स्पर्धेची जय्यत तयारी केली असून अधिकाधिक नाट्य रसिकांनी या आपल्या रंगकर्मींना भरघोस प्रतिसाद देण्यासाठी आवर्जुन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठा परिवाराच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** सकल मराठा परिवार लातूर यांच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे घेण्यात आलेल्या शिबिरात ५३ रक्तदत्यांनी या महत्वपूर्ण सामाजिक उपक्रमात रक्तदान करीत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली.

### ५३ रक्तदात्यांनी केले रक्तदान

राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आयोजित केलेल्या या शिबिरात रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन प्रथम रक्तदाते आणि सकल मराठा परिवार लातूरचे सदस्य राहुल दत्तात्रय जाधव, गंगाधर पवार, किशोर धायगुडे, बळवंत जाधव, संतोष पवार यांनी केले. शिबिरात रक्तदात्यांना अल्पोपहार आणि मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. रक्तदान शिबिरासाठी श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढीचे विकास कारंजे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या शिबिरातून मिळालेल्या रक्ताचा उपयोग



थॅलेसेमिया, दुर्घटना पीडित, शस्त्रक्रिया, गर्भवती माता आणि कॅन्सर पीडितांना जीवनदान देण्यासाठी केला जाईल अशी माहिती सकल मराठा परिवाराने दिली. तसेच समाजातील सर्व क्षेत्रातील नागरिकांनी रक्तदान करावे असे आवाहन केले.

श्रीमती सरस्वती रक्तपेढीचे डॉक्टर डी.बी. दाताळ, डॉ. शुभम शिवणे, विकास कारंजे, अर्जुन वाघचौरे, शिवाजी जवादे, सुचिता भागवते, अच्युत पाटील, बालाजी कराड आदींनी या रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# आएमएच्या राज्य उपाध्यक्षपदी डॉ. कल्याण बरमदेंची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** लातूर येथील ख्यातनाम स्त्री रोग, वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बलभीमराव बरमदे यांची आयएमएच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवड वर्ष २०२५ -२६ या वर्षासाठी केली गेली आहे. वैद्यकीय क्षेत्रात डॉ. कल्याण बरमदे यांच्या या निवडीचे स्वागत होत आहे.

शनिवारी सोलापूर येथे आयएमएच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे उपस्थित होते. यावेळी सन्माननिय अतिथी म्हणून मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ. कपाडिया, राष्ट्रीय सहसचिव डॉ. वसंत लुंगे, आयएमए महाराष्ट्राचे



सुधीर नणंदकर, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. होजी मावळते अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांची उपस्थिती होती. आयएमएच्या अध्यक्षपदी डॉ. संतोष कुलकर्णी यांची तर उपाध्यक्षपदी डॉ. कल्याण बरमदे यांची निवड करण्यात आली आहे. MASTACON 2025 या राज्यस्तरीय अधिवेशनात ही घोषणा होताच उपस्थित मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले. राज्यातील डॉक्टरांच्या हक्क, सुरक्षाभान आणि व्यावसायिक प्रगतिसाठी ते सक्रियपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. कल्याण बरमदे यांनी सर्व डॉक्टरांचे एकत्र येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एकजुटीने कार्य केल्यास डॉक्टरांशी संबंधित सर्व समस्या प्रभावीपणे हाताळता येतात. आयएमए ही सर्वांची मातृसंस्था असून, ही मानाची जबाबदारी बिनविरोध मिळाल्याचा आपल्याला अभिमान आहे. सर्व सहकारी डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यास आपण प्राधान्य देणार आहोत. आयएमएच्या वतीने प्रतिवर्षी सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करते. तसेच या वर्षात पौगंडावस्थेतील समस्या सोडविण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शक शिबीर, एचपीव्ही वॅक्सीन (गर्भमुख कँसर प्रतिबंधक लस) कॅम्पस व स्त्रियांसाठी पीएपी स्मेअर म्हणजे गर्भमुख कँसरचा शोध घेणारी चाचणी घेण्याचे प्रयोजन असल्याचेही त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल डॉ. कल्याण बरमदे यांचे वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले आहे.

# कुष्ठरोग शोध मोहीम १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान

### शहरातील ३० हजार घरांचे होणार सर्वेक्षण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** प्रशासनाने निर्धारित केल्याप्रमाणे वर्ष २०२७ पर्यंत देशभरातील कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट निश्र्चित केले आहे. या अनुषंगाने नवीन कुष्ठरोग बाधित यांचा शोध घेऊन त्यांना बहुविध औषधोपचार सुरू करणे आणि रोगप्रसाराची साखळी खंडित करणे हा एकमेव प्रभावी पर्याय आहे हाच उद्देश समोर ठेवून लातूर शहर महानगरपालिकेत अंतर्गत आयुक्त श्रीमती मानसी तसेच उपायुक्त श्रीमती वसुधा फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने शहरातील ३०००० घरांचे सर्वेक्षण होणार असून एक लाख पन्नास हजार लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी केली जाणार आहे. याकरिता लातूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांमधील १६० पथके तयार केली आहेत. त्यांचे सर्वेक्षण १७ पर्यवेक्षिकामार्फत केले जाणार आहे. अति जोखमीच्या क्षेत्रांमध्ये घराघरांमध्ये हे सर्वेक्षण केले जाणार आहे. प्रत्येक घरातील स्त्रियांची तपासणी ही अशा स्वयंसेविका यांच्यामार्फत तर पुरुषांची तपासणी पुरुष स्वयंसेवक करणार आहेत. तपासणी दरम्यान संशयित रुग्णांची नोंद नोंदवही मध्ये घेतली जाणार आहे.

तसेच संशयित रुग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून निदान केले जाणार आहे व त्यांना लागलीच बहुविध औषधोपचार चालू केले जाणार आहेत.

शरीरावर असणारा बधिर चट्टा तसेच इतर लक्षणे आढळल्यास या मोहिमेमध्ये सर्वांनी आपली तपासणी करून घ्यावी व आजारास घाबरून न जाता वेळेत औषधोपचार सुरू करावेत. बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी सांगितले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे आपल्या घरी येणाऱ्या स्वयंसेवकांना योग्य ते सहकार्य करावे आणि वेळेत निदान उपचार करून घ्यावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# लातूर जिल्ह्यात कृत्रिम वाळूचे प्रकल्प होणार दुप्पट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** राज्यात कृत्रिम वाळूचा वापर वाढावा तसेच दर्जाहीन कृत्रिम वाळूवर थेट कारवाई व्हावी, यासाठी मूळ धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. एम-सँड युनिटला मान्यता तसेच या पद्धतीच्या युनिटला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय मर्यादा ५० वरून १०० युनिटपर्यंत नेण्याचा अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

यापूर्वीची ५० जणांना मान्यता देण्याची मर्यादा वाढविण्यात आल्याने नवीन उद्योजकांनाही संधी मिळणार आहे. दिवसेंदिवस वाळूची उपलब्धता कमी असल्याने परराज्यातून वाळू आणली जात आहे. शिवाय, स्थानिक नद्या, नाल्यांचा उपसा मोठचा प्रमाणात झाल्याने वाळूघाट काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाला ठिकाणे शोधावी लागत आहेत. लातूर जिल्ह्यात मागील जवळपास १० वर्षांपासून वाळू घाटांची संख्या बोटावर मोजण्याइतकी शिल्लक राहिली नाही. सध्या मिळत असलेली वाळू आणि एम सँड यांच्या दरातील तफावत मोठी आहे. सर्वसामान्यांना बांधकामासाठी वाळू वापरणे आवाक्याबाहेर गेले आहे. यातून बांधकामांचे बजेट कोलमडत चालले आहे. शासनाने व न्यायालयाने पर्यावरणपूरक मानके लागू केल्यामुळे नदीच्या पात्रात आढळणाऱ्या वाळूची उपलब्धता मर्यादित झाली आहे.

त्यामुळे नदीपात्रातून निघत असलेल्या वाळूची जागा घेऊ शकेल अशा दर्जेदार बांधकामायोग्य वाळूची गरज कृत्रिम वाळूद्वारे पूर्ण केली जाऊ शकते. नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम-सेंड ही सर्वात योग्य पर्यायी सामग्री आहे. म्हणून एम-सेंडला प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार करण्यात आले आहे. शासकीय जमिनीचा एम-सॅड युनिटसाठी लिलाव करताना त्यात केवळ महाराष्ट्रात नोंदणीकृत संस्थांनाच भाग घेता येईल.

उद्योजकांना प्रति ब्रास ४०० रुपयांची सवलत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. त्यात व्याज अनुदान, वीज दर अनुदान, विद्युत शुल्क सवलत, मुद्रांक शुल्क माफी, रॉयल्टीमध्ये ४०० रुपये प्रति ब्रास सवलत मिळणार आहे. शासकीय व निमशासकीय बांधकामांमध्ये सध्या एम-सेंडचा २० टक्के वापर बंधनकारक असून, टप्प्याटप्याने १०० टक्के होईल. आतापर्यंत संकेतस्थळावर नवीन १४ जणांनी अर्ज केले आहेत. अर्ज करण्यासाठी संकेतस्थळावर जाऊन सध्या अर्ज स्वीकृती सुरू आहे. प्रायव्हेट लँड हा पर्याय निवडून अर्ज करावा.

## खंडोबा देवस्थान यात्रा महोत्सवाचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जय मल्हार खंडोबा देवस्थान मोती नगर, लातूर येथे खंडोबा यात्रा महोत्स्वाचे आयोजन केले आहे. निलेशजी भैय्या ठक्कर (खंडोबा समितीचे अध्यक्ष) यांच्या शुभहस्ते पालखी मिरवणूकीची आरती होणार आहे. तरी मोतीनगर भावीक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन नामदेव मामा चाळक, गोरोबा गाडेकर, जयराम सुर्यवंशी, अनिल धुमाळ, प्रमोद काळे, भैरवनाथ कदम आदींनी केले आहे.



## अनधिकृत पार्किंगवर कार्यवाही

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** वाढती वाहतूककोंडी लातूरकरांसाठी डोकेदुखी बनली आहे. त्याचबरोबर रिंगरोड, सर्व्हिस रोडवर असलेले अतिक्रमण यामुळे वाहनधारकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लातूर शहरातील प्रमुख चौकांसह रिंगरोडची वाहतूक कोंडी कशामुळे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वाहतूक शाखेचे कर्मचारी कोंडी सोडविण्यात कमी पण चलन फाडण्यात अधिक मश्गुल असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. शहरात वाहतूक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, लातूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रण शाखेद्वारे १५ दिवसांची विशेष ई-चलान मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरात बेशिस्तपणे पार्किंग करणारी चार चाकी, दुचाकी वाहने तसेच रिंगरोडच्या सर्व्हिस रोडवर अनधिकृत पार्किंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. १४ नोव्हेंबर रोजी पहिल्याच दिवशी ॲटो रिक्षांच्या थकीत ई-चलान दंडाची वसुली करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी सांगितले.

# प्लास्टिकमुक्त लातूरसाठी 'माझं घर'च्या विद्यार्थ्यांचा जागर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** वाढत चाललेली प्लास्टिक कचऱ्याची समस्या व त्यामुळे निर्माण होणारी पर्यावरणाची हानी याबद्दल समाजात जनजागृती करण्यासाठी व पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिक पासून लातूर मुक्त करण्यासाठी माणूस प्रतिष्ठान संचलित माझं घरच्या विद्यार्थ्यांनी अनोखा वसा उचललला आहे.

शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या माझे घरच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक मुक्तीसाठी अनोखी अभियान हाती घेतले असून रविवारी सकाळी काशीलिंगेश्वर नगर परिसरात प्लास्टिकमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास, वाढते प्रदूषण नागरिकांना समजावून सांगत प्लास्टिकचा वापर न करण्याचे आवाहन करत ग्रामपंचायत समोरील ग्रीन बेल्ट व परिसरात स्वच्छता करण्यात आली.

या परिसरात घंटागाडी येत नसल्याने कचऱ्याची समस्या निर्माण झाली असून कचऱ्याचे ढीग जमा होत आहेत. स्वच्छता अभियाना दरम्यान मोठ्या





प्रमाणामध्ये प्लास्टिकचा कचरा गोळा करण्यात आला.

प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी सकाळी सहा वाजता औसा तालुक्यातील बुधोडा येथून काशीलिंगेश्र्वर नगर पर्यंत प्लास्टिक मुक्तीचा जागर करणारी पर्यावरण संवाद सायकल रॅली काढली. रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी हम सब एक है प्लास्टिक मुक्त लातूर झालेच पाहिजे, झाडे लावा झाडे जगवा, सायकल चालवा, पर्यावरण वाचवा, सायकल चालवा आरोग्य वाचवा, आपले आरोग्य आपल्या हाती अशा घोषणा दिल्या. अहिल्यादेवी होळकर चौकात कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, साहित्यिक डॉ. जयद्रथ जाधव, सायक्लिस्ट मदन बरुरे, सेवानिवृत्त वनअधिकारी शिवाजी गिरी यांनी सायकल रॅलीचे स्वागत केले.

### काशीलिंगेश्वर नगरमध्ये स्वच्छता अभियान

लातूर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी माझं घर ने पुढाकार घेतला असून अनेक सुजाण नागरिक सहभागी होत आहेत. दर रविवारी शहरातून प्लास्टिक मुक्त रॅली काढण्यात येणार असून या मोहिमेत समस्त लातूरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन शरद झरे यांनी यावेळी केले.

दिवाळीमध्ये फटाकेमुक्त दिवाळीचा संदेश देत लातूर जिल्ह्यातून सायकल रॅली काढून वेगवेगळ्या गावात पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांशी संवाद साधत जनजागृती केली. यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील जवळपास चाळीस गावातील गावकऱ्यांनी पर्यावरण पूरक फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. जुन्या कपड्यापासून माझं घर मध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हजारो कापडी पिशव्यांचे वाटप करून जनजागृती केली जाते.

रविवारी काशीलिंगेश्वर नगर मधील स्वच्छता अभियानादरम्यान मोठ्याप्रमाणावर कचरा गोळा करण्यात आला. या अभियानात माझे घरचे प्रमुख शरद झरे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, पोलीस चिंतामणी पाचपुते, सुधाकर पाटील, प्रशांत जाधव, भोसले, चंद्रकांत हेरकर, सुहास देशपांडे यांच्यासह परिसरातील विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.